# प्रकरण तीन

## समाजकल्याण विभाग

**3.794 मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे (एकवेळ) योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** या कामाकरीता रक्कम रुपये 5,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) पंचायत समिती, शहापूर -

1) पंचायत समिती, शहापूर यांनी सादर केलेल्या सर्व लाभार्थी प्रस्तावांसोबत लाभार्थ्याने सद्यस्थितीत कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे, याबाबतचे प्रमाणपत्र किंवा फी ची पावती घेण्यात आलेली नाही. यास्तव तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 3 नुसार लाभार्थी विद्यार्थीचे इयत्ता 12 वरील शिक्षण सुरु असलेबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटविता आली नाही.

2) तांत्रिक मान्यतेतील अट क्रमांक 7 नुसार लाभार्थ्याने यापूर्वी योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लाभार्थ्यांकडून घेण्यात आले नाही.

3) सर्व लाभार्थी कोठारे या एकाच गावातील आहेत. म्हणजेच योजनेचा प्रचार व प्रसार योग्य रीतीने करण्यात आलेला नाही.

ब) पंचायत समिती, मुरबाड -

1) या योजनेंतर्गत इयत्ता 12 वरील अभ्यासक्रमाकरीता लाभ द्यावयाचा आहे. मात्र मुरबाड तालुक्याच्या 14 लाभार्थ्यांना 12 वी किंवा त्यापेक्षा कमी अथवा समतुल्य अभ्यासक्रमास सहाय्य करून योजनेसाठी अपात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला आहे. या 14 लाभार्थ्यांना दिलेली रक्कम रूपये 1,00,000/- इतकी आहे.

क) पंचायत समिती, कल्याण -

1) कोमल जाधव या ITI प्रवेशित विद्यार्थीनिस योजनेचा लाभ दिलेला आहे. यास्तव 12 वी किंवा त्यापेक्षा कमी अथवा समतुल्य अभ्यासक्रमास सहाय्य करून योजनेसाठी अपात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला आहे.

**3.795 अपंग व्यक्तिंना सहाय्यभुत साधने व तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** 3 टक्के अपंग योजना अंतर्गत अपंग व्यक्तिंना सहाय्यभुत साधने व तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे या योजनेंतर्गत एकूण 87 अपंग लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 153, दिनांक 30/03/2017 अन्वये रक्कम रूपये 9,69,058/- खर्च करण्यात आला आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/ 34, दिनांक 20/10/1999 मधील अनुक्रमांक 4 नुसार विहित केलेली मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) लाभार्थ्यांना योजनेचा लाभ त्याच वित्तीय वर्षात न झाल्याने योजनेचा हेतु सफल झाला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए-2008 / प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/82008 मधील परिशिष्ट-इ नुसार विहित केलेल्या वैयक्तिक लाभांच्या योजनेच्या वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

4) पंचायत समितींना वितरीत केलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्रे तसेच वाटप याद्या व अखर्चित शिल्लक रक्कमा इत्यादी माहिती जिल्हा परिषद समाजकल्याण कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

5) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 2016/प्र.क्र.24/वित्त -3, दिनांक 28/04/2016 सोबतच्या जोडपत्रातील मुद्दा क्रमांक 11 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेतून लाभार्थी खाती अनुदान जमा झालेवर दोन महिन्यांच्या आत लाभार्थ्याने खरेदी करावयाची आहे व सदर खरेदी पावत्या ग्रामसेवक / मुख्याध्यापक यांचेमार्फत त्वरेने समाजकल्याण विभागाकडे सादर करावयाच्या आहेत. यास्तव लाभार्थी खाती अनुदान जमा झालेवर दोन

महिन्यांच्या आत ज्या लाभार्थ्याने खरेदी केलेली नाही, अशा सर्व लाभार्थ्यांकडून लाभाची रक्कम वसूल करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करणेबाबत टिपण क्रमांक 17 दिनांक 07/09/2017 न्वये मागणी करूनही उपलब्ध झाले नाही.

6) योजनेच्या लाभार्थीपैकी श्री.जरारे ध्यानेश्वर सूर्यभान या लाभार्थीच्या प्रस्तावासोबतच्या रहिवासी दाखल्यानुसार लाभार्थी ग्रामपंचायत हटटी, तालुका सिल्लोड,जिल्हा औरंगाबाद चा रहिवासी आहे. या उपरोक्तही लाभार्थीस लाभ का दिला आहे, याचा खुलासा व्हावा.

7) योजनेच्या लाभार्थीपैकी 1. प्रशांत चंद्रकांत तेलवणे 2. चंद्रकांत मारुती वाघमारे 3. भास्कर बबन वारघडे 4.निलेश मोतीराम मनोरे हे प्रस्तावासोबतच्या नगरसेवकांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यानुसार नगरपंचायत मुरबाडचे रहिवासी आहेत म्हणजेच लाभार्थी प्रस्तावांची योग्य छाननी न करता लाभार्थीना लाभ दिलेला आहे.

तरी उपरोक्त 5 लाभार्थीना दिलेले अनुदान वसूल करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

8) बहुतांश प्रस्ताव हे फ्रीज, घरघंटी, मिरची कांडप यंत्र, संगणक इत्यादींच्या मागणीचे आहेत. यानुसार काही प्रस्तावावर खाडाखोड करून नवीन मागणी नोंदविण्यात आली आहे. मात्र नवीन मागणी नोंदविण्याबाबत लाभार्थींनी अशी दुरुस्ती केली असल्यास त्याबाबत लाभार्थ्याने स्वाक्षरीने प्रमाणित करणे आवश्यक असूनही अशा प्रकारे प्रामाणित केलेले नाही. अशा प्रकारे एकूण 27 प्रस्तावांमधील मागणी व केलेला पुरवठा यांमध्ये भिन्नता आढळून येत असल्याने मागणी नसूनही जबरदस्तीने पुरवठा केलेला दिसून येतो.

**3.796 20 टक्के मागासवर्गीयांना नवीन घर बांधणीसाठी अथवा घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य करणेबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/ 34, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/सीआर -1265/34, दिनांक 09/12/1993 नुसार जिल्हा परिषदानी मागासवर्गीय कल्याणाकरीता योजना राबवून त्यावर त्याच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. परंतु, जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात तरतूद करून व अनुदान उपलब्ध असून देखील योजना न राबविणे व इतक्या मोठ्या प्रमाणात अनुशेष शिल्लक ठेवणे ही बाब उपरोक्त शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी असून गंभीर स्वरुपाची बाब आहे. मागासवर्गीयांच्या कल्याणाकरीता तरतुदीनुसार परिपूर्ण योजना राबविलेल्या दिसून येत नाहीत. रक्कम रूपये 30,00,000/- एवढा जिल्हा परिषद निधी नाहक गुंतून पडला आहे. ज्याचा विनियोग इतर कल्याणकारी योजनाच्या अंमलबजावणीकरीता होवू शकला असता. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 परिशिष्ट 8 भाग 1 अन्वये विकास योजनांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. याबाबत संबधीतावर जबाबदारी निश्चित करणेत यावी व शासकीय दराने व्याज आकारणी करून रक्कम वसूल करून लेखापरीक्षणास पूर्तता दर्शवावी.

2) जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील मागासवर्गीयांना नवीन घर बांधणीसाठी अथवा घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य करणे या योजनेचे लेखापरीक्षण केले असता मागील सन 2015-2016 या वर्षातील शिल्लक अनुदान रक्कम रूपये 2,40,000/- मधुंन रूपये 1,00,000/- रक्कम वसई तालुक्यातील 5 लाभार्थ्यावर (प्रती 20,000/-प्रमाणे प्रथम हप्ता) खर्च करण्यात आलेली आहे. सन 2016-2017 या लेखापरीक्षण वर्षात प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेऊन तसेच 75 लाभार्थी निवड प्रक्रिया होऊन सुद्धा तरतूद रक्कम रुपये 30,00,000/- उपलब्ध असताना देखील सदर योजना सन 2016-2017 राबवण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ 2016-2017 या वित्तीय वर्षात न मिळाल्याने मागासवर्गीय लाभार्थ्यांना कायमस्वरूपी निवासाची सोय उपलब्ध करून देऊन त्यांचे राहणीमानाचा स्तर उंचावणे हा योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

3) जा.क्र.पाजिप/सक/नियो/125/2017, दिनांक 10/03/2017अन्वये निधी वितरण आदेश मधील अट क्रमांक 4 व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वसई यांचे आदेश जा.क्र.पंसव/सक/आस्था/वशी/15-16, दिनांक

31/03/2016 मधील अट क्रमांक 6 नुसार सदरचा लाभ दुरुस्तीचे काम सुरु करताना दुरुस्ती पूर्वीचे फोटो घेऊन प्रथम हप्ता रूपये 20,000/-अदा करावे व 2 रा वा अंतिम हप्ता रुपये 20,000/- अदा करणेपूर्वी मुल्यांकन दाखला व घर दुरुस्ती कामपूर्ण झाल्याचा फोटो दोन प्रतीत या कार्यालयात सादर केल्याशिवाय अदा केला जाणार नाही व अट क्रमांक 7 नुसार अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण करून घेणे व मुल्यांकन तसेच काम पूर्णत्वाचे दाखले देण्याची जबाबदारी उपअभियंता व शाखा अभियंता यांची राहिल. असे असतानाही लेखापरीक्षणास घरांचे अंदाजपत्रक, मंजूर आराखडा, मुल्यांकन, काम पूर्णत्वाचे दाखले, फोटो उपलब्ध झालेले नाहीत.

4) उपरोक्त नमूद केलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आदेश दिनांक 19/11/2016 मधील योजनाच्या अटी व शर्ती नुसार लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचे मागासवर्गीय दाखले, सक्षम अधिकाऱ्यानी दिलेले जातीचे व उत्पन्नाचे दाखले, घर नमुना क्रमांक 16 लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/1093/1231, दिनांक 01/09/1993 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/ 1089/ प्र.क्र.557/34, दिनांक 05/10/1989 मधील परिपत्रक क्रमांक 1 अन्वये व अर्धसमास पत्र क्रमांक 2 दिनांक 10/10/2017 देऊनही लाभार्थ्याचे मास्टर नोंदवही उपलब्ध न झाल्यामुळे लाभार्थ्यांस दुबार लाभ मिळाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एसीबि2003/प्र.क्र116/ माकव -2, दिनांक 23/05/2003 चे परिशिष्ट अ मधील अट क्रमांक 8 नुसार विनियोग दाखले लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रावी/पिरसी 1083/सी आर 1074/578, दिनांक 02/07/1993 नुसार उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असताना व अर्धसमासपत्र क्रमांक 2, दिनांक 10/10/2017 व अर्धसमासपत्र क्रमांक 4, दिनांक 23/10/2017 देऊनही लाभार्थ्यांचे अर्ज, संबधीत कागदपत्रे व नस्ती, विनियोग दाखले, घरासंबधी कागदपत्रे, लाभार्थी पोहोच, प्रमाणके, घरांचे अंदाजपत्रक, मंजूर आराखडे, मुल्यांकन, फोटो, कामपूर्णत्वाचे दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) सन 2016-2017 या वर्षातील नमूना नंबर 14 खर्च नोंदवही तपासली असता पृष्ठ क्रमांक 180 वर तालुका वसई रक्कम रुपये 1,00,000/- प्रदान केल्याची नोंद आहे. परंतु, त्यात रकाना क्रमांक 1 वर दिनांक नमूद नाही. रकाना क्रमांक 3 वर प्रमाणक क्रमांक नमूद नाही. तसेच लाभ दिलेल्या लाभार्थ्याचे नाव व पोहोच नाही. नमुना नंबर 14 अपूर्ण असून सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

9) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसिटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दिनांक 05/12/2016 च्या शासन निर्णयानुसार रक्कम तालुका वसईकडील प्रमाणक क्रमांक 10, दिनांक 21/10/2016 नुसार रूपये 60,000/- व प्रमाणाक क्रमांक 6 दिनांक 28/11/2016 नुसार रूपये 40,000/- 5 लाभार्थ्याच्या थेट बँक खात्यामध्ये प्रदान करण्यात आलेली आहे. परंतु, जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 अन्वये लाभार्थ्यांच्या पोहोच पावत्या लेखापरीक्षणास प्राप्त नाहीत. तसेच लेखापरीक्षण कालावधीपर्यंत लाभार्थ्यांना दुसरा हप्ता रक्कम रुपये 20,000/- प्रमाणे अद्याप वितरीत केलेला नाही.

10) गट स्तरवरून प्राप्त झालेल्या तालुका वसई यांची कागदपत्रे तपासली असता गटविकास अधिकारी पंचायत समिती, वसई यांनी जा.क्र.पंसव/सक/आस्था/वशी/15-16, दिनांक 31/03/2016 नुसार उपभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, वसई यांना दिनांक 31/03/2016 रोजी घरबांधणी वा घरदुरुस्तीचे अंदाजपत्रक, मुल्यांकन व दाखले देण्याबाबतचे आदेश व पत्र दिलेले आहे. परंतु, बांधकाम विभाग, वसई यांना दिनांक 16/07/2016 रोजी प्राप्त झाल्याचे दिनांकासह स्वाक्षरी केलेली आहे. म्हणजे 4 महिने विलंबाने प्राप्त झालेले आहेत.

11) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक 1083, दिनांक 09/01/1983 नुसार योजना सफल झाल्याबाबत सक्षम प्रधिकाऱ्याने तपासणी केली नाही.

**3.797 मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिलाई मशीन पुरविणेबाबत**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,69,8000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागासवर्गीय लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे व आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे या उद्देशाने तालुक्यातील 446 लाभार्थ्यांना शिलाई मशीन खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये 6,000/- प्रमाणे एकूण 26,76,000/- अनुदान वितरीत केलेले आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र सन 2016-2017 मध्ये रक्कम रुपये 16,98,000/- खर्च केलेला आहे. रक्कम रुपये 28,02,000/- गट स्तरावर अजूनही अखर्चित आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/1093/1231, दिनांक 01/09/1993 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/ 1089/ प्र.क्र.557/ 34, दिनांक 05/10/1989 मधील परि. क्रमांक **1** अन्वये व अर्धसमास पत्र क्रमांक 2, दिनांक 10/10/2017 देऊनही लाभार्थ्याचे मास्टर नोंदवही उपलब्ध न झाल्यामुळे लाभार्थ्यांस दुबार लाभ मिळाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/ सी आर/ 2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक परास 1089/646/ 266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एसीबि2003 / प्र.क्र116 / माकव 2, दिनांक 23/05/2003 चे परिशिष्ट अ मधील अट क्रमांक 8 नुसार विनियोग दाखले लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसिटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दिनांक 05/12/2016 च्या शासन निर्णयानुसार रक्कम लाभार्थ्याच्या थेट बँक खात्यामध्ये प्रदान करून जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 अन्वये लाभार्थ्यांच्या पोहोच पावत्या लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक 1083 दिनांक 09/01/1983 नुसार योजना सफल झाल्याबाबत सक्षम प्रधिकाऱ्याने तपासणी केली नाही.

7) शासन निर्णय क्रमांक पंरास/1098/प्र.क्र.73/74, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 व शासन निर्णय क्रमांक मागास 1069/555, दिनांक 05/10/2009 अन्वये विहित नमुन्यात लाभार्थ्याची नोंदवही प्रपत्र अ मध्ये ठेवणे आवश्यक असताना ठेवण्यात आली नाही.

8) वर नमूद केलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आदेश दिनांक 19/11/2016 मधील योजनाच्या अटी व शर्ती नुसार लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचे मागासवर्गीय दाखले, सक्षम अधिकाऱ्यानी दिलेले जातीचे व उत्पन्नाचे दाखले, वस्तूचे प्रमाणपत्र, लाभार्थी प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

9) योजनेच्या व निधी वितरण आदेशतील अटी व शर्तीनुसार निवड झालेल्या लाभार्थ्यांनी full shuttle machine पायाने चालवायची शिलाई मशीनच खरेदी करून त्याची पक्की पावती कार्यालयात सादर केल्यानंतरच लाभार्थ्याच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करावी. असे असतानाही शिलाई मशिनच्या खरेदी पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. तसेच अट क्रमांक 3 नुसार लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न रूपये 20,000/- पेक्षा जास्त नसावे. असे असतानाही जव्हार, विक्रमगड, वाडा या तालुक्यातील लाभार्थ्यांचे उत्पन्न रूपये 20,000/- पेक्षा जास्त असतानाही लाभ देण्यात आलेला आहे. तालुका डहाणू, मोखाडा, विक्रमगडमधील लाभार्थ्याचे उत्पन्न नमूद नाही.

10) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रावी/पिरसी 1083/सी आर 1074/578, दिनांक 02/07/1993 नुसार उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असताना व अर्धसमासपत्र क्रमांक 2 दिनांक

10/10/2017 व अर्धसमासपत्र क्रमांक 4 दिनांक 23/10/2017 देऊनही लाभार्थ्यांचे अर्ज, संबधीत कागदपत्रे व नस्ती, शिलाई मशीन खरेदी पावत्या, विनियोग दाखले, लाभार्थी पोहोच, प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

**3.798 3 टक्के अपंग लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणेबाबत**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रुपये 12,80,125/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त 09, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट 'इ' नुसार जिल्हा परिषदेकडील वैयक्तिक लाभांच्या योजनांस ठरवून दिलेल्या कालमर्यादेनुसार कार्यवाही वेळापत्रकानुसार योजनेची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी 30 जून पूर्वी तसेच साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश 31 ऑगस्ट अखेरपर्यंत देणे व पात्र लाभार्थीची निवड 31 मे अखेर करून त्यानुसार प्रत्यक्ष 30 नोव्हेंबर अखेरपर्यंत लाभार्थ्यांना लाभ प्रदान करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदर वेळापत्रकाचे जिल्हा परिषदेने पालन केलेले नाही.

2) उपरोक्त नमूद केलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आदेश दिनांक 02/09/2016 मधील योजनांच्या अटी व शर्तीनुसार लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांचे मागासवर्गीय दाखले, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे व उत्पन्नाचे दाखले, अपंग असलेबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र, विजेची जोडणी असल्याबाबत कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/1093/1231, दिनांक 01/09/1993 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/ 1089/प्र.क्र.557/ 34, दिनांक 05/10/1989 मधील परि. क्रमांक 1 अन्वये व अर्धसमास पत्र क्रमांक 2 दिनांक 10/10/2017 देऊनही लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही उपलब्ध न झाल्यामुळे लाभार्थ्यांस दुबार लाभ मिळाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094 सी आर/ 2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक परास 1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एसीबि2003/प्र.क्र116/ माकव -2, दिनांक 23/05/2003 चे परिशिष्ट अ मधील अट क्रमांक 8 नुसार विनियोग दाखले लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रावी/पिरसी 1083/सी आर 1074/578, दिनांक 02/07/1993 नुसार उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असताना व अर्धसमासपत्र क्रमांक 2 दिनांक 10/10/2017 व अर्धसमासपत्र क्रमांक 4 दिनांक 23/10/2017 देऊनही लाभार्थ्यांचे अर्ज, वस्तू खरेदी पावत्या, संबधीत कागदपत्रे व नस्ती, विनियोग दाखले, 35 लाभार्थी पोहोच, प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक 1083, दिनांक 09/01/1983 नुसार योजना सफल झाल्याबाबत सक्षम प्रधिकाऱ्याने तपासणी केली नाही.

8) शासन निर्णय क्रमांक पंरास/1098/प्रक्र.73/74, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 व शासन निर्णय क्रमांक मागास 1069/555, दिनांक 05/10/2009 अन्वये विहित नमुन्यात लाभार्थ्यांची नोंदवही प्रपत्र अ मध्ये ठेवणे आवश्यक असताना ठेवण्यात आली नाही.

9) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीआयपी-2016/प्र.क्र.24/वित्त-3, दिनांक 28/04/2016 अन्वये अट क्रमांक ई व महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय डिसिटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दिनांक 05/12/2016 च्या शासन निर्णयानुसार रक्कम लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये प्रदान करून जिल्हा

परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 अन्वये लाभार्थ्यांच्या पोहोच पावत्या लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत.

10) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीआयपी-2016/प्र.क्र.24/वित्त-3, दिनांक 28/04/2016 अन्वये अट क्रमांक 3 नुसार व वर नमूद केलेल्या निधी वितरण आदेशानुसार अपंग लाभार्थी वास्तव्यास असलेल्या ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकाने अपंग लाभार्थ्यास दिलेल्या लाभाबाबतचा अहवाल (खरेदीच्या पावतीसह) ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हा परिषदेस सादर करावा. असे असतानाही त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

11) सन 2016-2017 या वित्तीय वर्षात साहित्याचे दर निश्चित करणेकामी खरेदी समितीच्या मंजुरी कामी शासन निर्णय दिनांक 01/12/2016 नियमपुस्तिका नियम 3.1.2.2 नुसार सन 2015-2016 ची शेवटची खरेदी किंमतीचा आधार घेऊन दर निश्चित केलेला आहे.

12) अखर्चित रक्कम शिल्लक न ठेवता अजूनही काही लाभार्थींना लाभ देता आला असता. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/10/02/प्र.क्र 128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार अखर्चित रक्कम 3,69,875/- शासन निधीत भरणा करणेत यावी.

**3.799 20 टक्के जिल्हा परिषद सेस अंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लॅपटॉप (laptop) पुरविण्याबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

मंजूर तरतूद - रूपये 25,00,000/-

एकुण खर्च रुपये 24,78,195/-

प्रशासकीय मंजुरी - अप्राप्त

तांत्रिक मंजुरी - जा.क्र.राजिप/वाशी/कार्या- 5/2016-17 दिनांक - निरंक

मागासवर्गीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लॅपटॉप (laptop) पुरविणे ही योजना जिल्हा परिषदेने त्यांचे उपकरातून राबवली असून 54 लॅपटॉपसाठी रुपये 24,78,195/- इतक्या रकमेचे पुरवठा आदेश दिनांक 21/04/2016 अन्वये लॅपटॉप पुरवठादार मे. नॅशनल टेली लिंक यांना 30 दिवसात लॅपटॉप पुरवठा करण्याचे पुरवठा आदेश दिलेले आहेत. सदर लॅपटॉप खरेदी नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील नियम 3:2:1 अन्वये रुपये 24,78,195/- च्या लॅपटॉप (laptop) खरेदी साठी ई-निविदा प्रक्रिया राबवणे आवश्यक होते. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) लॅपटॉप (laptop) खरेदीसाठी मागविण्यात आलेले तीन पुरवठादारांचे बाजारभाव दरपत्रकावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे सदरचे दरपत्रकातील दर सध्याचे चालू दर आहेत की पूर्वीचे दर आहेत, याची खात्री करता आली नाही.

3) शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मधील नियम 3:2:3 अन्वये DGS & D च्या पॅनलवर असलेले वितरक / पुरवठादार यांचेशी दराबाबत वाटाघाटी करून DGS & D च्या दरापेक्षा कमी दर असेल, तरच त्यांचेकडून खरेदी करण्याचे सूचित केले आहे. परंतु, मे.नॅशनल टेली लिंक यांचेबरोबर कोणतीही वाटाघाटी न करताच DGS & D च्या दर करारातील नमूद दरानुसारच 54 लॅपटॉप खरेदीची आदेश दिलेले आहे.

4) दरकरारातील बाब क्रमांक 6 Accer कंपनीचे मॉडेल TMP-246 चे प्रती लॅपटॉप दर रुपये 42,200/- इतके असतांना त्याच कंपनीचे बाब क्रमांक 5, प्रती लॅपटॉप रुपये रुपये 45,892/- प्रमाणे लॅपटॉप पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आल्याने प्रती लॅपटॉप रुपये 3,692/- या प्रमाणे 54 लॅपटॉप साठी रुपये 1,99,368/- चे जादा प्रदान करावे लागले. पर्यायाने तेवढ्या रकमेचे जिल्हा परिषदेचे नुकसान झाल्याचे दिसून येते.

5) पुरवठा आदेश दिनांक 21/04/2016 अन्वये 54 लॅपटॉपचा पुरवठा 30 दिवसात करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु, मे. नॅशनल टेले लिंक यांनी 54 लॅपटॉपचा पुरवठा, विहित मुदतीत केल्याचे पुरवठा चलने तपासणीसाठी उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे लॅपटॉपचा पुरवठा विहित मुदतीत झाल्याची खात्री करता आली नाही.

6) मागासवर्गीय 52 विद्यार्थ्यांची मंजूर लाभार्थी यादी नस्तीसोबत दिसून येते. परंतु, प्रत्यक्षात मे. नॅशनल टेले लिंक यांचे पुरवठा देयक क्रमांक 7 दिनांक 27/07/2016 अन्वये 54 लॅपटॉपचा पुरवठा केलेला आहे.

7) पुरवठादाराने पुरवठा केलेल्या 54 लॅपटॉपच्या दर्जाबाबत शासनमान्य संस्थेकडून तपासणी केल्याचा अहवाल पडताळणीसाठी उपलब्ध झाला नाही.

8) निवड लाभार्थीना प्रत्यक्ष लॅपटॉपचे वाटप झाल्याची पोच लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

**3.800 20 टक्के जिल्हा परिषद सेस अंतर्गत मागासवर्गीयांना संगणक पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत रक्कम रुपये 24,84,103/- खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त योजनेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद 1.5 नुसार सदर योजना राबविण्यापुर्वी जाहिरात प्रसिध्द केलेली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयानुसार लाभार्थींची निवड ग्रामसभेत करण्यात यावी, असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012/प्र.क्र.680/ वित्त-09, दिनांक 31/01/2013 नुसार सदर योजनेच्या खर्चाला तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी घेणे आवश्यक असतांना प्रशासकिय मंजूरी व तांत्रिक मंजूरी यावर क्रमांक व दिनांक नमुद नाही. त्यामूळे झालेल्या खर्चासाठी प्रशासकिय व तांत्रिक मंजूरी घेतली अगर कसे, याची पडताळणी करता आली नाही.

4) ठेकेदार यांच्याकडून रूपये 1,600/- चे बॉंड पेपरवर करारनामा करणेत आला आहे. परंतू, करारावर दिनांक, अटी शर्ती नमुद केलेल्या नाही.

महाराष्ट जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 119 व 146 नुसार दिनांक अटी शर्ती असणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामूळे करारनामा विधीग्राहय होत नाही.

5) कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे 61 संगणक दर रूपये 40,723 = रूपये 24,84,103/- खरेदी करण्यात आली आहे. परंतू, मंजूर यादी 57 असतांना 4 संगणक जादा खरेदी करण्याची आवश्यकता नसतांना खरेदी करण्यात आले.

6) कार्यपुरवठा आदेश दिनांक 21/04/2016 रोजी देण्यात आला. त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे 30 दिवसाच्या आत मालाचा पुरवठा न केल्यास विलंब आकार प्रती आठवडा मालाच्या पुरवठयाचे 0.5 टक्के कमाल मर्यादा एकूण किंमतीच्या 5 टक्के असावा. मालाचे चलन क्रमांक 6, दिनांक 27/07/2016 अन्वये संगणक पुरवठा करण्यात आला. म्हणजेच आठ आठवडे उशीराने संगणक परवठा करण्यात आला. त्यामूळे प्रती आठवडा दर 0.5 टक्के प्रमाणे रूपये 99,360/- विलंब आकाराची रक्कम संबंधीत ठेकेदार यांच्याकडून वसूल करावी.

7) साहित्य गटाला पोच झालेबाबत गटविकास अधिकारी व संबधीत लाभार्थी यांना पोच झाल्याचे असे दोघांचीही पोच घेतलेल्या नाहीत.

8) संगणक मालाची तपासणी शासनमान्य संस्थेकडून पुरवठादाराने सादर करावे, असे असतांना मालाची गुणवत्ता अहवाल उपलब्ध नाही. त्यामूळे खरेदी झालेला माल योग्य दर्जाचा होता अगर कसे, याची पडताळणी करता आली नाही.

**3.801 आंतरजातीय विवाहीत दांपत्यास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत रक्कम रुपये 7,05,000/- खर्च करण्यात आला आहे.

सन 2016-2017 या वित्तीय वर्षात आंतरजातीय विवाह अर्थसहाय योजनेअंतर्गत जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग यांना राज्य शासन हिस्सा रूपये 11,75,000/- व केंद्र शासन हिस्सा रुपये 11,75,000/- असे एकूण रक्कम रूपये 23,50,000/- एवढे अनुदान प्राप्त झाले असून सन 2016-2017 या वित्तीय वर्षाकरीता रक्कम रूपये 23,45,000/- खर्च केल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त योजना राबवितांना कार्यालयीन टिप्पणी तपासली असता टिप्पणीवर समाजकल्याण अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अशा सक्षम अधिकाऱ्यांच्या अभिप्राय, मंजूरी, स्वाक्षरी टिप्पणीवर नमुद नाही.

2) महाराष्ट शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक आजिव-2007/ प्र.क्र.191/ मावक-2, दिनांक 01/02/2010 नुसार प्रती दांपत्यास रक्कम रूपये 50,000/- पती व पत्नीच्या संयुक्त नावाने धनादेश त्याच आर्थिक वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. तथापि, सदर योजनेचे नस्ती तपासली असता जिल्हा परिषदेने प्रमाणक क्रमांक 1001, दिनांक 31/03/2017 रक्कम रूपये 11,72,500/- व प्रमाणक क्रमांक 1002, दिनांक 31/03/2017 रक्कम रूपये 11,72,500/- असे एकूण रक्कम रूपये 23,45,000/- एवढी रक्कम समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आली आहे. सदरची रक्कम समाजकल्याण विभागातील पेटी कॅशबुकात जमा करण्यात आली असून समाजकल्याण विभागाने एकूण मंजूर यादीनुसार 49 लाभार्थी पैकी 32 लाभार्थीना रक्कम रूपये 50,000/- प्रमाणे रक्कम रुपये 16,00,000/- एवढी रक्कम दिनांक 12/06/2017 ते 09/08/2017 या कालावधीत वाटप केली. तसेच 3 लाभार्थ्यांना प्रती दांपत्य रक्कम रूपये 15,000/- प्रमाणे रक्कम रूपये 45,000/- एवढी रक्कम दिनांक 20/06/2017 ते 09/08/2017 या कालावधीत वाटप करण्यात आली. तसेच 14 दांपत्यांना रककम रूपये 50,000/- प्रमाणे रक्कम रूपये 7,00,000/- एवढी रक्कम लेखापरिक्षण कालावधीपर्यंत वाटप करण्यात आली नाही. तसेच सदरची रक्कम रूपये 7,00,000/- शासन खात्यात परत जमा करण्यात आली नाही. सदर बाब गंभीर असून त्यामूळे शासनाची रक्कम समाजकल्याण विभागाकडे अखर्चित आहे. तरी 14 दांपत्यांना सदरची रक्कम का वाटप केली नाही, याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

3) उपरोक्त योजनेअंतर्गत केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून रक्कम रूपये 11,75,000 + 11,75,000 एकूण 23,50,000/- एवढी रक्कम प्राप्त झाली असता जिल्हा परिषद समाजकल्याण विभागास रक्कम रूपये 23,45,000/- एवढी रक्कम विभाग प्रमुखाच्या रोखवहीत / खात्यावर वर्ग केली असून रक्कम रूपये 5,000/- जिल्हा परिषदेत अखर्चित दिसून येते. सदरची रक्कम शासनास का परत केली नाही, याबाबत खुलासा करावा.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 4 परिशिष्ट 2 नुसार विविध योजना राबवितांना सक्षम अधिकाऱ्यांची प्रशासकिय मान्यता तसेच तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर योजनेची नस्ती तपासली असता अशा प्रकारची प्रशासकिय मान्यता व तांत्रिक मान्यता आदेश लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाहीत.

5) लाभार्थींची मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामूळे लाभार्थींना दुबार लाभ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. काही दांपत्याचे विवाह 10 वर्षापुर्वीचे, 6 वर्षापुर्वीचे असे आढळून आले आहेत.

6) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक व क्रिया विभाग, शासन निर्णय क्रमांक युटीए-1099/ प्र.क्र.45/ माकव-2, दिनांक 30/01/1999 मधील अट क्रमांक 10 नुसार कोणत्याही लाभार्थीने या योजनेचा दुबार लाभ घेऊ नये, यासाठी लाभार्थीनी सादर केलेल्या विवाह नोंदणी दाखला, वर वधू यांचा शाळा सोडण्याचा दाखला व वर वधु यांच्या जातीच्या दाखल्यावर मूळ प्रतीच्या मागील बाजूस आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान देण्यात आले आहे, असा रबरी शिक्का मारण्यात यावा, अशी अट असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

7) शासन निर्णय दिनांक 30/01/1999 प्रमाणे समाजकल्याण विभागाने परिशिष्ट ड नमुन्यात नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी नोंदवही लेखापरिक्षणात उपलब्ध करून देण्यात आली नाही. तसेच परिशिष्ट ब ची माहिती समाजकल्याण समितीने तपासून त्यास अंतीम मान्यता घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारची नोंदवही ठेवली नाही व मान्यता घेतली नाही.

**3.802 शालांत पूर्व शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

लेखाशीर्ष - 2235 सामाजिक सुरक्षा कल्याण.

मंजूर तरतूद (शासकीय) - रूपये 2,98,000/-

प्रशासकीय मंजुरी आदेश -राजिप/सकवि/वाशी-1/2016-2017, दिनांक 15/10/2016

प्रमाणाक क्रमांक-74 दिनांक 07/03/2017 रुपये 1,14,000/-

जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाने लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची तपासणी केली असता शालांत पूर्व शिक्षण घेणाऱ्या 58 अपंग विद्यार्थ्यांना शासन निर्णय दिनांक 30/08/2014 अन्वये सुधारीत दरानुसार रुपये 1,14,000/- शिष्यवृत्तीचे वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक ईडीडी-2003/प्र.क्र.70/सुधार-2 दिनांक 15/11/2003 अन्वये 40 टक्के अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम 1995 प्रमाणे अपंगासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाने अपंग असल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. असे असतानाही 7 विद्यार्थ्यांनी प्रस्तावासोबत 40 टक्के व त्यावरील अपंग असल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडलेली नाही. महाराष्ट्र शासन, सामाजिक व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक ईडीडी-2003/प्र.क्र.70/सुधार-2, दिनांक 15/11/2003 अन्वये 40 टक्के अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम 1995 प्रमाणे अपंगासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाने अपंग असल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

2) विद्यार्थ्यांचे शाळेतील उपस्थितीबाबतचे अभिलेखे तापासणीसाठी उपलब्ध करण्यात आले नाही.

3) पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे यादीवर नमूद बँक खाते क्रमांकावर वाटप केलेली रक्कम महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 21 प्रमाणे संबधित विद्यार्थ्यांना रक्कम पोच झाल्याची पोच पावती तपासणीसाठी उपलब्ध झाली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/269/38, दिनांक 28/07/1989 अन्वये जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची फलश्रुती अहवाल प्राप्त करून मुल्यांकन होणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.803 इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग यांच्याकडील सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेबाबतची नस्ती तपासली असता त्यामध्ये 9 देयाकान्वये रक्कम रुपये 27,00,000/- पारित केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक- इमाव-2003/ प्र.क्र.201/ मावक-3, दिनांक 25/07/2003 अन्वये इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना मंजूर करण्यात आलेली असून प्रत्येक लाभार्थ्याला प्रती महिना रूपये 100/- प्रमाणे दहा महिन्यांसाठी रक्कम रुपये 1,000/- प्रमाणे मंजूर करण्यात आलेली आहे. तथापि, सदरील शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील अट क्रमांक 11(अ) नुसार संबधित मुख्याध्यापकांनी सही व शिक्क्यासह सादर केलेली माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लाभधारक लाभार्थी हे त्याच प्रवर्गातील व त्याच इयत्तेमध्ये शिक्षण घेत असल्याची खात्री करता आलेली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ मधील अट क्रमांक 8 नुसार शिष्यवृत्ती वाटप केल्याचे विनियोग दाखले हे पुढील वर्षाचे प्रस्ताव सादर करतांना सादर करणे आवश्यक असतांना मागील वर्षाचे विनियोग दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

3) उपरोक्त शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ मधील अट क्रमांक 11(ब) नुसार सदरील योजना वर्षातून तीनदा म्हणजेच जून व जुलै या महिन्यांकरिता 26 जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यांसाठी दिनांक 22 सप्टेंबर व ऑक्टोबर ते उर्वरीत कालावधीसाठी 3 जानेवारी या ठराविक दिवशीच प्रदान करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता एकत्रित माहे मार्च महिन्यात प्रदान करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

**3.804 20 टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीय वस्तीतील समाजमंदिर दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य देणेबाबत कामातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे आदेश क्रमांक सिंजिप/ सकनि-3/1755, दिनांक 28/12/2016 अन्वये रूपये 10,00,000/- व आदेश क्रमांक 2751 दिनांक 31/03/2017 अन्वये रूपये 20,00,000/- मिळून एकूण रक्कम रूपये 30,00,000/- एवढे वित्त प्रेषणाद्वारे अनुदान गटविकास अधिकारी स्तरावर वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेच्या अटीशर्तीनुसार काम पूर्ण दाखले, मोजमाप वहीची छायांकित प्रत व नमुना 65 विभागाकडे सादर करावयाचे आहे. गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांसकडून लेखापरीक्षण कालावधीपर्यंत काम पूर्णत्वाचे दाखले, मोजमापवहीची छायांकित प्रत व नमुना 65 विभागाकडे सादर करण्यांत आलेले नाहीत. तरी याबाबत सदरचे दाखले उपलब्ध करुन पूर्तता सादर करावी.

**3.805 जिल्हा परिषद अनुदानातून जूने घर दुरुस्ती अर्थसहाय्यबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जुने घर दुरुस्ती योजनेअंतर्गत लाभार्थी निवड ठराव क्रमांक 810 दिनांक 30/11/2016 अन्वये एकूण 100 लाभार्थी निवड करुन समाजकल्याण समितीने मंजूर केल्यानुसार प्रती घरकुलास रूपये 35,000/- याप्रमाणे एकूण रूपये 35,00,000/- एवढे अनुदान वित्त प्रेषणाद्वारे गटस्तरावर वितरीत करण्यांत आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेच्या अनुदान मंजूरी आदेशामध्ये दिलेल्या सूचनेनुसार संबंधित गट विकास अधिकारी यांजकडील उपयोगिता दाखले, काम पूर्णत्वाचे दाखले व मुल्यांकन दाखले लेखापरीक्षणांस उपलब्ध झाले नाहीत.

त्यामुळे अनुदानाच्या विनियोगाबाबत लेखापरीक्षणांस खात्री होत नाही व योजनेचा उद्देश सफल झाल्याचे दिसून येत नाही.

**3.806 दिव्यांग व्यक्तिंना घरकुलासाठी अर्थसहाय्य देणेबाबत झालेल्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर योजनेंतर्गत रूपये 45,00,000/- इतका निधी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे खालील आदेशाद्वारे गटविकास अधिकारी यांचे स्तरावर वित्त प्रेषणाद्वारे वितरीत करण्यांत आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे आदेश क्रमांक सिंजिप/सकवि/सकनि-3/2584, दिनांक 15/03/2017 अन्वये लाभार्थ्यांना रूपये 24,00,000/- इतके अनुदान वितरीत करण्यांत आले. तसेच आदेश क्रमांक सिंजिप/सकवि/सकनि-3/2720, दिनांक 30/03/2017 अन्वये लाभार्थ्यांना एकूण रूपये 21,00,000/- इतके अनुदान दिव्यांग व्यक्तिंना घरकुलासाठी गटविकास अधिकारी स्तरावर वितरीत करण्यांत आले. तथापि, संबंधित ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यांजकडील उपयोगिता दाखले व मूल्यांकन दाखले लेखापरिक्षणात तपासणीसाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे अनुदानाच्या विनियोगाबाबत लेखापरिक्षणांस खात्री होत नाही व योजनेचा उद्देश सफल झाल्याचे दिसत नाही. तरी सदरचे दाखले उपलब्ध करुन दप्तरी ठेवण्यात यावेत.

**3.807 नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना अंतर्गत योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षात समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक दवसु-2011/प्र.क्र.442/अजाक-1, दिनांक 20/12/2012 योजना प्रभावी राबविण्यासाठी अंशत: बदल करण्यात येवून नवबौध्द घटकांचा विकास योजना म्हणून योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. शासनाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे अंतर्गत दिनांक 31/03/2017 अखेर एकुण 2,245 कामांसाठी रक्कम रुपये 73,56,48,654/- तालुकास्तरावर ग्रामपंचायतींना वित्त प्रेषणादवारे वितरीत करण्यांत करणेत आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक दवसु-2011/प्र.क्र.442/अजाक-1, दिनांक 20/12/2012 योजना प्रभावी राबविण्यासाठी अंशत: बदल करण्यात येवून नवबौध्द घटकांचा विकास योजना म्हणून योजना कार्यान्वीत करण्यात येवून आदेशातील मार्गदर्शक सुचनानुसार सदर योजनेतील कामे दोन वर्षात पुर्ण करणे बंधनकारक असतांना सन 2016-2017 अखेर 2,245 कामे अपुर्ण आहेत. सदर कामांवर वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना नुसार ग्रामपंचायतीस बांधकामापोटी अनुदान वितरित करण्यात येवूनही लेखापरीक्षण पावेतो याबाबत वेळोवेळी शासन निर्णयातील अटी व शर्तींचे पालन करण्यात आलेले नाही.

2) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक दवसुयो/परिपुर्ण प्रस्ताव/का-12/95-96, दिनांक 01/12/1995 अन्वये अट क्रमांक 10 नुसार 1 वर्षाचे आंत काम पुर्ण न झाल्यास मंजूर रक्कम ग्रामपंचायतीकडून वसुल केली जाईल. तसेच सदरचा निधी इतर प्रयोजनार्थ वापर केल्यास ग्रामसेवक जबाबदार राहील व दिशाभूल केली असल्यास प्रशासकीय कार्यवाहीस पात्र राहील, असे नमूद असतांना सन 2016-2017 अखेर 2,245 कामे अपुर्ण आहेत. समाज कल्याण विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अशा मोठया स्वरुपातील रकमेचा इतर प्रयोजनार्थ वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.474/ वित्त-9, दिनांक 03/12/2011 नुसार अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजनांतर्गत 5 टक्के निधी कपात न करता ग्रामपंचायतींना मंजूर केलेल्या विकास कामांचा दर्जा राखून मंजूर केलेली कामे नियमानुसार पुर्ण करुन देयक प्रदान करतांना जी रक्कम शिल्लक राहील, ती ग्रामपंचायतीच्या स्व:निधीत भरणा केल्याचे दिसत नाही.

4) सदरची कामे मक्तेदारामार्फत केली असल्यास विक्रीकर विभाग, महाराष्ट्र राज्य, यांचेकडील अधिसुचना दिनांक 04/04/2012नुसार दिनांक 01/04/2015 पासून 5 टक्के मुल्यवर्धित कर कपात करुन शासन सदरी भरणा केलेबाबत समाज कल्याण विभागाने नस्तीसोबत दस्तावेज दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 अन्वये 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसुल केलेला नाही.

6) जिल्हाधिकारी, नाशिक यांचे पत्र क्रमांक जिनिस/कक्ष-12/संकीर्ण-801, दिनांक 29/07/2008 आणि पत्र क्रमांक 919, दिनांक 04/09/2008 नुसार पुर्ण-अपुर्ण कामांचे भूमीपूजन समारंभाकरिता स्थानिक लोक प्रतिनिधींना नियंत्रण दिलेचे अभिलेखे दिसून येत नाही. पुर्ण कामांबाबत कोनशिला, नामफलक, कामाचे नांव, योजना, मंजूर वर्ष, फोटो इत्यादी अभिलेखे उपलब्ध केलेले नाहीत.

7) पंचायत समीती स्तरावर सन 2016-2017 अखेर अनुदान वित्त प्रेषणाव्दारे वितरीत केले आहे. तथापि, संबंधीत गटविकास अधिकारी यांचेकडून विनीयोग दाखले प्राप्त केले नाही. त्यामुळे अनुदान खर्च झाल्याची खात्री करता आली नाही. तरी विनीयोग दाखले उपलब्ध करून अनुपालन दर्शवावे.

8) सन 2005-2006 ते 2016-2017 अखेर एकूण 2,245 अपुर्ण कामे अपुर्ण आहेत सदरची कामे विहित मुदतीत पुर्ण न केल्यामुळे जनता संबधित लाभा पासुन वंचित राहिली आहे व जास्त दिवस कामे अपुर्ण राहिल्यामुळे

केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत खुलासा करुन अपुर्ण कामे त्वरीत पुर्ण करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

9) शासनाकडील मंजुर अनुदानापैकी 90 टक्के अनुदान पंचायत समितीमार्फत ग्रामपंचायतीला अदा करण्यांत येते व उर्वरीत 10 टक्के अनुदान काम पुर्ण झाल्यानंतर अदा करण्यांत येते वरील 2,245 अपुर्ण कामांची 10 टक्के रक्कम रुपये 11,61,06,228/- जिल्हा परिषदेकडे सन 2016-2017 अखेर अखर्चीत आहे. वरील कामे वेळीच पुर्ण न झाल्यामुळे शासनाचा 10 टक्के निधी विनाकारण जिल्हा परिषदेकडे पडुन आहे. याबाबत साधार खुलासा करुन अपुर्ण कामे त्वरीत पुर्ण करण्यांत यावी व अखर्चित निधीचा विनियोग करुन दाखवावा.

**3.808 20 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतक-यांना शेतीसाठी ताडपत्री वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत रक्कम रुपये 49,98,990/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमूद वेळापत्रकानुसार झालेली नाही.

2) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.4. व परिशिष्ट क्रमांक 8 मधील संस्थांकडून साहित्याची तपासणी करणे आवश्यक आहे. तथापि, चाचणी अहवाल लेखापरीक्षणांत आढळून आला नाही. तरी चाचणी अहवाल प्राप्त करुन दाखवावा.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11ए, दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र 2 मार्गदर्शक सुचना क्रमांक 19 नुसार शासकीय योजनेंतर्गत पुरवठयासाठी निश्चित केलेल्या अवजारांचे दर त्याच अवजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा जादा आढळल्यास अशा अवजारांच्या फरक किंमती इतकी रक्कम संबधित पुरवठा संस्थेकडून वसुल करण्यात येईल, अशी तरतूद आहे. यानुसार खात्री करून आवश्यक कार्यवाही करावी.

4) संबधित पुरवठादार यांनी तालूका स्तरांवर ताडपत्रीचा पुरवठा करण्यांत आला असुन त्याबाबतच्या पोहच लेखापरीक्षणांत उपलब्ध झाल्या. परंतू, पोहचवर दिनांकित स्वाक्षरी घेतलेली नाही. फक्त दिनांक नमुद केलेले आहे. त्यामुळे साहित्य प्रत्यक्ष कधी पोहच केले, ते समजून येत नाही. तरी विहित मुदतीत ताडपत्री पोहच केल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी अन्यथा दंडाची कार्यवाही करुन पुर्तता दाखवावी.

5) मालेगांव गटांतील प्रस्ताव व साठा नोंदवहीची पडताळणी केली असता साठा नोंदवहीतील पान क्रमांक 16 वर 154 नग दिनांक 03/02/2017 रोजी जमा असल्याची नोंद आहे. परंतु, वाटप नग व शिल्लक नग ओढलेले नाहीत. तसेच 17 लाभार्थ्यांची नांवे नोंदवहीत नोंदऊन वाटप दर्शविलेली आहे. परंतु, संबधितांच्या ताडपत्री प्राप्त झालेबाबत स्वाक्ष-या घेतलेल्या नाही. त्यामुळे ताडपत्री संबधितांना मिळाल्याची खात्री होत नाही. तरी स्वाक्ष-या प्राप्त करुन दाखवाव्या अन्यथा ताडपत्रीची रक्कम रुपये 71,655/- संबधितांकडुन वसुलीस पात्र आहे.

6) मालेगांव गटांतील 6 लाभार्थ्यांची दुबार निवड केलेली आहे. तथापि, अदयापपर्यंत त्यांना ताडपत्रीचे वाटप केलेले नाही. त्यामुळे संबधितांच्या ताडपत्री शिल्लक आहेत. तरी संबधित लाभार्थ्यांची काय अधारे निवड करण्यांत आली, याबाबत खुलासा करावा व सदर ताडपत्रींचा विनियोग इतर पात्र लाभार्थ्यांना करुन पुर्तता दाखवावी अन्यथा रक्कम रुपये 25,290/- वसुलीस पात्र आहे.

7) मालेगांव गटांतील लाभार्थ्यांचे प्रस्तावांची पडताळणी केली असता 9 लाभार्थ्यांचे प्रस्तावासोबत जातीचे दाखले आढळून आले नाही. त्यामुळे सदरचे लाभार्थी मागासवर्गीय असल्याची खात्री होत नाही. त्यामुळे संबधितांना ताडपत्रीचा लाभ देय होत नाही. तरी संबधितांचे जातीचे दाखले उपलब्ध करुन दाखवावे अन्यथा ताडपत्रीची रक्कम रुपये 37,935/- संबधितांकडुन वसुल करुन जिल्हा परिषदनिधीत जमा करुन पुर्तता दाखवावी

8) तालूका स्तरांवरील साठा नोंदवहीची पडताळणी केली असता 4 गटांकडील ताडपत्री अदयापपर्यंत वाटप करण्यांत आलेल्या नाही. त्यामुळे संबधित शेतक-यांना योजनेचा लाभ झालेला नसुन जिल्हा परिषदेचा हेतू साध्य

झालेला नाही व जिल्हा परिषदेचा निधी विनाकारण अडकलेला आहे. तरी याबाबत खुलासा करुन वाटप न झालेले साहित्य त्वरीत वाटप करुन पुर्तता दाखवावी अन्यथा ताडपत्रीची रक्कम वसुलीस पात्र आहे.

9) तालूका स्तरावरील प्रस्ताव व साठा नोंदवहया अर्धसमास पत्र क्रमांक 02 दिनांक 28/11/2017 अन्वये मागणी करण्यात आली होती. तथापि, 6 तालूक्यांचे प्रस्ताव व साठा नोंदवहया लेखापरीक्षणांत उपलब्ध झाल्या नाही. त्यामुळे प्रत्यक्ष साहित्य कोणत्या दिनांकास प्राप्त झाले व कोणत्या लाभार्थ्यांस साहित्य वाटप केले, याबाबत खात्री करता आली नाही. तरी 6 तालुक्यांचे साहित्य वाटपांचे प्रस्ताव व साठा नोंदवहया प्राप्त करून लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

**3.809 गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदानातील अनियमितता**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,37,400**/-** खर्च करण्यात आलेला असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर योजना ही इयत्ता 5 वी ते 7 वी व 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या प्रवर्गातील विदयार्थ्यांकरिता असून अशाच पात्र विदयार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळू शकतो. परंतु, 57 विदयार्थी अनुसुचित जमातीचे असतांना सुध्दा अशा अपात्र विदयार्थ्यांना लाभ दिल्यामुळे गुणवत्ता शिष्यवृत्तीचे जादा प्रदान झालेले आहे. तरी जादा प्रदान झालेली रक्कम संबंधितांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन सादर करावे.

**3.810 जिल्हा परिषद उपकरातून 3 टक्के अनुदानातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर झेरॉक्स मशिन पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 14,98,046/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पंरास/1020/प्र.क.14/ 38, दिनांक 09/02/2001 नुसार साहित्य खरेदी करण्यापुर्वी लाभार्थीची निवड करणे आवश्यक आहे. तसेच परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार नियोजन व अंमलबजावणी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार लाभार्थीची मागणीनुसार तसेच लाभार्थी निवड यादीस जिल्हा परिषदेने सुधारित अंदाजपत्रकानुसार मंजूरी केल्याचा ठराव क्रमांक नमूद केलेला नाही.

2) सदर योजनांतर्गत लाभार्थीची निवड यादी व लाभार्थीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास तपासणीकामी मागणी करण्यात येवूनही उपलब्ध करण्यात आलेली नाही. याकामी अर्धसमासपत्र क्रमांक 01, दिनांक 23/10/2017 अन्वये मागणी करण्यात येवूनही उपलब्ध झालेली नाही. पुन्हा अर्धसमासपत्र क्रमांक 02, दिनांक 05/11/2017 अन्वये मागणी करण्यात येवूनही लाभार्थी प्रस्ताव व निवड यादी उपलब्ध झालेली नाही. लाभार्थी प्रस्ताव उपलब्ध न झाल्यामुळे योग्य लाभार्थीची निवड निकषानुसार झाली किंवा कसे, याबाबत अभिप्राय देता येत नाही. लेखापरीक्षणास लाभार्थी प्रस्ताव उपलब्ध न करुन देणे ही गंभीर बाब आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अपंग-2015/प्र.क्र.137/वित्ता-3, दिनांक 24/11/2015 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत पुर्नवसनासाठी स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणे योजनांतर्गत महाराष्ट्र शासन, समाज कल्याण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डिटीसी-2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 05/12/2016 तसेच शासन निर्णय क्रमांक व्हीआयपी-2016/प्र.क्र.24/वित्त 3, दिनांक 28/04/2016 मधील मार्गदर्शक सुचना, योजनेचे स्वरुप व अटी व शर्तीनुसार वस्तुची किंमत ग्रामीण स्थानिक स्वराज्या संस्थेने निश्चित करावी. तसेच सोबत लाभार्थी अर्ज, अपंग लाभार्थी वास्तव्यास असलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने अपंग लाभार्थ्यांस दिलेल्या लाभाचा अहवाल (खरेदी पावतीसह) ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा स्तरावर सादर करणेबाबत सुचना असतांना तसे अहवाल जिल्हा परिषद स्तरावर लेखापरीक्षणात उपलब्ध करण्यात आलेले नाही. म्हणजेच लाभार्थ्यांनी साहित्या खरेदी केलेबाबत खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.646/269, दिनांक 20/10/1999 अन्वये परिशीष्ट 4 नुसार विवरणपत्र “अ” मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

**3.811 जिल्हा परिषद वाढीव उपकरातून 20 टक्के अनुदानातून मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविणे योजना खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडील जिल्हा परिषद वाढीव उपकरातून 20 टक्के अनुदानाच्या रकमेतून समाज कल्याण विभागाने अनुसुचित जाती/जमाती शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर एचडीपीई व्यक्तिगत लाभाच्या योजनेवर रक्कम रुपये 69,89,840/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पंरास/1020/प्र.क.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार साहित्य खरेदी करण्यापुर्वी लाभार्थीची निवड करणे आवश्यक आहे. तसेच परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार नियोजन व अंमलबजावणी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार लाभार्थीची मागणीनुसार तसेच लाभार्थी निवड पंचायत समितीने मंजूरी केल्याचा ठराव क्रमांक नमूद केलेला नाही.

2) सदर योजनांतर्गत लाभार्थीची निवड यादी व लाभार्थीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास तपासणीकामी मागणी करण्यात येवूनही उपलब्ध करण्यात आलेली नाही. याकामी अर्धसमासपत्र क्रमांक 01, दिनांक 23/10/2017 अन्वये मागणी करण्यात येवूनही उपलब्ध झालेली नाही. पुन्हा अर्धसमासपत्र क्रमांक 02, दिनांक 05/11/2017 अन्वये मागणी करण्यात येवूनही लाभार्थी प्रस्ताव व निवड यादी उपलब्ध झालेली नाही. लाभार्थी प्रस्ताव उपलब्ध न झाल्यामुळे योग्य लाभार्थीची निवड निकषानुसार झाली किंवा कसे, याबाबत लाभार्थी पात्र आहे किंवा कसे, याबाबत सर्वसाधारण सभेची मंजूरी नाही. त्यामुळे अभिप्राय देता येत नाही. लेखापरीक्षणास लाभार्थी प्रस्ताव उपलब्ध न करुन देणे ही, गंभीर बाब आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.646/269, दिनांक 20/10/1999 अन्वये परिशिष्ट 4 नुसार विवरणपत्र “अ” मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक कृषीआ/1204/प्र.क्र.284/16ए, दिनांक 13/08/2004 अन्वये अपंग व्यकती समान संधी हक्काचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग अधिनियम 1995 व नियम 2001 नुसार कृषी विभागात राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये 3 टक्के अपंग शेतकरी लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. तसा लाभ अपंग शेतक-यांना दिलेला दिसून येत नाही.

5) योजना राबविण्यापुर्वी कोणत्या साहित्याची ग्रामस्थांची मागणी आहे. अशीच योजना राबविणे आवश्यक असतांना उपरोक्त योजनेसाठी शेतक-यांची मागणी दिसून येत नाही. मागणी नसतांना योजना राबविण्यात आलेली आहे.

6) सदर साहित्याचा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून (दिनांक 03/12/2016) 45 दिवसात पुरवठा करणे आवश्यक असतांना तळोदा येथे दिनांक 05/02/2017, अक्कलकुवा दिनांक 07/02/2017 व नवापूर दिनांक 05/02/2017 असा पुरवठा केलेला आहे. म्हणेजच उशिराने पुरवठा केल्यामुळे पुरवठा आदेशातील अटी व शर्ती क्रमांक 06 नुसार 45 दिवसाच्या आंत पुरवठा करण्यात यावा, अन्यथा किंमतीच्या 3 टक्के दंडात्मक रक्कम रुपये 2,09,695/- पुरवठादाराकडून वसुल केलेला नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्राप्त साहित्याचा गुणवत्तेबाबत अहवाल अप्राप्त आहे. पर्यायाने साहित्याच्या गुणवत्तेबाबतची खात्री करता येत नाही. पुरवठादाराने पुरविण्यात आलेल्या साहित्याचा गुणवत्ता व दर्जा तपासणी ही शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात येवून चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. परंतु, चाचणीसाठी पाठविण्यात आलेल्या साहित्यातून चाचणी अहवालासाठी साहित्य श्री.साई श्रीसीजन इर्स्टुमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आलेला नाही. कारण प्राप्त साठा नोंदवहीत चाचणी अहवालासाठी पाईप पुरविण्यात आलेला नाही. म्हणजेच प्राप्त साहित्याची

तपासणी केलेली दिसून येत नाही. यावरुन पुरविण्यात आलेल्या मालाची गुणवत्ता व दर्जाबाबत लेखापरीक्षणास खात्री करता येत नाही.

**3.812 जिल्हा परिषद वाढीव उपकरातून 20 टक्के अनुदानातून मागासवर्गीय 100 टक्के अनुदानावर सौरकंदिल पुरविणे योजना खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडील जिल्हा परिषद वाढीव उपकरातून 20 टक्के अनुदानाच्या रकमेतून समाज कल्याण विभागाने मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर सौरकंदिल व्यक्तिगत लाभाच्या योजनेवर रक्कम रुपये 49,,99,020/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पंरास/1020/प्र.क.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार साहित्य खरेदी करण्यापुर्वी लाभार्थीची निवड करणे आवश्यक आहे. तसेच परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार नियोजन व अंमलबजावणी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार लाभार्थीची मागणीनुसार तसेच लाभार्थी निवड जिल्हा परिषदने मंजूरी केल्याचा ठराव क्रमांक नमूद केलेला नाही.

2) सदर योजनांतर्गत लाभार्थीची निवड यादी व लाभार्थीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास तपासणीकामी मागणी करण्यात येवूनही उपलब्ध करण्यात आलेली नाही. याकामी अर्धसमासपत्र क्रमांक 01, दिनांक 23/10/2017 अन्वये मागणी करण्यात येवूनही उपलब्ध झालेली नाही. पुन्हा अर्धसमासपत्र क्रमांक 02, दिनांक 05/11/2017 अन्वये मागणी करण्यात येवूनही लाभार्थी प्रस्ताव व निवड यादी उपलब्ध झालेली नाही. लाभार्थी प्रस्ताव उपलब्ध न झाल्यामुळे योग्य लाभार्थीची निवड निकषानुसार झाली किंवा कसे, याबाबत लाभार्थी पात्र आहे किंवा कसे, याबाबत सर्वसाधारण सभेची मंजूरी नाही. त्यामुळे अभिप्राय देता येत नाही. लेखापरीक्षणास लाभार्थी प्रस्ताव उपलब्ध न करुन देणे ही, गंभीर बाब आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.646/269, दिनांक 20/10/1999 अन्वये परिशिष्ट 4 नुसार विवरणपत्र “अ” मध्ये नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक कृषीआ/ 1204/ प्र.क्र.284/ 16ए, दिनांक 13/08/2004 अन्वये अपंग व्यक्ती समान संधी हक्काचे संरक्षण आणी संपुर्ण सहभाग अधिनियम 1995 व नियम 2001 नुसार 3 टक्के अपंग लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. तसा लाभ अपंगाना दिलेला दिसून येत नाही.

5) योजना राबविण्यापुर्वी कोणत्या साहित्याची लाभार्थ्यांची मागणी आहे? अशीच योजना राबविणे आवश्यक असतांना उपरोक्त योजनेसाठी लाभार्थ्यांची मागणी दिसून येत नाही. मागणी नसतांना योजना राबविण्यात आलेली आहे.

6) सदर साहित्याचा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून (दिनांक 03/12/2016) 60 दिवसात पुरवठा करणे आवश्यक असतांना तळोदा येथे दिनांक 01/02/2017, नंदुरबार दिनांक 07/02/2017, शहादा दिनांक 07/02/2017 व नवापूर दिनांक 01/02/2017 रोजी पुरवठा केलेला आहे. म्हणेजच उशिराने पुरवठा केल्यामुळे पुरवठा आदेशातील अटी व शर्ती क्रमांक 06 नुसार 60 दिवसाच्या आंत पुरवठा करण्यात यावा, अन्यथा किंमतीच्या 3 टक्के दंडात्मक रक्कम रुपये 1,49,971/- पुरवठादाराकडून वसुल केलेली नाही. सदरची रककमा पुरवठादाराकडून वसुल करण्यात यावी.

**3.813 20 टक्के निधीतून मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परिषद स्वनिधीतून 20 टक्के निधीतून मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविलेल्या आहेत. सदरबाबत रक्कम रुपये 49,59,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 05/12/2016 नुसार विभागाने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तुंची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करुन पुर्णपणे खातर जमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बॅाक खात्यावर योजने अंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या खात्यावर जमा करेल.

2) दिनांक 30/03/2017 रोजी रूपये 54,000/- खर्च नमुद आहे. त्यासाठी विभागाने एकुण 6 लाभार्थ्याची निवड करुन प्रत्येकी रूपये 9,000/- प्रमाणे सबंधित लाभार्थ्यानी खरेदीच्या पावत्या विभागास सादर केलेल्या असुन लाभार्थ्याच्या खाती रकमा जमा केलेल्या आहे.

3) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 05/12/2016 नुसार लाभार्थीने साहीत्य खरेदी केलेल्यावर खरेदी केलेल्या वस्तुची व लाभार्थीने सदर वस्तु खरेदीची सादर केलेली पावतीची शहानिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थीच्या बॅक खात्यावर अनुदान रक्कम जमा करणे आवश्यक असतांना तसे न करता वित्त विभागाने दिनांक 31/03/2017 रोजी रुपये 49,05,000/- खर्च नोंद केला आहे व विभाग प्रमुख यांच्या नावे रक्कम रूपये 49,05,000/- जमा केली आहे. त्यामुळे वरील शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, विभागाने लाभार्थ्याची निवड न करता वित्त विभागाने रकमा विभाग प्रमुखाच्या नावाने जमा केली आहे. लेखापरीक्षणाच्या दिवसापर्यंत रक्कम रुपये 49,05,000/- विभाग प्रमुख यांचे बॅक खात्यात अखर्चीत आहे. सबब लाभार्थी निवड झालेली नसतांना फक्त खर्च नोदविण्याठी जिल्हानिधीमधुन रकमा काढल्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये प्रपत्रमध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, लाभार्थ्यांच्या नावाची गावनिहाय नोंदवही ठेवलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपी/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

6) तसेच लाभार्थी यांचे प्रस्ताव उपलब्ध झाले नाही. त्यामुळे योग्य लाभार्थी यांचीच निवड झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

**3.814 20 टक्के निधीतून मागासवर्गीयांसाठी पन्हाळी पत्रे पुरविणेबाबत**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद स्वनिधीतून 20 टक्के निधीतून मागासवर्गीयांना पन्हाळी पत्रे पुरविलेले आहेत सदर बाबत रक्कम रुपये 3484000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 05/12/2016 नुसार लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तुंची व सदर वस्तुच्या अनुषंगाने सादर केलेल्या पावतीची शहानिशा करुन व त्याबाबत पुर्णपणे खातर जमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजने अंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम लाभार्थ्याच्या बँक खात्यावर जमा करावयाची आहे.

2) विभागाने दिनांक 31/03/2017 रोजी रुपये 1,95,000/- खर्च नमुद आहे. त्यासाठी विभागाने एकुण 15 लाभार्थ्याची निवड करुन प्रत्येकी रूपये 13,000/- प्रमाणे सबंधित लाभार्थ्यानी खरेदीच्या पावत्या विभागास सादर केलेल्या असुन लाभार्थ्याच्या खाती रकमा जमा केलेल्या आहेत.

3) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 05/12/2016 नुसार लाभार्थीने साहित्य खरेदी केलेल्यावर खरेदी केलेल्या वस्तुची व लाभार्थीने सदर वस्तु खरेदीची सादर केलेली पावतीची शहानिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थीच्या बॅक खात्यावर अनुदान रक्कम जमा करणे आवश्यक असतांना तसे न करता वित्त विभागाने दिनांक 31/03/2017 रोजी रुपये 32,89,000/- खर्च नोंद केला आहे व विभाग प्रमुख यांच्या नावे रक्कम रुपये 32,89,000/- जमा केली आहे. त्यामुळे वरील शासन

निर्णयाचे उल्ल्ंघन झाले आहे यावरुन असे स्पष्ट होते की, विभागाने लाभार्थ्याची निवड न करता वित्त विभागाने रकमा विभाग प्रमुखाच्या नावाने जमा केली आहे. लेखापरीक्षणाच्या दिवसापर्यंत रक्कम रुपये 3289,000/- विभाग प्रमुख यांचे बॅक खात्यात अखर्चीत आहे. सबब लाभार्थी निवड झालेली नसतांना फक्त खर्च नोदविण्याठी जिल्हानिधीमधुन रकमा काढल्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये प्रपत्रमध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, लाभार्थ्यांच्या नावाची गावनिहाय नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे ठराविक लाभार्थ्यास शासकीय योजनेचा दुबार लाभ मिळण्यांची शक्यता नाकारता येत नाही नियंत्रण नोंदवही परिरक्षीत करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपी/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

6) तसेच लाभार्थी यांचे प्रस्ताव उपलब्ध झाले नाही. त्यामुळे योग्य लाभार्थी यांचीच निवड झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

7) शिवदास व्दारका महाले, काकोडा यांनी दिनांक 30/05/2017 रोजी साहीत्य खरेदी केल्याचे बील सादर केले आहे. परंतु, विभागाने त्यांना दिनांक 31/03/2017 रोजी रक्कम प्रदान केली आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार लाभार्थी यांनी साहित्य खरेदी केल्यानंतर त्याच्या खात्यामध्ये रक्कम जमा करणे आवश्यक असतांना दिनांक 31/03/2017 रोजी साहित्य खरेदी केली नसतांना रक्कम रुपये 13,000/- संबधीत लाभार्थीस अदा केली आहे. पुर्तता अनुपालन दर्शवावे.

**3.815 आदर्श कन्या वस्तीगृह भडगांव येथे विद्यार्थीची वस्तीगृहात उपस्थिती कमी असतांना अनुदान प्रदान केलेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

सन 2015-2016 या शालेय वर्षात वसतीगृहातील एका लाभार्थ्याची वर्षिक उपस्थिती 75 टक्के पेक्षा कमी असताना अनुदान रक्कम रूपये 9,000/- प्रदान करण्यात आलेले आहे.

समाजकल्याण सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसीएच-1098/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 चे सहपत्रातील अनुक्रमांक 7 मधील 8 (अ) नुसार वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची संपूर्ण वर्षाची उपस्थिती 75 टक्के किंवा त्याहून अधिक असल्यास विद्यार्थी मान्य संख्या एवढे पूर्ण अनुदान मिळण्यांस संस्था पात्र राहील. असे असतांना उपरोक्त विद्यार्थ्याची उपस्थिती 75 टक्के पेक्षा कमी असल्याने त्यांना नियमबाह्य अनुदान रक्कम रूपये 9,000/-प्रदान करण्यात आलेले आहे. नियमबाह्य प्रदान रक्कम रुपये 9,000/- वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

**3.816 प्रतिभा मागासवर्गीय छात्रालय मुलांचे वस्तीगृह कळमसरे तालुका अमळनेर येथे विद्यार्थीची वस्तीगृहात उपस्थिती कमी असतांना अनुदान प्रदान केलेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9 ते 12 व 14 ते 19) -** सन 2015-2016 या शालेय वर्षात वसतीगृहातील वर्षिक उपस्थीती 75 टक्के पेक्षा कमी असताना 11 वस्तीगृहांना अनुदान प्रदान करण्यात आलेले आहे.

समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसीएच-1098/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 चे सहपत्रातील अनुक्रमांक 7 मधील 8 (अ) नुसार वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची संपूर्ण वर्षाची उपस्थिती 75 टक्के किंवा त्याहून अधिक असल्यास विद्यार्थी मान्य संख्या एवढे पूर्ण अनुदान मिळण्यांस संस्था

पात्र राहील, असे असतांना उपरोक्त विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 टक्के पेक्षा कमी असल्याने त्यांना नियमबाह्य अनुदान रक्कम रूपये 4,59,000/- प्रदान करण्यात आलेले आहे.

**3.817 वस्तीगृहात मंजुर क्षमतेपेक्षा जादा विदयार्थींना प्रवेश दिलेबाबत**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसीएच-2007/प्र.क्र.152/मावक-4, दिनांक 31/10/2008 नुसार सदर वस्तीगृहात एकूण मंजूर विद्यार्थी संख्या नुसार वस्तीगृहात विविध संवर्गातील विद्यार्थी यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना टक्केवारी शिथील करण्यांचे अधिकार आहेत व त्यांचे मंजुर टिपणीनुसार विद्यार्थी प्रवेश देणे बंधनकारक असतांना सोबत जोडलेल्या परिशिष्ठात नमुद केलेनुसार मंजुर संवर्गातील विदयार्थी संख्येपेक्षा जादा विदयार्थी भरुन रक्कम प्रदान केली आहे. त्यामुळे मंजूरी नसतांना नियमबाहय रक्कम रूपये 1,35,000/- प्रदान करण्यांत आलेले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करावी.

**3.818 वसतीगृहांचे अनुदान निर्धारण झालेले नसतांनावसतीगृहांना नियमबाहय अंतिम 40 टक्के तसेच अग्रिम 60 टक्के (प्रथम हप्ता) रक्कम प्रदान केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** समाजकल्याण विभागाच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणावेळी, जिल्हा परिषद अधिनस्त असलेल्या 107 अनुदानित खाजगी वसतीगृहांना रक्कम रुपये 4,96,66,170/- परिपोषण अनुदान वाटप करण्यात आल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वसतिगृहांच्या अंतिम अनुदान निर्धारणाची प्रत लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 09/10/2017 अन्वये मूल्यनिर्धारणाची प्रत व इतर संबधित लेखे-अभिलेखे यांची लेखी मागणी करून देखील वसतिगृहांच्या नस्ती व्यतिरिक्त इतर कोणतेही दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. यावरून विभागाने 107 वस्तीगृहांचे 2014-2015 या वर्षाचे अंतिम अनुदान निर्धारण केले नसल्याचे स्पष्ट होते. सबब 2014-2015 या वर्षाचे वस्तीगृहांचे अंतिम अनुदान निर्धारण झालेले नसतांना देखील अंतिम हप्त्यापोटी नियमबाहय रक्कम प्रदान करण्यात आल्याने त्यापोटी झालेला खर्च रूपये 2,51,42,422/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक-बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 नुसार खाजगी अनुदानित वसतिगृहांना मागील वर्षी संस्थेने केलेल्या मान्य बाबींवरील एकूण खर्चाच्या 60 टक्के किंवा मंजूर संख्येनुसार प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या छात्राच्या सरासरी संख्येप्रमाणे 10 महिन्यांकरिता विहित दराने आकारण्यात येणाऱ्या रक्कमेच्या 60 टक्के याप्रमाणे अग्रीमाची गणना करून त्यानुसार रक्कम प्रदान करावयाची असून समाज कल्याण अधिकारी यांनी सदर वसतिगृहास भेट देवून वसतिगृह समाधानकारक चालू असल्याची खात्री करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्याशिवाय अग्रिम मंजूर करता येत नाही. तरी देखील 2016-2017 मध्ये 107 वसतिगृहांना 2014-2015 च्या अंतिम अनुदान निर्धारणाच्या आधारे 2015-2016 चा प्रथम हप्ता (60 टक्के) रूपये 2,45,23,748/- इतकी रक्कम अग्रिम म्हणून प्रदान करण्यात आली. तसेच समाज कल्याण अधिकारी यांनी वसतिगृह समाधानकारक चालू असल्याबाबत शहानिशा केली नसतांना देखील प्रथम हप्त्याचे वाटप करण्यात आल्याचे दिसून आले. तरी 2014-2015 या वर्षाचे वस्तीगृहांचे अंतिम अनुदान निर्धारण झालेले नसतांना व समाज कल्याण अधिकारी यांनी वसतिगृह समाधानकारक चालू असल्याची खात्री केलेली नसतांना 60 टक्के रक्कम अग्रीम म्हणून प्रदान करणे नियमबाहय ठरते. सबब रक्कम रूपये 2,45,23,748/- नियमबाहय अग्रिम म्हणून प्रदान केल्याचे स्पष्ट होते.

**3.819 20 टक्के मागासवर्गीय निधी मधून राबविल्यात आलेल्या नियमबाह्य योजनांबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभागाच्या 2016-2017 या वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी 20 टक्के मागासवर्गीय निधीमधून रक्कम रुपये 45,00,000/- तरतूद करून योजना राबविण्यात आल्याचे दिसून आले. सदरबाबत रक्कम रुपये 44,91,390/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2016-2017 मध्ये समाजकल्याण विभागाने (1) मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व इतर पुस्तके ग्रामपंचायतीना पुरविणे (2) मागासवर्गीय मुला-मुलींच्या अनुदानित वसतिगृहांसाठी सोलर वॉटर हिटर पुरविणे या दोन योजनांवर रूपये 44,91,390/- इतका खर्च केला असल्याचे दिसून आले. सदर योजनांचा समावेश ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक 20/10/1999 च्या शासन निर्णयामध्ये नसल्याने संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला तसेच तांत्रिक मंजुरी घेण्यात आली किंवा कसे, याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 8, दिनांक 27/10/2017 अन्वये खुलासा मागविण्यात आला. “सदर योजना ह्या मागील वर्षी 2015-2016 मध्ये राबविण्यात आलेल्या असून नव्याने (यापूर्वी न घेतलेल्या व यादीत समावेश नसलेल्या) घेणेत आलेल्या योजना आयुक्त, समाजकल्याण यांच्या मान्यतेने घेतल्या जातात”, असे उत्तरादाखल लेखी सादर करण्यात आले. संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर योजनांना तांत्रिक मान्यता प्रदान केल्याबाबत कोणतेही लेखे-अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही. अर्धसमासपत्राच्या सादर केलेल्या उत्तरावरून विभागाने मागीलवर्षी देखील सदर दोन्ही योजनांवर खर्च केल्याचे दिसून येते.

मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व इतर पुस्तके ग्रामपंचायतीना पुरविणे योजना राबवितांना ग्रामपंचायतींची निवड कोणत्या आधारे निश्चित करण्यात आली? कोणते निकष ठरविण्यात आले? स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक पदवीधर विद्यार्थी उपलब्ध होते का? त्यानुसार निवड करण्यात आली का? ग्रामपंचायतीची निवड करतांना सर्वेक्षण करण्यात आले का? ग्रामीण भागात/ग्रामपंचायत क्षेत्रात स्पर्धा परीक्षाकरीता पुस्तके देणे संयुक्तिक आहे का? तसेच पुस्तके खरेदीसाठी सक्षम प्राधिकारी यांचा तांत्रिक सल्ला घेण्यात आला का? इ. बाबीची विभागाने शहानिशा न करता योजना राबविण्यात आली. त्यामुळे योजनेचा मूळ उद्देश सफल झाला, असे म्हणता येत नाही. तसेच विभागाने दिलेल्या पुरवठा आदेशांनुसार (आदेश क्रमांक 105, दिनांक 16/03/2017) स्पर्धा परीक्षेव्यतिरिक्त इतर पुस्तकांची देखील खरेदी केली आहे. मागासवर्गीय मुला-मुलींच्या अनुदानित वसतिगृहांसाठी सोलर वॉटर हिटर पुरविणे या योजने अंतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या अनुदानित वसतिगृहांनां सदर योजनेचा लाभ देण्यात आला. सदर अनुदानित वसतिगृहे ह्या खाजगी संस्था असून समाजकल्याण विभागाकडून त्यांच्या खर्चाचे अनुदान निर्धारण करून अनुदानाची रक्कम त्यांना प्रदान करण्यात येत असते. अशा प्रकारच्या खाजगी संस्थाना त्यांच्या सोयी व सवलतीसाठी जिल्हा परिषदेने स्व:उत्पन्नातून सोलर वॉटर हिटर खरेदी करून पुरविणे संयुक्तिक ठरत नाही. विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित खाजगी अनुदानित वसतीगृहांची असून जिल्हा परिषदेने अशा बाबींवर खर्च करणे योग्य नाही. तसेच अशा प्रकारे संबंधित संस्थेला साहित्य उपलब्ध करून दिल्याने संस्थेच्या खाजगी मालमत्तेमध्ये वाढ होत असल्याने सदर लाभ खाजगी अनुदानित वस्तीगृहाना देय होत नाही

सबब विभागाने वरील परिस्थितीचे पूर्णपणे अभ्यासपूर्व नियोजन न करता योजना राबविल्याने आणि योजना राबविताना संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची तांत्रिक मंजुरी प्राप्त न करता दोन्ही योजनांवर झालेला खर्च नियमबाह्य झाल्याचे स्पष्ट होते. तरी शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या योजनांव्यतिरिक्त योजना राबविल्याने झालेला खर्च मान्य करता येत नाही.

**3.820 20 टक्के जिल्हा परिषद निधीमधून मागासवर्गीयांना पिको फॉल शिलाई मशिन वाटप करणेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** 20 टक्के जिल्हा परिषद निधीमधून मागासवर्गीयांना पिको फॉल शिलाई मशिन वाटप योजनेवर रक्कम रूपये 74,97,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस -2014/प्र.क्र./82/भाग - III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 चे नियम पुस्तिकेमधील परिच्छेद क्रमांक 4.1 नुसार ई - निविदेचे प्रकाशन ई-निविदा पोर्टल विकसित करुन ई - निविदा पोर्टलवर विभागाचे संकेतस्थळावर करणे अनिवार्य असेल. तथापि, याप्रमाणे ई- निविदा पोर्टल विकसित केलेले नाही. तसेच परिच्छेद क्रमांक 4.4.2 नुसार निविदा जाहीरात ही क्रमांक 3 नुसार 25 लाखाचे निविदा रक्कमेची जाहीरात एका राज्य स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. तथापि, याबाबतचे वर्तमानपत्राचे कात्रण उपलब्ध झाले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1999 अन्वये परि. 4 अन्वये विवरणपत्र अ मधील नोंदवही ठेवून लाभार्थ्यांची त्यात दरवर्षी नोंद घ्यावयाची आहे. तथापि, नोंदवही अदयावत व सर्व रकाने पूर्ण भरलेले नसलेने दुबार लाभ दिले नसलेबाबत मागील 5 वर्षाच्या लाभार्थ्यांच्या मंजुर यादिशी पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/2239/ 31, दिनांक 01/09/1993 फलश्रुती अहवाल देणेत आला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्रक्र-446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ठ ई मध्ये नमुद केलेप्रमाणे दिनांक 30/11/2016 पर्यत लाभार्थ्यांचे विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केलेली नाही.

5) पंचायत समितीकडून लाभार्थ्यास साहित्य वाटप झाल्याबाबतची साठा नोंदवही व मंजुर प्रस्ताव लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

6) समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद यांनी 20 टक्के जिल्हा परिषद निधीमधुन राबविलेले सन 2016-2017 या वर्षातील यादी तपासली असता एकाच कुठुंबातील व्यक्तीला सदर आर्थिक वर्षात लाभ दिलेला आहे. वसुलपात्र रक्कम *रूपये* 1,62,500/-

7) सदर योजना ही महिला व बाल कल्याण विभाग व समाजकल्याण या दोन्ही विभागातून राबविली जाते. सन 2015-2016 या आर्थिक वर्षातील महिला व बालकल्याण विभागाची पिको फॉल मशिन वाटपाची मंजुर यादी व सन 2016-2017 या आर्थिक वर्षातील समाजकल्याण विभागाकडील पिको फॉल मशिन वाटपाची मंजुर यादी याची तपासणी केली असता लाभार्थी दुबार झालेले आहेत. वसुलपात्र रक्कम रूपये 2,37,500/-

**3.821 अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या पाल्यांना मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सन 2016-2017 मध्ये एकुण 72 विध्यार्थ्यांना एकूण रक्कम रूपये 8,13,500/- शिष्यवृत्ती अदा केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी 2008/प्रक्र62 /माबक2 दिनांक 17 मार्च 2009 अट क्रं.मध्ये नमूद केले प्रमाणे सदर शिष्यवृती सर्वजाती धर्माला लागू आहे. ज्या व्यक्तीवरील अस्वछ व्यवसायात काम करतात, त्या व्यक्तीच्या मुलांना सादर शिष्यवृत्ती देण्यात येते. अस्वछ व्यवसाय करण्याऱ्या पालकच्या पाल्यासाठी शिष्यवृत्ती जातीच्या दाखल्याच्या आधारे देण्यात येईल तथापि, इतर समाजातील अस्वछ व्यवसाय करण्याऱ्या व्यक्ती अस्वछ व्यवसाय करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तथापि, काही विदयार्थ्यांचे रूपये 20/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी 2008/ प्रक्र62/माबक2, दिनांक 17/03/2009 अट क्रमांक 4ब सदर योजना विहित वेळापत्रकाप्रमाणे राबविणेबाबत कार्यवाही केलेली नाही. अर्जाची छाननी करुन जिल्हा समाजकल्याण कार्यालयास पाठविणे. सप्टेंबर महिना 1 ला आठवडा

पर्यंत समाजकल्याण कार्यालयास पाठविणेत येणेबाबतचे आदेश असताना त्याप्रमाणे प्राप्त अर्जाची कार्यवाही करणेत आली नाही.

3) सन 2015-2016 चे सदर शिष्यवृत्ती विध्यार्थ्यांना पोहोच झाल्याबाबत विनियोग दाखले लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत व सन 2016-2017 चे सदर शिष्यवृत्ती धारकांना त्यांच्या बँक खात्यावर इसीएसद्वारे पोहोच झाल्याबाबत सदर व्यवहाराचा युटीआर नंबर व बँक स्क्रोल लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने शिष्यवृत्ती रक्कमा संबंधित शिष्यवृत्ती धारकांना प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही

4) सन 2015-2016 मधील अखर्चित अनुदान रक्कम रूपये 7,85,750/- शासन निर्णय दिनांक 06/06/2008 अन्वये शासन निधीत भरणा करावा.

5) शिष्यवृत्यांचे दुबार प्रदान होऊ नये, यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागासमो /2000/पीआर करा.1239, दिनांक 01/09/1993 नुसार समाजकल्याण विभागाने मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.822 इयत्ता 5 वी ते 7 वी मागासवर्गीय मुलीना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** इयत्ता 5 वी ते 7 वी मागासवर्गीय मुलीना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेवर रक्कम रूपये 17,76,260/- अनुदान खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी-2003 /प्रक्र।417/माकव-2, दिनांक 31/03/2005 अन्वये मान्यता प्राप्त शाळा असल्याबाबत मुख्याधापकांचे प्रमाणपत्र तसेच शाळेचे मान्यता प्राप्त क्रमांक नमुद असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र तसेच शाळेचे मान्यता प्राप्त क्रमांक उपलब्ध न झालेने अदा केलेली शिष्यवृत्ती मान्यता प्राप्त शाळांना वितरीत केली असल्याची खात्री करता आली नाही.

2) सन 2015-2016 चे सदर शिष्यवृत्ती अनुदान मागासवर्गिय विद्यार्थीनींना पोहोच झाल्याबाबत विनियोग दाखले लेखापरिक्षणास उपलब्ध केलेली नाही व सन 2016-2017 चे सदर शिष्यवृत्ती अनुदान मागासवर्गीय विद्यार्थीनींना त्यांच्या बँक खात्यावर इसीएसद्वारे पोहोच झाल्याबाबत सदर व्यवहाराचा युटीआर नंबर व बँक स्क्रोल लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे संबधित शिष्यवृत्तीधारकास शिष्यवृत्ती रक्कम पोहोच झाल्याची खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रंमांक एसीबि2003/प्रक्र116माकव2, दिनांक 23/05/2003 चे सहपत्र 5 अन्वये विध्यार्थिनींची जेवढी उपस्थिती असेल, त्यानुसार शिष्यवृत्ती देण्यात येईल असे असताना जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाने शाळांकडील हजेरी रजिस्टरवरील उपस्थिती न पाहता सरसकट 100 ट्क्के उपस्थिती गृहित धरुन शिष्यवृत्ती अदा केलेली आहे

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सी आर/ 2239/31, दिनांक 01/09/1993 फलश्रुती अहवाल देणेत आला नाही.

5) प्रमाणक क्रमांक 1274 दिनांक 31/03/2017 अन्वये 3 शाळांना रूपये 6,600/- अदा केलेले आहे. अनुक्रमांक 3 मधील शाळा श्री.ज्ञानेश्वर विद्यानिकेतन शाळा, मावळ सदर शाळेचे बँक नाव, ब्रांच नाव, अकाऊंट नंबर नोंद नसतानाही रक्कम अदा केलेली आहे.

6) प्रमाणक क्रमांक 940 दिनांक 31/03/2017 अन्वये रूपये 4,800/- अदा केलेले आहेत. अनुक्रमांक 2 मधील शाळा भैरवनाथ विद्यालय, कुरुळी राजगुरूनगर सदर शाळेचे बँक नाव, ब्रांच नाव, अकाऊंट नंबर नोंद नसतानाही रक्कम अदा केलेली आहे.

7) प्रमाणक क्रमांक 941 दिनांक 31/03/2017 अन्वये 2 विद्यर्थीनींना रूपये 1,200/- अदा केलेले आहेत. अनुक्रमांक 5 मधील महाराज सायलीराव गायकवड पिंपळे जगताप सदर शाळेचे बँक नाव ब्रांच नाव, अकाऊंट नंबर नोंद नसतानाही रक्कम अदा केलेली आहे.

8) श्री. फिरंगाई माता विद्यालय, दौंड अन्वये 2 विद्यर्थीनींना रूपये 1,200/- अदा केलेले आहेत. सदर शाळेचे बँक नाव, ब्रांच नाव, अकाऊंट नंबर नोंद नसतानाही रक्कम अदा केलेली आहे.

9) प्रमाणक क्रमांक 941, दिनांक 31/03/2017 अन्वये 8 विद्यर्थीनींची नावे दुबार आदळून आलेली आहे वरील दोन्ही प्रमाणकाने दुबार खर्च नोंदलेली रक्कम रुपये 4,800+4,800=9,600/- वसूल करून शासन निधीत भरणा करणेत यावी.

**3.823 दलित वस्ती सुधार योजना.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 9,00,00,000/- खर्च करण्यात आला आहे. समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडील सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात दलित वस्ती सुधार योजना नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक दवसु-2011/प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 मधील परिशिष्ट अ मधील 11 नुसार जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी कामाची पाहणी करुन 100 टक्के काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर उर्वरीत 10 टक्के रक्कम ग्रामपंचायतीस अदा करावी, असे नमूद असतांना जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचे काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र व ना हरकत दाखला नस्तीसोबत पहावयास मिळाले नाही.

2) वितरीत केलेला निधी त्याच कारणासाठी वापरलेबाबत विनीयोग दाखले घेण्यात आलेले नाहीत.

3) ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन दिलेली रक्कम ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्या संयुक्त खात्यामध्ये ठेवावी व प्रत्यक्षात पुर्ण झालेल्या कामाचे मुल्यांकन करुन त्या त्या प्रमाणात रक्कम अदा करावी, असे उपरोक्त शासन निर्णय दिनांक 05/12/2011 मध्ये नमूद असतांना गटविकास अधिकारी यांनी अनुदान ग्रामनिधीकडे वर्ग केलेले आहे.

4) शासन निर्णय दिनांक 05/12/2011 मधील अनुक्रमांक 9 नुसार कामे त्याच आर्थिक वर्षात पुर्ण करणेबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) शासन निर्णय दिनांक 05/12/2011 मधील अनुक्रमांक 16 नुसार या याजनेअंतर्गत होणाऱ्या कामाची तपासणी इतर जिल्हयाच्या सहाय्यक समाजकल्याण अधिकाऱ्यामार्फत 5 टक्के वस्त्यांमधील कामाची तपासणी व आयुक्त समाजकल्याण यांचेमार्फत 2 टक्के वस्त्यांमधील कामाची तपासणी शासन स्तरावरुन करण्यात येईल, असे नमूद असतांना तशी कार्यवाही केल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

**3.824 जिल्हा परिषद सेस 20 टक्के राखीव निधी अंतर्गत मागासवर्गीयांना घरघंटी पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा सन 2016-2017 मध्ये जिल्हा परिषद सेस 20 टक्के राखीव निधी अंतर्गत मागासवर्गीयांना घरघंटी पुरविणेवर प्रमाणक क्रमांक 437, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 11,34,900/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची योजनेस तांत्रिक मान्यता आदेश क्रमांक सकवि/तां/मा/20 टक्के/99-2000 क्रमांक12/979, दिनांक 09/10/2000 नुसार लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाल्याबाबत विनीयोग दाखले लेखापरीक्षणास प्राप्त झालेले नाहीत.

2) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासकीय मान्यता मंजूर टिपणी दिनांक 29/06/2016 नुसार प्रस्तावासोबत सादर केलेल्या सर्व झेरॉक्स प्रती सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेल्या नाहीत.

3) समाजकल्याण अधिकारी यांचेकडील तांत्रिक मान्यता मंजूर टिपणी दिनांक 08/08/2016 नुसार काही प्रस्तावांसोबत लाभार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नाही. त्यामुळे लाभार्थ्याचे वय 18 ते 50 वयोगटातील असल्याची खात्री करता आली नाही.

4) समाजकल्याण समिती ठराव लाभार्थी निवड दिनांक 13/10/2016 दिनांक 03/12/2016 व 12/03/2017 नुसार चेतना धनंजय माखरे रा. बुध, ता. खटाव यांचा प्रस्ताव खरेदी पावती व मोक्का तपासणी अहवाल प्राप्त झालेला नाही.

5) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूर टिपणी दिनांक 20/03/2017 नुसार प्राप्त प्रस्ताव अहवाल नोंदवहीवर सभापती यांची सही नाही. ठराव क्रमांक व दिनांक नमूद नाही. समाजकल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

6) प्राप्त प्रस्ताव व अहवाल नोंदवहीवर 8 लाभार्थ्यांची नोंद नाही.

**3.825 जिल्हा परिषद सेस 20 टक्के राखीव निधीतून मागासवर्गीय कल्याण कार्यक्रम अंतर्गत समाजमंदिरांना सतरंजी पुरविणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** जिल्हा परिषद, सातारा समाजकल्याण विभागातील जिल्हा परिषद सेस 20 टक्के राखीव निधीतून मागासवर्गीय कल्याण कार्यक्रम अंतर्गत समाजमंदिरांना सतरंजी पुरविणेचे लेखे तपासले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी2316/प्र.क्र.133/का1417, दिनांक 05/12/2016 नुसार विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करण्याबाबतचे आदेश असून जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाने स्वत: खरेदी प्रक्रिया काय आधारे केली, याचा खुलासा करण्यात यावा.

2) प्राप्त प्रस्ताव नोंदवहीवर मंजूरीबाबत सभापती यांची स्वाक्षरी नाही. तसेच समाजकल्याण समिती ठराव क्रमांक व दिनांक नमूद नाही. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांची स्वाक्षरी नाही.

3) सतरंजी नग-2 माण (दहिवडी) ला दिलेले आहेत. त्याची नोंद प्राप्त प्रस्ताव नोंदवहीला नाही.

4) 97 सतरंजी 11 तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील समाजमंदीरांना वाटप करण्यात आल्या आहेत. परंतू, त्यांच्या पोहोच लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत.

**3.826 वसंत घरकुल योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद सांगली सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात वसंत घरकुल योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय व्यक्तींना नवीन घर बांधणीस मदत करण्याची योजना आहे. सुधारित अंदाजपत्रकात सन 2015-2016 च्या घरासाठी रुपये 2,17,37,000/- व सन 2016-2017 साठी रुपये 1,00,00,000/- अशी एकूण रुपये 3,17,37,000/- ची तरतूद मंजूर आहे. निवडलेल्या लाभार्थ्यापैकी 66 लाभार्थ्यांना रुपये 75,000/- अनुदानापैकी अनुदान वर्ग केले आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमासामध्ये सन 2012-2013 ते 2015-2016 पर्यंत या योजनेतील किती लाभार्थ्यांना लाभ दिला होता, त्यापैकी किती लाभार्थ्यांनी घरकुले पुर्ण केली व अपुर्ण घरकुलामध्ये किती अनुदान गुंतुन राहिली याची विचारणा केली होती. त्यानुसार केवळ चार तालुक्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली होती. यावरुन चार तालुक्यातील 59 घरकुले असुन 12 घरकुले रद्द केले असून यामध्ये रुपये 35,92,750/- इतका निधी गुंतुन राहिला आहे ही अपुर्ण घरकुले त्वरीत पुर्ण करुन घ्यावीत, अन्यथा त्यांना अदा केलेली रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे इतर 6 तालुक्यातील माहिती घेवून वर सनमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. उर्वरित उपपरिच्छेद बाबत केलेला खुलासा समाधान कारक नाही.

2) सदर योजना एक कोटीची असताना या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्रक्र/680/वित्त 9, दिनांक 31/01/2013 अनुसार आयुक्त, समाजकल्याण यांना असताना त्यांना तांत्रिक मान्यतेस प्रस्ताव दिला असताना त्यांनी तांत्रिक मान्यता देण्यास नकार दिल्यामुळे या योजनेची रक्कम कमी करुन रुपये 50 लाखाची केली. त्यामुळे शासन निर्णयाप्रमाणे तांत्रिक मान्यतेच्या कक्षा टाळण्याच्या दृष्टीनेच योजनेची रक्कम कमी केली. या अनियमिततेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान 20 टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी घ्यावयाच्या योजना यासाठी ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास /1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील बाब 7 नुसार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी वार्षिक आखणीसाठी योजनेचा सर्वसाधारण कार्यक्रम आखण्यात आला आहे त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

4) उपरोक्त नमूद केलेल्या शासन निर्णयातील बाब क्रमांक 4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांच्या निवडीमध्ये अनियमितता येवू नये, म्हणुन लाभार्थ्यांची नोंदवही तयार करुन त्यामध्ये गावनिहाय/ जातनिहाय लाभार्थ्यांच्या याद्या तयार करुन यामध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी करण्याची कार्यवाही केली नाही.

**3.827 दलित वस्ती सुधारणा योजनेतील विकास कामाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** गट विकास अधिकारी यांचे प्रस्ताव विचारात घेवून अनुसुचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करण्यासाठी 232 ग्रामपंचायतीच्या कामासाठी रुपये 1,54,06,000/- मंजूरी दिली या मंजूर केलेल्या कामापैकी इतक्या कामासाठी अनुदानाचा पहिला हप्ता वित्त प्रेषणाने पंचायतीना वर्ग करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु/2011/प्रक्र 442/अजाक, दिनांक 05/12/2011 अनुसार अनुदानाचे वितरण लोकसंख्येच्या प्रमाणात केले असल्याबाबत खात्री होत नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयामधील परिशिष्ट अ मधील बाब क्रमांक 1 मध्ये नमूद केल्यानुसार कामावर प्राथमिक नियंत्रण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, संबंधित उपअभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांची राहील. तसेच कामे मंजूर झालेनंतर शक्यतो कामे त्याच आर्थिक वर्षात पुर्ण करावीत कोणत्याही परिस्थितीत काम मंजूर केल्यापासुन एक वर्षाच्या आत संबंधित ग्रामसेवकाच्या सहाय्याने पुर्ण करण्याची जबाबदारी त्या त्या गटविकास अधिकारी यांची राहील. असे असताना सन 2011-2012 पासुन दलित वस्ती कामे अपुर्ण असुन या एकूण 502 अपुर्ण कामांत एकूण गुंतलेली रक्कम रुपये 19,28,59,300/- ही पहाता अपुर्ण कामे सत्वर पुर्ण करुन घेणे आवश्यक आहे.

3) शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील बाब क्रमांक 9 मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या गावातील कामे अपुर्ण असतील, त्या पंचायतीना पुढील 2 वर्षे निधी देवू नये, असे असतानाही कामे दिली आहेत.

**3.828 अनुदान निर्धारण प्रमाणे स्वेच्छा संघटनानी चालवलेल्या मागासवर्गीय वस्तीगृहाना परिपोषण अनुदान जादा अदा झाल्याबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 च्या तयार केलेल्या सुधारित नियमान्वये स्वेच्छा संघटनानी चालवलेल्या चौतीस (प्लान) मागासवर्गीय वस्तीगृहाना सन 2014-2015 या वर्षाकरिता प्रत्यक्ष अनुदान निर्धारणप्रमाणे प्रमानक क्रमांक 18 दिनांक 07/07/2016 अन्वये अंतिम 40 टक्के परिपोषण सहायक अनुदान रक्कम रूपये 40,02,519/- अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक विभशा-2010/प्र.क्र.06/विजाभज-2, दिनांक 29/12/2012 प्रमाणे दिनांक 01/01/2011 पासून निवासी विद्यार्थ्यासाठी दर महा 900/- परिपोषण दर

निश्चित केलेला आहे. उपरोक्त दिनांक 16/03/1998 च्या नियमावलीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या परिपोषणवर झालेला प्रत्यक्ष खर्च किंवा मंजूर विद्यार्थ्यांच्या प्रमाणात रूपये 900/- च्या मर्यादेत 10 महिन्यासाठी देय रक्कम यापैकी जी कमी असेल, ती रक्कम सहायक अनुदान म्हणून देय आहे. हिंद कन्या छात्रालय टाकाळा, कोल्हापूर यांचा मान्य पट 60 असून सन 2014-2015 चा अनुदान निर्धारण नस्तीप्रमाणे मान्य बाबीवरील प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 5,19,900/- इतका आहे. वार्षिक सरासरी उपस्थिती 75 टक्के असल्याने त्या प्रमाणात (विद्यार्थी 54 x 900 x 10 महिने) रक्कम रूपये 5,40,000/- इतके परिपोषण अनुदान परिगणना करून अदा केले आहे. वास्तविक संस्थेने केलेला प्रत्यक्ष खर्च हा परिगणना केलेल्या अनुदानापेक्षा कमी असल्याने नियमातील तरतुदीप्रमाणे संस्थेने केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या म्हणजे रक्कम रूपये 5,19,000/- च्या 75 टक्के 3,89,925/- इतके परिपोषण अनुदान देय असताना ते रक्कम रूपये 5,40,000/- अदा केल्याने रक्कम रुपये 1,50,075/- इतके सहयक अनुदान अतिप्रदान झाले आहे. ते वसूल होणे आवश्यक आहे.

2) तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह शिवनगे यांचा पट 54 इतका असून वर्षिक सरासरी उपस्थिती 34 इतकी आहे. उपस्थितीच्या प्रमाणात 34 x 900 x 10 महिने = 3,06,000/- अनुदान देय असताना 60 टक्के अग्रिम अनुदान व 40 टक्के अंतिम अनुदान अशी एकूण रक्कम रूपये 4,84,000/- अदा केल्याने रक्कम रूपये 1,78,000/- नियमबाह्य जादा अदा केली आहे. ती वसूल होणे आवश्यक आहे.

3) पराशर वस्तीगृह पारगाव यांचा पट 48 इतका असून वर्षिक सरासरी उपस्थिती 22 इतकी आहे. उपस्थितीच्या प्रमाणात 22 x 900 x 10 महिने = 1,98,000/- अनुदान देय असताना 60 टक्के अग्रिम अनुदान रक्कम रूपये 2,91,000/- अदा केल्याने रक्कम रूपये 93,000/- नियमबाह्य जादा अदा केली आहे. ती वसूल होणे आवश्यक आहे.

4) परिशिष्ठ क्रमांक 1 मध्ये नमूद केल्या प्रमाणे 15 वस्तीगृहांचे शासन मान्यतेचे आदेश अनुदान निर्धारण नस्तीसोबत सादर केलेले नाहीत. सदर आदेश प्रत समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद यांनी मागणी करूनही या संस्थांनी शासन मंजुरी आदेश प्रत सादर केलेली नाही. त्यामुळे त्यांना अदा परिपोषण अनुदान व कर्मचारी मानधन बाबतची अनुज्ञेयता लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही. त्यामुळे सदर वस्तीगृहांना आदा अनुदान रक्कम मान्य करता येत नाही.

5) अनुदान निर्धारण नियमावली दिनांक 04/11/1995 प्रमाणे वसतिगृहाच्या खात्यावर किमान रुपये 10,000/- इतकी व्यवस्थापनकरीता कायम ठेव रक्कम शिल्लक असणे आवश्यक आहे. परंतु, अनुदान निर्धारण अहवालासोबत याबाबतचा पुरावा घेण्यात आलेला नाही. त्यामुळे शासकीय नियमाचे उल्लंघन झाले आहे.

**3.829 वीस टक्के राखीव निधीतून विद्यार्थ्यांना स्कूल बॅग पुरवणे**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषदेने प्रती वर्षी त्यांना मिळणाऱ्या एकूण उत्पनाच्या वीस टक्के इतकी रक्कम अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व नवबौद्ध यांच्यासाठी राखून ठेऊन मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनावर खर्च करणे बंधनकारक आहे. समाजकल्याण विभागाने सन 2016-2017 करिता सदर राखीव निधीतून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कूल बॅग पुरवणे करिता प्रमानक क्रमांक 81 दिनांक 14/12/2016 अन्वये प्रती नग 245 दराने 10,204 नग खरेदीची रक्कम रूपये 24,99,800/- अर्णव सप्लायर्स, सांगली यांना ई-निविदाद्वारे निश्चित केलेल्या दराने अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.78/34 दिनांक 20/10/1999 प्रमाणे लाभार्थी निवडीची कार्य पद्धती निश्चित केली आहे. त्याप्रमाणे लाभार्थी निवड ही ग्रामसभेत करणेची आहे. ग्रामसभेत निवड केलेले लाभार्थी यादी गट विकास अधिकारी यांनी छाननी करून जिल्हा परिषद, समाजकल्याण विभाग यांना सादर केल्यानंतर समाजकल्याण समितीने त्यास मान्यता देऊन साहित्य खरेदी करण्याची आहे. तथापि, गट विकास अधिकारी यांनी प्रस्तावित केलेली प्रमाणित लाभार्थी यादी प्रत उपलब्ध करण्यात आली नाही.

2) समाजकल्याण समितीने खाली नमूद केल्याप्रमाणे गटनिहाय लाभार्थी व त्यांची संख्या निश्चित केले असताना प्रत्यक्षात त्यापेक्षा कमी जादा स्कूल बॅग पुरवठा केल्या आहेत. त्यामुळे 2,532 लाभार्थी निश्चित नसताना 2532 * 245 = 6,20,340/- इतक्या रकमेचे अनावश्यक व नियमबाह्यपणे स्कूल बॅग खरेदी करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) खरेदी बॅग स्पेसिफिकेशनप्रमाणे पुरवठा केला असल्याबाबत तांत्रिक तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही. त्यामुळे पुरवठा स्कूल बॅगचा दर्जा योग्य असल्याबाबत पडताळणी करता आली नाही

4) सदर खरेदीकरीता रूपये 1,600/- इतक्या रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना असा करार न केल्याने शासकीय नियमाचे उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे मुद्रांकापासून शासनास मिळणारा महसूल बुडाला आहे. सबब मुद्रांकाची रक्कम रूपये 1,600/- मक्तेदार कडून वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.830 इयत्ता 5 वी ते 10 च्या मागासवर्गीय मुलांना सायकल पुरविणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणात 20 टक्के राखीव निधीतून इयत्ता 5 वी ते 10 वी मध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय मुलांना सायकल वाटप करणे योजनेवर रक्कम रूपये 32,97,300/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेअंतर्गत तालुक्याकडुन प्रस्तावीत केलेली लाभार्थी संख्या, तालुक्यांना पुरवठा नग, लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वाटप नग व शिल्लक नग यांचा आढावा घेतला असता लाभार्थी निवड झाली नसताना सायकली खरेदी केल्याचे दिसून येते.

2) 135 लाभार्थी निवड झाली नसल्यामुळे गटस्तरावर साहित्य शिल्लक राहिले. लाभार्थी निवड नसताना अनावश्यक साहित्य खरेदी केल्याने (135 X 3790/-) रुपये 5,11,650/- निधी गुंतून पडला आहे.

3) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 13 नुसार सायकल पंचायत समिती स्तरावर पोहोच करणेपुर्वी शासन मान्य संस्थेकडुन तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक होते. पंचायत समिती हातकणंगले, शिरोळ व करवीर यांना प्रत्यक्ष सायकली पुरवठा केलेनंतर 4 महिन्यांनी तंत्र निकेतन तपासणी अहवाल सादर केलेला आहे. उर्वरित तालुक्याचे तपासणी अहवाल उपलब्ध झाले नाहीत.

4) सायकल पुरवठा केलेल्या डिलिव्हरी चलनावर दिनांक नमूद नाही. गट विकास अधिकारी यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही.

5) आजरा, गगन बावडा, गडहिंग्लज, हातकणंगले, कागल, पन्हाळा गटाकडील गट विकास अधिकारी यांनी शिफारस केलेली लाभार्थी यादी उपलब्ध झाली नाही.

6) लाभार्थी प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे योजनेच्या अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला, हे पडताळता आले नाही.

**3.831 20 टक्के राखीव निधीतून मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधन व उपकरणे अंतर्गत दळप संयत्रे मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे अंतर्गत दळप सयंत्र मशिन पुरविणेबाबत प्रमाणक क्रमांक 176 दिनांक 03/01/2017 रककम रुपये 23,89,410/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 66 लाभार्थ्यांची निवड नसताना खरेदी केल्याने 66*12,510 = रूपये 8,25,660/- इतक्या रकमेची अनावश्यक खरेदी केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर रक्कम लेखापरीक्षणास वसुलपात्र ठरते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय मागास 1098/प्र.क्र.78/34, दिनांक 20/10/1999 प्रमाणे लाभार्थी निवडीची कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्याप्रमाणे लाभार्थी निवड ही ग्रामसभेत

करणेची आहे. ग्रामसभेत निवड केलेले लाभार्थी यादी गट विकास अधिकारी यांनी छाननी करून जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग यांना सादर केल्यानंतर समाजकल्याण समितीने त्यास मान्यता देऊन लाभार्थ्यी निवड करण्याची आहे. तथापि, गट विकास अधिकारी यांनी प्रस्तावित केलेली प्रमाणित लाभार्थी यादी प्रत उपलब्ध करण्यात आली नाही.

3) डिलिव्हरी चलने दिनांक 09/11/2016 ची आहेत मशिन मिळालेबाबतची लाभार्थ्याची पोहोच नाही. विनियोग दाखले नाहीत.

4) मागील लाभार्थ्याच्या स्वयंरोजगारात व त्यांचे आर्थिक स्थितीचा आलेख व फलश्रुती अहवाल उपलब्ध झाला नाही. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक मागास/1098/प्रक्र78/34 दिनांक 20/10/1999 नुसार मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

5) डिलिव्हरी चलनामध्ये दळप सयंत्र मशिनचे स्पेसिफिकेशन नमूद नाही. तसेच चलनावर दिनांकीत पोहाच नाही.

6) खरेदी करार लेखी स्वरूप देण्यात आले नाही. दिनांक 20/11/2016 चे रुपये 500/- चे तीन स्टँप करारनामे कोरे आहेत.

7) एकूण खर्च रुपये 23,89,410/- च्या रकमेतून 10 टक्के सुरक्षा ठेव रुपये 2,38,941/- व 2 टक्के टीडीएस रुपये 47,788/- असे एकूण रुपये 2,86,729/- वजा करुन प्रत्यक्ष देय रककम रुपये 21,02,681/- असताना प्रत्यक्ष संबधितास रककम रुपये 1,57,681/- आदा केलेली आहे. रक्कम रुपये 55,000/- जादा अदा केलेले आहेत. रक्कम रुपये 55,000/- संबंधिताकडुन वसुलात आणावे.

**3.832 अपंग शाळांना वाटप करण्यात आलेल्या अनुदानातील इमारत भाडे व इतर त्रुटींबाबत**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** समाजकल्याण विभागाने सन 2016-2017 मध्ये अपंग शाळांना अनुदान वाटप केलेले आहेत. अनुदान निर्धारणाच्या नस्ती तपासल्या असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी इमारतीचे भाड्याचे मुल्यांकन करून प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे व असे प्रमाणपत्र असेल, तरच संबंधित संस्थेस इमारतचे भाडे अदा करण्यात यावे, असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करून अनियमितता केलेली आहे.

सदर संस्थेबाबत दिनांक 01/08/2001 ते 31/03/2008 एवढ्या कालावधीचे रक्कम रूपये 6,71,500/- इतके भाडे थकीत असल्याबाबत अध्यक्ष, नगरपालिका, पंढरपूर यांचे दिनांक 27/09/2007 चे पत्र नस्तीस जोडलेले आहे. सदर पत्रावरच इमारत भाडे अदा करून अनियमितता केलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे इमारत भाड बाबतचे प्रमाणपत्र नस्तीस उपलब्ध नाही. त्यामुळे अदा केलेली रक्कम रूपये 2,29,500/- वसूल करण्यात येत आहेत.

2) मंगलदास अस्थिव्यंग मराठी निवासी शाळा,सोलापूर :-

सदर नस्तीस सन 2015-2016 चा सनदी लेखापाल यांचा अहवाल जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर अहवाल असल्याशिवाय अनुदान वाटप करु नये, असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करून अनियमितता झालेली आहे व रकमेचे अतिप्रदान झालेले आहे. त्यामुळे रक्कम रूपये 67,183/- वसूल करून भरणा केल्याची पूतर्ता सादर करावी. सदर संस्थेने अनुदानाची मागणी ही विहित कालावधीत केलेली नाही. त्यामुळे दंड आकारण्यात यावा. एकूण अनुदानाच्या 5 टक्के रक्कम रूपये 3,359/- ही दंड म्हणून वसूल करण्यात यावी.

**3.833 अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे योजने अंतर्गत अपूर्ण बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रूपये 25,57,97,898/- अनूदान शिल्लक राहिले आहे. सन 2014-2015 व सन 2015-2016 मधील काही पूर्ण झालेल्या कामांच्या नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीत काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नसून प्रस्तावाला तांत्रिक मंजुरात घेण्यात आली नाही. काही अंतिम देयकाचे संबधीत ग्रामपंचायतीला प्रत्यक्ष भेट दिल्याचा ग्रामपंचायत शेरे बुकातील भेटी दरम्यानचा तपासणी अहवाल आढळला नाही.

2) समाजकल्याण विभागाकडून 80 टक्के रक्कम देते वेळी मंजूर ग्रामपंचायतचे कामाकरीता तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही. एकूण मंजूर कामाचे रक्कमेचे 80 टक्के एवढी सरसकट रक्कम त्या त्या ग्रामपंचायतीस देण्याकरीता पंचायत समिती स्तरावर वितरीत करण्यात आली. रक्कम वितरीत करतेवेळी तांत्रिक मंजुरी नसल्याने काही ग्रामपंचायतचे कामाचे बाबीमध्ये व अदांजीत रक्कमेत बदल झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) काही कामावर माहिती फलकाचा फोटो लावलेला नाही. त्यामुळे फलकाची रक्कम व दंडाची रक्कम वसूल करण्यात यावी.

4) नाईक प्लाट कांडली येथे 8 कामावर प्रत्यक्षात माहिती फलक लावण्यात आला नसुन कॉम्प्यूटरव्दारा त्यामध्ये adjustment करुन तसा माहिती फलक लावण्यात आल्याचे दर्शविण्यात आले. असे कॉम्प्यूटराइज फोटोमध्ये दिसते. नस्तीची तपासणी केली असता त्यात प्रत्यक्षात कामाचे स्थळाची पाहणी केलेल्या निरीक्षक अहवालात तसे नमूद आहे. मात्र दंड व वसुलीबाबत काहीही कार्यवाही केलेली दिसत नाही. तसेच बेनोडा येथे सुध्दा अशाच प्रकारचे 9 कॉम्प्यूटराइज माहिती फलक लावलेले फोटोमध्ये आढळून आले. त्यामुळे माहिती फलकाची रक्कम 8 x 3,000 = रूपये 24,000/- + 9 x 3,000/- = रूपये 27,000/- असे एकूण रूपये 51,000/- संबंधीतावर जबाबदारी निश्चित करून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. वरील सर्व कामावरील फरकाची रक्कम रूपये 51,000/- वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

5) ग्रामपंचायतचे रोखपुस्तकात 20 टक्केची मागणी करतांना कामपूर्ण झाल्याबाबतचे व त्यावर एकूण रक्कम खर्च झाल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? ग्रामपंचायतचे रोखपुस्तकात 20 टक्के खर्चाबाबत नोंद घेतली आहे काय? याबाबत खुलासा करावा.

### 3.834 20 टक्के जिल्हा निधीतुन मागासवर्गीयांना टिनपत्रे पुरविणे.

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2015-2016 मधील टिन पत्रे खरेदी बाबतची रक्कम रूपये 22,45,080/- सन 2016-2017 चे माहे जुलै 2016 मध्ये अदा करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 चे टिन पत्रे खरेदीकरीता पुरवठाधारक श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगरकडून 25 लक्ष करीता रूपये 1,600/- चे स्टँप पेपर (मुद्रांक शुल्क) व्दारे करारनामा करणे आवश्यक असतांना रूपये 1,100/- चेमुद्रांक शुल्कवर करारनामा केला आहे. त्यामुळे शासनाचे रुपये 500 चे महसुली नुकसान झाले आले.

2) नस्तीची तपासणी केली असता सन 2015-2016 मध्ये खरेदी केलेले पुर्ण टिन पत्रे 1,590 नग शिल्लक असतांना पुन्हा सन 2016-2017 मध्ये 1,968 नग टिन पत्रे खरेदी करण्यात आले आहे. सन 2015-2016 चे टिन पत्रे वाटपाकरीता लाभार्थी निवड झाली नसतांना पुन्हा सन 2016-2017 मध्ये 1,968 नग टिन पत्रे खरेदी करण्याचे प्रयोजन काय?

3) पंचायत समिती, चिखलदराचे साठा रजिस्टरची तपासणी केली असता सन 2014-2015 मध्ये टिन पत्रे वाटपाकरीता लाभार्थी उपलब्ध नसल्याने त्यांचेकडे 25 नग टिन पत्रे शिल्लक असल्याचे दिसते. म्हणजेच सन 2015-2016 मध्ये त्यांना टिन पत्रे ची आवश्यकता नव्हती. परंतु, सन 2015-2016 मध्ये 1,590 नग टिन पत्रे खरेदी करुन पंचायत समिती, चिखलदरा यांना पुन्हा 54 नग व पुन्हा सन 2016-2017 मध्ये 1,968 नग टिन पत्रे खरेदी करुन 78 नग टिन पत्रे दिले आहे. यावरुन पंचायत समितीला टिन पत्र्यांची आवश्यकता नसतांना टिन पत्रे वाटपाकरीता लाभार्थी उपलब्ध नसतांना पुरवठा केला असल्याचे दिसते.

4) कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सुक्रऔ-2015/प्रक्र218/11अे, दिनांक 23/11/2015 मार्गदर्शक सुचना बाब क्रमांक 8 नुसार साहित्याची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसाच्या कालावधीत साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे अन्यथा विलंबाने पुरवठा

केलेल्या साहित्याच्या किंमतीच्या 3 टक्के दंडात्मक रकमेची वसुली पुरवठाधारकाकडुन करणे आवश्यक होते. नस्तीची तपासणी केली असता तशा प्रकारची कार्यवाही न करता नस्तीत पान क्रमांक N-16 वर पंचायत समिती तिवसाला साहित्य उशिरा पोहचविल्याबाबत रूपये 3,812/- दंड वसुल करणेबाबत नमुद करुन नाममात्र रूपये 3,812/- एवढी दंडाची रक्कम वसुल करण्यात आली आहे.

5) पुरवठा आदेश क्रमांक 418 दिनांक 05/03/2016 नुसार दिनांक 19/04/2016 पर्यंत साहित्याचा पुरवठा पुरवठाधारकाने पंचायत समिती स्तरावर करणे आवश्यक होते. परंतु, 6 पंचायत समितीचे साठा रजिस्टरची तपासणी केली असता.

साहित्य विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसते. दिनांक 23/11/2015 मार्गदर्शक सुचना बाब क्रमांक 8 नुसार साहित्याच्या किंमतीच्या 3 टक्के दंडात्मक रकमेची वसुलीबाबत कार्यवाही करावी.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2016 /प्र.क्र. 9/ वित्त 9, दिनांक 19/05/2016 अन्वये वैयक्तीक लाभाची योजना राबवितांना तरतुदीनुसार ही योजना राबवितांना ठरवुन दिलेल्या नियोजनानुसार व योजनांचा लाभ लाभार्थींना वेळेत मिळेल, याबाबत योग्य कार्यवाही करण्यात आलेली नाही. नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

7) विभागाने टीन पत्रे खरेदी करण्यापुर्वी संबधीत पंचायत समितीकडून मागणी निश्चित करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे खरेदी केलेले साहित्य हे त्याच वित्तीय वर्षात संबधीत लाभार्थ्यांस वाटप न झाल्याचे दिसते. पंचायत समितीचे साठा रजिस्टरची तपासणी केली असता दिनांक 31/03/2017 रोजीपर्यंत (लेखापरीक्षण दिनांकपर्यंत) 9 पंचायत समितींकडे एकूण 321 नग टीन पत्र्यांचे वाटप करण्यात आले नसुन शिल्लक असल्याचे दिसते. यावरुन लाभार्थी निवड करताना गरजु लाभार्थ्यांची निवड करण्यात आली नाही. त्यामुळे योजनेचा उदेदश सफल झाला नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे. सप्रमाण खुलासा करावा.

8) योजना व गावनिहाय लाभार्थीचे मास्टर रजिस्टर पंचायत समिती स्तरावर ठेवले नाही. त्यामुळे एखादे लाभार्थीला दुबार शक्यता नाकारता येत नाही.

9) लाभार्थ्यांचे अर्जावर आवक क्रमांक नमुद करण्यात आला नाही. त्यामुळे लाभार्थी अर्ज कोणत्या दिनांकास प्राप्त झाले, याबाबत पडताळणी करता आली नाही.

### 3.835 अनुसूचित जाती नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना खर्चातील अनियमितता

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** अनुसूचित जाती नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेवर रक्कम रूपये 18,60,33,580/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/ प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 परिशिष्ट अ मुद्दा क्रमांक 9 अन्वये कामाची निवड, प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर महिना अखेर पूर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थीक वर्षात पुर्ण करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत कामे मंजुर केल्यापासुन एक वर्षाच्या आंत पुर्ण करावी, असे नमुद आहे. परंतु, उपरोक्तप्रमाणे अपुर्ण कामांची संख्या पाहता शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे आढळुन येते.

2) समाजकल्याण विभागाने वर्षनिहाय मंजुर कामांची व पुर्ण झालेल्या कामांची नोंदवही न ठेवल्यामुळे कामाच्या सद्यस्थितीबाबत लेखापरिक्षणात पडतळणी करता आली नाही.

3) अपुर्ण कामामध्ये शासनाचा निधी अडकुन पडला आहे. अपुर्ण कामांन प्राधान्य देवून तातडीने पुर्ण करण्यात यावे.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 10-20/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार अखर्चीत निधी लागतच्या पुढील आर्थिक वर्ष अखेरपर्यंत खर्च करण्याची अनुमती आहे. पुढील एक आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चीत राहिलेला निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे.

त्याप्रमाणे सन 2015-2016 चे सन 2016-2017 अखेर अखर्चीत रक्कम रुपये 3,35,11,000/- शासनाकडे परत करणे आवश्यक आहे.

**3.836 मान्यता प्राप्त खाजगी मागासवर्गीय प्रसुतीगृहांना प्रदान केलेल्या परिपोषण अनुदानातील अनियमितता जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांचेमार्फत जिल्हातील शासन मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्थाकडुन चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहांना मान्य संख्येनुसार प्रती निवासी विद्यार्थी प्रती माहे शासनाने निर्धारीत केलेल्या दराने परिपोषण अनुदानाचे प्रदान करण्याची योजना राबविण्यात येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 16/03/1998 रोजीच्या शासन निर्णयानुसार संस्थेचे मागासवर्गीय वसतीगृहासाठी मागील वर्षात केलेल्या जमा व खर्चाचे लेखापरिक्षण नोंदणीकृत सनदी लेखापालाकडुन करुन घेवून सदर अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र समाजकल्याण अधिकारी यांना दिनांक 31 ऑक्टोबर पुर्वी सादर करणे बंधनकारक आहे. संस्थेने असा अहवाल मुदतीत सादर केला नाही, तर संस्थेस देय होणाऱ्या अनुदान रक्कमेतुन 5 टक्के रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल. छत्रपती शाहू मागास वर्गीय वसतीगृह आकोट चे लेखापरिक्षण अहवाल विहित मुदतीत सादर न केल्याने दंडाची रक्कम अंतीम अनुदानातुन कपात केली नाही.

सदरची रक्कम रुपये 10,800/- अनुदानातुन कपात केली नाही. सदर रक्कम वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

2) श्रीमती वत्सलाबाई नाईक मुलींचे वसतीगृह बालाजी नगर, अकोला मान्य संख्या 66 वसतीगृहाची सन 2013-2014 ची प्रस्तावाची टिपणी पान क्रमांक 3 व 4 वर नमुद प्रमाणे स्थानिक निधी लेखापरिक्षा आक्षेप सन 1998 -1999 ते 2010-2011 पर्यंतची रुपये 1,43,300/- वसुली हेणे बाकी आहे. त्यापैकी प्रमाणक क्रमांक 2020 दिनांक 31/03/2017 रुपये 2,29,500/- मधुन रुपये 69,300/- कपात केले. रुपये 1,43,300 - 69,300 = रुपये 74,000/- वसुली संस्थेकडुन होणे बाकी आहे. वसुली करुन अनुपालन दर्शवावे.

3) शासन निर्णय दिनांक 16/03/1998 नुसार वसतीगृहाचे व्यवस्थापनाकरीता संस्थेच्या नावे बँकेत किमान रुपये 10,000/- कायमस्वरुपी जमा असणे आवश्यक आहे. परंतु, वसतीगृहाच्या बँक पासबुकांची तपासणी केली असता 90 टक्के वसतीगृहांचे बँक पासबुकात रुपये 10,000/- पेक्षा कमी रक्कम जमा असल्याचे दिसुन येते.

4) शासन निर्णय दिनांक 16/03/1998 चे परिशिष्ट अ मधिल निर्देशानुसार वसतीगृहाच्या तपासणीकरीता भेटी दिल्यानंतर तपासणी अधिकाऱ्यांनी उपस्थित मुलांची संख्या व नावे नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तावासोबत जोडलेल्या तपासणी अधिकाऱ्यांच्या भेटीच्या अहवालात उपस्थित मुलांची एकूण संख्या नमुद आहे. नावे नमुद नाहीत.

5) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बिसीएच 2000/ प्र.क्र.90/ मावक-4, दिनांक 27/07/2000 मध्ये नमुद केल्याप्रमाणे वसतीगृहातील विद्यार्थाची वर्षिक परिक्षेतील गुणवत्ता विचारात घेवून सदर अनुदानीत वसतीगृहांना दुसऱ्या हप्त्याचे 40 टक्के देय होणाऱ्या अनुदानातुन कपात करण्यात यावी.

6) वसतीगृहाच्या अनुदान प्रस्तावाच्या नस्तीची तपासणी केली असता वसतीगृहांच्या प्रस्तावाच्या नस्तीमध्ये विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण टक्केवारी अहवाल नसल्याने वसतीगृहातील विद्यार्थांचे उत्तीर्ण टक्केवारी 60 टक्के पेक्षा कमी आहे किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे वसतीगृहांना जादा अनुदान प्रदान झाल्याची शक्यता आहे. सन 2016-2017 मध्ये ज्या वसतीगृहांना दुसरा हप्ता 40 टक्के अनुदान प्रदान केले, त्या वसतीगृहाचे विद्यार्थी उत्तीर्ण टक्केवारी अहवाल उपलब्ध करुन पडताळणी करुन वसतीगृहांना जादा अनुदान प्रदान झाले असल्यास ते पुढील देय अनुदानातुन कपात करुन सप्रमाण अनुपालन दर्शवावे

**3.837 अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे खर्चातील अनियमितता**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणेकरिता ग्रामपंचायतींना रक्कम रूपये 12,36,30,000/- अनुदान वितरित केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/ प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 चे परिशिष्ट “अ” मधील मुददा क्रमांक 2 नुसार अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील लोकसंख्येची मोजणी करतांना जनगणनेच्या निकषाबरोबर या वस्तीमध्ये असलेली प्रत्यक्ष लोकसंख्या लक्षात घेवुन ग्रामसभेने ठराव पारीत करावा व तो ग्रामपंचायतीकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. त्यानुसार नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायत, खैरखेडा पंचायत समिती, मालेगांव येथील ग्रामपंचायत ठराव क्रमांक 6 दिनांक 29/07/2016 ची पडताळणी केली असता सदर ठरावात ग्रामपंचायत खैरखेडाची एकुण लोकसंख्या 2,134 असुन त्यामध्ये अनुसुचित जातीची लोकसंख्या 9 असल्याचे नमुद आहे. तसेच कृती आराखडयामध्ये (सन 2011 चे जनगणनेनुसार) अनुसुचित जातीची लोकसंख्या 5 दर्शविली आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयानुसार अनुसुचित जातीची लोकसंख्या 10 पेक्षा कमी असल्यास सदर ग्रामपंचायत अनुदानास पात्र ठरत नसतांना सदर ग्रामपंचायतीस सामाजिक सभागृह बांधकामाकरीता रक्कम रूपये 7,00,000/- मंजुर करण्यांत आली असुन त्यापैकी 90 टक्के रक्कम रूपये 6,30,000/- ग्रामपंचायत खैरखेडाकरीता पंचायत समिती स्तरावर वितरीत केल्याचे दिसुन येते. सबब नियमबाहयपणे वितरीत केलेल्या अनुदानाची रक्कम रूपये 6,30,000/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयातील मुददा क्रमांक 3 नुसार योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामाबाबतच्या निकषानुसार पाणीपुरवठयाची कामे, मलनिस्सारण, विज, गटर बांधणे, अंतर्गत रस्ते, पोच रस्ते, पर्जन्य पाण्याचा निचरा इत्यादी कामे प्राधान्याने घ्यावीत व गावातील सर्व वस्त्यां-मधील मुलभुत सुविधांची कामे झाल्यानंतर समाजमंदीराचे बांधकाम करावे. परंतु, समाजमंदीर बांधकामाकरीता अनुदान वितरीत केल्याचे दिसुन येते. उदाहरणार्थ पंचायत समिती, वाशिम अंतर्गत ग्रामपंचायत सोयता, काटा, बिटोडा, वारला, पंचायत समिती, मालेगांव अंतर्गत ग्रामपंचायत किन्ही राजा, तिवळी, पंचायत समिती, रिसोड अंतर्गत ग्रामपंचायत गोभणी, येवती, पंचायत समिती, मंगरुळपीर अंतर्गत ग्रामपंचायत गोगरी, मानोली, पंचायत समिती, मानोरा अंतर्गत ग्रामपंचायत नायनी, देवठाणा व पंचायत समिती, कारंजा अंतर्गत ग्रामपंचायत वाई व सोहळ.

सबब गावातील सर्व वस्त्यांमधील मुलभुत सुविधांची कामे पुर्ण झाल्यानंतरच सामाजिक सभागृह बांधकामाकरीता अनुदान वितरीत केले, याबाबत खात्री पटवावी.

3) उपरोक्त शासन निर्णयातील मुददा क्रमांक 9 नुसार कामाची निवड, प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर महिना अखेर पुर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थिक वर्षात पुर्ण होणे आवश्यक आहे. परंतु, नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयातील मुददा क्रमांक 9 नुसार कोणत्याही परिस्थितीत कामे मंजुर केल्यापासुन एक वर्षाच्या आंत संबंधीत ग्रामसेवकाच्या सहाय्याने ग्रामपंचायतमार्फत कामे पुर्ण करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी यांची आहे. त्यामूळे मंजुर कामे मुदतीत पुर्ण करुन देणेबाबत ग्रामपंचायतचे ठराव घेणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही केल्याचे दिसत नाही. उदा. पंचायत समिती, वाशिम अंतर्गत ग्रामपंचायत तोंडगांव, ईलखी, पिंपळगांव, हिवरा, तांदळी(बु) व सोंडा

5) अनुदान नोंदवही नमुना 90 नुसार सन 2016-2017 मध्ये रूपये 14,00,00,000/- अनुदान प्राप्त झाल्याचे दिसुन येते. परंतु, नमुना 90 मध्ये पंचायत समिती स्तरावर किती अनुदान वितरीत केले व वर्ष अखेर किती अनुदान शिल्लक आहे, याची नोंद घेतलेली नाही. त्यामुळे किती अनुदान शिल्लक आहे, याची खात्री करता येत नाही.

6) एकुण 331 प्रस्ताव मंजुर झाले असुन त्याकरीता पंचायत समिती स्तरावर रक्कम रूपये 12,55,30,000/- (रूपये 13,94,81,000/- चे 90 टक्के रूपये 12,55,30,000/-) अनुदान वितरीत करणे आवश्यक

होते. परंतु, उपलब्ध वित्त विप्रेषणानुसार 325 ग्रामपंचायतीकरीता मंजुर अनुदानाचे 90 टक्के रक्कम रूपये 12,36,30,000/- वितरीत केल्याचे दिसुन येते. त्यामुळे उर्वरीत 6 ग्रामपंचायतींना अनुदान वितरीत केले किंवा नाही, याबाबत वित्त विप्रेषन नोंदवही उपलब्ध केली नसल्यामुळे खात्री करता येत नाही.

7) उपलब्ध वित्त विप्रेषनानुसार रक्कम रूपये 12,36,30,000/- खर्च झाल्याचे दिसुन येते. तर विवरणपत्रानुसार रूपये 12,62,74,744/- एवढा खर्च दिसुन येते. सबब फरकाबाबत खूलासा होणे आवश्यक आहे.

**3.838 अपंग व अपंगत्व नसलेल्या व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन अनुदान वितरणातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** अपंग व अपंगत्व नसलेल्या 10 जोडप्याच्या विवाहास प्रती जोडपे रूपये 50,000/- प्रमाणे रूपये 5,00,000/- प्रोत्साहन अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) स्वागत समारंभावर प्रती जोडपे रूपये 500/- प्रमाणे एकुण रूपये 5,000/- खर्च दर्शविला आहे. परंतु, सदर खर्चाबाबतची बिले नस्तीमध्ये आढळुन आले नाही. त्यामुळे खर्चाची सत्यता पटत नाही.

2) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग-2013 / प्र.क्र.103/अ.क्र.2, दिनांक 17/06/2014 मधील अट क्रमांक 4(v) नुसार विवाह झाल्यानंतर किमान एक वर्षाच्या आंत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. परंतु, प्रकाश बेलखेडे / भाग्यश्री ठावरी यांचा अर्ज एक वर्षानंतर समाजकल्याण विभागाला प्राप्त झाल्याचे दिसुन येते. संबंधीत जोडप्यांना प्रदान करावयाच्या रक्कमेचे बिल समाजकल्याण विभागाने वित्त विभागाकडे सादर केले असुन वित्त विभागाच्या खात्यातुन रक्कम रूपये 50,000/- प्राप्त केले आहे. परंतु, सदर रक्कम संबंधीत लाभार्थी जोडप्यांना दिल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदर रक्कम कोणाच्या खात्यात जमा आहे, याची खात्री पटत नाही. सबब रक्कम रूपये 50,000/- संबंधीत जोडप्यांना कां देण्यांत आली नाही? तसेच जर संबंधीत जोडपे लाभ मिळण्यास पात्र नसतील तर त्यांचे नावाने रक्कम कशी काय काढण्यांत आली, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) संसार उपयोगी साहित्य खरेदी करण्यांकरीता प्रती जोडपे रूपये 4,500/- प्रमाणे एकुण 9 जोडप्यांना रक्कम रूपये 40,500/- प्रदान करणे आवश्यक होते. परंतु, दिनांक 31/03/2017 पर्यंत संबंधीतांना सदरची रक्कम प्रदान केल्याचे दिसुन येत नाही. सबब सदर रक्कम कोणाच्या खात्यात ठेवण्यांत आली आहे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्व क्रमांक 5 नुसार समाजकल्याण अधिकारी यांनी या योजनेअंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात प्राप्त होणारे अर्ज त्या त्या आर्थिक वर्षात वर्षातुन दोनवेळा निकाली निकाली काढणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने सन 2014-2015 व 2015-2016 मध्ये प्राप्त झालेले अर्ज त्या त्या आर्थिक वर्षात निकाली न काढता सन 2016-2017 मध्ये निकाली काढल्याचे दिसुन येते. सबब सदर अर्ज त्या त्या वर्षात निकाली कां काढण्यांत आले नाही, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) संबंधीत लाभार्थ्यांना लाभ दिल्यानंतर विहीत नमुन्यातील नोंदवहीत संबंधीतांची नावे नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, विहीत नमुण्यांत नोंदवही ठेवण्यांत आली नाही.

6) प्रती जोडप्यांचे नावाने रूपये 25,000/- चे बचत प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे. परंतु, सदर बचत प्रमाणपत्राची छायांकीत प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे संबंधीतांचे नावाने बचत प्रमाणपत्र काढल्याची खात्री होत नाही.

**3.839 मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर धान्य साठविणेसाठी कोठया पुरविणे खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2016-2017 या वर्षात मंजुर असलेल्या 572 नग धान्य कोठी खरेदीवर रूपये 9,99,284/- रूपये खर्च झाला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपी ए.-2016/प्रक्र.9/वितत-9, दिनांक 09/05/2016 अन्वये योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेने काटेकोरपणे नियोजन करणे, योजनांचा निधी नियमानूसार करणे विशेषत: वैयक्तीक लाभाचा योजनांसाठी प्राप्त झालेला निधी विहित नियमानूसार व विहित कालमर्यादेत खर्च होईल व योजनाचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळेल, याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असतांना या शासन निर्णयानूसार कार्यवाही न केल्यामुळे धान्य कोठया वाटपाअभावी शिल्लक असल्याचे दिसून येते.

2) समाजकल्याण विषय समिती सभा विषय क्रमांक 03 ठराव क्रमांक 02 दिनांक 24/10/2016 नूसार 113 लाभार्थी निवड केले असतांना प्रत्येकी 2 नग या प्रमाणे 226 धान्य कोठींचा पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना 572 नग धान्य कोठींचा आदेश देण्यात आला, याबाबत खुलासा आवश्यक आहे.

3) अर्धसमास पत्र क्रमांक 01 दिनांक 11/10/2017 नूसार अर्धसमास पत्र देवूनही पंचायत समीती यवतमाळ, बाभूळगाव, पांढरकवडा, मारेगाव, घाटंजी, दिग्रस उमरखेड इत्यादी पंचायत समित्यांकडील साठा पंजी, लाभार्थी अर्ज इत्यादी अभिलेखे लेखा तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

4) दारव्हा पंचायत समिती करीता 28 लाभार्थी निवड असतांना 31 लार्भाथ्यांकरीता 62 नगांचा पुरवठा झाल्याचे दिसून येते. शामराव तुकाराम मनवर, रा. पाळोदी, अतीका बबन सोनोने रा. लोही, अमनराव लोणारे रा. बोदेगाव, संतोष नारायण वंजारी रा. उचेगाव श्रावण लकडू तितवे रा. वाटखेड, यांना लाभ दिला नसल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) सदर योजना राबवित असतांना लाभार्थ्यांचे एकुण किती अर्ज प्राप्त झालेत, त्यापैकी मंजुर किती इत्यादी बाबत माहिती सादर केली नसल्याने निकषानूसारच व गरजु लाभार्थ्यांना लाभ दिला गेला किंवा नाही, याबाबत स्पष्ट अभिप्राय देता येत नाही.

6) पंचायत समिती नेर यांचे क्षेत्रात विषय समितीमध्ये एकुण 06 लाभार्थी निवड असतांना 22 लाभार्थ्यांना 44 धान्य कोठया पुरविण्यात आल्याचे दिसून येते. सदर पंचायत समितीकडे लेखापरिक्षेचे तारखेपर्यंत 34 नग वाटपाअभावी शिल्लक आहे. याबाबत खुलासा आवश्यक आहे.

7) लेखापरिक्षणाचे तारखेपर्यंत पंचायत समित्यांकडे खालीलप्रमाणे धान्य कोठया वाटपाअभावी शिल्लक आहेत.

नेर-34, कळंब-6, राळेगाव-24, वणी-12, आर्णी-20, महागाव-36 एकुण 132 नगाकरीता प्रत्येकी रूपये 1,747/- प्रमाणे रूपये 2,30,604/- योजनेची रक्कम निरर्थक गुंतून पडली आहे.

8) समाजकल्याण विभागाचे पंचायत समितीनिहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने दूबार लाभ झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

9) सदर योजनेच्या लाभासाठीचे मंजूर लाभार्थ्याचे अर्ज वारंवार मागणी करुन तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 11/10/2017, क्रमांक 3 दिनांक 13/10/2017, 4 दिनांक 17/10/2017 क्रमांक 8 दिनांक 27/10/2017, व क्रमांक 10 दिनांक 30/10/2017 नुसार मागणी करुन सुध्दा अर्ज लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध केले नाहीत. त्यामुळे योजनेच्या लाभासाठी पात्र असल्याचे तसेच तांत्रीक मंजूरी आदेशातील अटी व शर्ती नुसार अर्जासोबत कागदपत्रे सादर केल्याचे व पात्र लाभार्थीनाच योजनेचा लाभ दिला असल्याची तपासणी करता आली नाही.

**3.840 मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्पर बदलून 90 टक्के अनुदानावर टिन पत्रे पुरविणे खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** मागासवर्गीयांच्या घरावरील गवती छप्पर बदलून 90 टक्के अनुदानावर टिनपत्रे पुरविणेकरीता रक्कम रूपये 59,37,219/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाचे पत्र क्रमांक 2605 दिनांक 17/02/2016 नूसार दै. देशोन्नती, दै. लोकसत्ता, महासागर जिल्हा विशेष व पाचजन्य निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. उपरोक्त जाहिरातींमध्ये निविदेतील सुचना क्रमांक 03 मध्ये वरील संपुर्ण माहिती www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल, असे नमुद केले आहे.

परंतु, सदरची जाहिरात अत्यंत मोघम असून कोणत्या तारखेपासून ते कोणत्या तारखेपर्यंत निविदा सादर केल्या जातील, हे अभिलेखे नस्तीत दिसून आले नाही. खरेदी समितीची मंजुरी नसतांना पुरवठा आदेश देण्यात आला.

2) सन 2015-2016 चा अखर्चित निधी ठराव क्रमांक 22 दिनांक 17/06/2016 अन्वये मंजुरात असतांना तांत्रिक मंजुरी ही 2014-2015 करीता आहे. तांत्रिक मंजुरीशिवाय खर्च करणेबाबत खुलासा आवश्यक आहे.

3) अर्धसमास पत्र क्रमांक 01 दिनांक 11/10/2017 नूसार पंचायत समीती निहाय लार्भाथ्यांचे अर्ज व मंजुर यादी मागणी केली असता अप्राप्त आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर-1633/57 दिनांक 19/01/1985 नुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी 10 टक्के लाभार्थी हिस्याची रक्कम लाभार्थ्यांकडून वसूल करुन नंतरच पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

5) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा 2012/प्र.क्र. 97/पं.स.07, दिनांक 23/09/2013 नूसार एकच निविदा प्राप्त झाल्यास निविदा स्वीकृतीचा कालावधी दोन आठवडयांनी वाढवावा प्रतिसाद न आल्यास दोन वेळा मुदतवाढ दयावी. यानंतरही एकच निविदा प्राप्त झालेस, त्यावर निर्णय घेणे आवश्यक असतांना शासन निर्णयानूसार कार्यवाही केली नाही.

6) सदर योजनेच्या लाभासाठीचे मंजूर लाभार्थ्याचे अर्ज वारंवार मागणी करुन तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 11/10/2017, क्रमांक 3, दिनांक 13/10/2017, 4 दिनांक 17/10/2017, क्रमांक 8 दिनांक 27/10/2017, व क्रमांक 10 दिनांक 30/10/2017 नुसार मागणी करुन सुध्दा अर्ज लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध केले नाहीत. त्यामुळे योजनेच्या लाभासाठी पात्र असल्याचे तसेच तांत्रिक मंजूरी आदेशातील अटी व शर्ती नुसार अर्जासोबत कागदपत्रे सादर केल्याचे व पात्र लाभार्थीनाच योजनेचा लाभ दिला असल्याची तपासणी करता आली नाही.

**3.841 13 वन महसुल निधी अंतर्गत जंगल भागातील शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर सबमर्शिबल मोटारपंप पुरविणे योजनेतील अनियमितताबाबत. सन 2016-2017.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** जंगल भागातील शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर सबमर्शिबल मोटारपंप पुरविणे योजनेकरीता रक्कम रूपये 29,82,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एफआरजी/1093/सीआर-2426/ 24, दिनांक 12/11/1993 नुसार 7 टक्के वन महसुल अनुदानातून खर्च करण्यासाठी दर वर्षी एक वार्षिक कृती कायक्रम, आराखडा तयार करणे आवश्यक आहे व सदरचा कृती आराखडा 15 एप्रिल पुर्वी विभागीय आयुक्त यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सदरची जबाबदारी समाजकल्याण अधिकारी यांची असून त्यानुसार कार्यवाही केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध केले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/ प्र.क्र.104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 मधील सुचनेनुसार लाभार्थ्याची यादी निश्चित करुन त्यास सभेची मान्यता घेणे आवश्यक असतांना समाजकल्याण विभागाने तसे न करता मोघमपणे लाभार्थ्याची निवड केली आहे. नावाची यादी ठरावात नमूद केली नाही.

3) सदर योजनेच्या नस्तीमध्ये 96 लाभार्थ्याची यादी असून 142 नग साहित्याची खरेदी केली आहे. उर्वरीत लाभार्थी निवड निश्चित नसतांना जास्तीने साहित्याची खरेदी केली.

4) योजनेच्या लाभासाठी किती अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी पात्र किती व अपात्र किती, याबाबतचा तपशिल सबंधीत नस्तीतील टिपणीत नमूद केलेला नाही. यावरुन प्रत्यक्षात लाभार्थी निश्चित नसतांना साहित्याची खरेदी केली आहे.

5) सदर योजनेच्या लाभासाठीचे मंजूर लाभार्थ्याचे अर्ज वारंवार मागणी करुन तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 11/10/2017, क्रमांक 3 दिनांक13/10/2017, 4 दिनांक 17/10/2017, क्रमांक 8 दिनांक 27/10/2017, व क्रमांक 10 दिनांक 30/10/2017 मागणी करुन सुध्दा अर्ज लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध केले नाहीत.

त्यामुळे योजनेच्या लाभासाठी पात्र असल्याचे तसेच तांत्रीक मंजूरी आदेशातील अटी व शर्ती नुसार अर्जासोबत कागदपत्रे सादर केल्याचे व पात्र लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ दिला असल्याची तपासणी करता आली नाही.

6) विभागाने लाभार्थीची गावनिहाय तालुका निहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशा प्रकारची समाजकल्याण विभागाने कार्यवाही केली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला वारंवार किंवा दुबार लाभ दिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत मास्टर नोंदवही ठेवून दुबार लाभ दिला नसल्याबाबत सत्यता पटवावी.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार साहित्याची खरेदी करण्यापुर्वी तीचा दर्जा आणि योग्यता तपासून पाहून तिचे मान्यता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

8) समाजकल्याण विभागाने साठा नोंदवहीमध्ये पान क्रमांक 25 वर 147 नग प्राप्त झाल्याची नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र देयकावर नमूद केले आहे. परंतु, साठा नोंदवही लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध केली नाही. परंतु, प्रत्यक्षात 142 नग साहित्याचा पुरवठा झाला आहे. पंचायत समिती स्तरावर साहित्य कधी प्राप्त झाले, त्याबाबत दिनांकीत नोंदी घेतल्या नाहीत.

9) अनेक पंचायत समितीला मंजूर लाभार्थ्यापेक्षा जास्तीने साहित्याचा पुरवठा केला असून लेखापरीक्षण दिनांकापर्यंत मंजूर लाभार्थ्याच्या यादया नसल्यामुळे साहित्याचा वाटप होणे बाकी आसल्याचे आढळून आले.

10) पंचायत समितीकडे जिल्हा समाज कल्याण समितीने मंजूर केलेल्या लाभार्थ्याच्या यादया नाहीत. श्री. माघाडे कनिष्ठ लिपीक यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आल्या आहेत. सदरची बाब नियमबाहय असून लाभार्थीची निवड ग्रामसभेतून झाल्याचे व त्यास समाज कल्याण समितीच्या सभेने मंजूर केलेल्या व पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला नसल्याचे दिसून येते.

11) पुरवठा केलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी अहवाल सबंधीत नस्तीत उपलब्ध झाला नाही.

12) पंचायत समिती, यवतमाळ, पुसद, पांढरकवडा व मारेगांव यांनी साठा नोंदवहया लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध केल्या नाहीत. त्यामुळे सदर पंचायत समितीला पुरवठा आदेशानुसार साहित्याचा पुरवठा झाल्याचे व ते निवड झालेल्या लाभार्थ्यांनाच वाटप केले असल्याची तपासणी करता आली नाही.

13) योजनेच्या फलश्रुतीबाबतचे अभिलेखे संबंधीत नस्तीत उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसून येते.

14) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एफआरजी/1093/सीआर-2426/ 24, दिनांक 12/11/1993 नुसार 7 टक्के वन महसुल अनुदानांअंतर्गत केलेल्या खर्चाचा तिमाही अहवाल विभागीय आयुक्त व ग्रामविकास विभागास पाठविणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

**3.842 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतक-याना ताडपत्री पुरविणे.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतक-यांना ताडपत्री पुरविणेकरिता रक्कम रूपये 44,83,411/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन स्तरावर ताडपत्रीचा दरकरार निश्चित करण्यात आला आहे. सदर दरामध्ये सर्व करांचा समावेश असल्याचे नमूद आहे. परंतू, विभागाने देयकामध्ये नियमाप्रमाणे विक्रीकर व आयकर कपात केली नसल्याचे दिसून आले आहे. वॅट क्लीअरन्स सर्टीफीकेट व आयकर भरणा केल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये नसल्याने वरील कपातीची वसूली करणे आवश्यक आहे.

2) जिल्हा परिषदेने ठराव क्रमांक 14 दिनांक 24/05/2016 नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 नुसार प्रशासकीय मान्यता, दरकरार उपलब्ध असतांना ही खरेदी प्रक्रीया विलंबाने करणेबाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्रं. 446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 परि. ई नुसार जिल्हा परिषदेकडील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यास वेळापत्रक आखुन देण्यात आले आहे. त्यानुसार विभागाने वेळापत्रकाचे पालन केल्याचे आढळून न आल्याने सदर शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. याबाबत खुलासा करावा.

4) साठा नोंदवहीची पडताळणी केली असता लेखापरीक्षण दिनांकापर्यंत साहित्य शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे. लाभार्थी निवड झालेली असतानांही साहित्य त्वरीत वाटप करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करणेबाबत खुलासा करावा.

5) लाभार्थी अर्जाची पडताळणी केली असता पंचायत समिती नांदुरा येथील श्री अर्जुन सोनाजी डाबेराव व सखुबाई अर्जुन डाबेराव हे दोन्ही लाभार्थी शिधापत्रीकेवरून पती - पत्नी असल्याचे दिसून आल्याने एकाच कुटुंबात दुहेरी लाभ दिल्याने रूपये 4,047/- ची वसूली करणे आवश्यक आहे व याच पंचायत समितीमध्ये श्री.पंढरी धोंडू इंगळे यांना साठा नोंदवहीतील नोंद अनुक्रमांक 2 व 59 नूसार दोनदा लाभ दिल्याने रूपये 4,047/- ची वसूली करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास 1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार निकषात न बसणारा लाभार्थी निवडल्यास त्यास अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहे. त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास 1083/67, दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थ्यांकडुन विनियोजन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. परंतु, साहित्य माहे मार्च नंतर वाटप झाले व काही वाटपाअभावी अदयापही पडून असल्याने योजनेचा हेतु सफल झाल्याचे आढळत नाही.

### 3.843 8 वी ते 10 वी च्या अनूसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचे दुबार प्रदानाबाबत

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** वर्ग 8 वी ते 10 वी मधील अनूसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचे प्रदान केले आहे सदर शिष्यवृत्ती वाटपामध्ये वरीलप्रमाणे एकाच विद्यार्थ्यास दुबार शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 3116 संजय गांधी माध्यमिक विदयालय, धांदरवाडी तालुका सिंदखेडराजा येथील विद्यार्थी यादीवरुन एकच विद्यार्थीनीला दुबार शिष्यवृत्तीचा लाभ दिल्याचे स्पष्ट होते त्यामूळे संधीताकडून एका शिष्यवृत्तीची वसुली होणे आवश्यक आहे त्यामूळे रुपये 27,000/- सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचे झालेले दुबार प्रदान सबंधीताकडून वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

सदरबाबत संबधीतावर जाबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये 27,000/- वसुल करुन शासन खाती जमा दर्शवून अनुपालन सादर करावे तसेच वरील प्रमाणक हे लेखापरिक्षण काळातील निवडक महिन्याचे असून आपले स्तरावरुन इतर महिन्याचे प्रमाणकाची पडताळणी करुन एकाच विद्यार्थास दुबार प्रदान झालेले असल्यास योग्य कार्यवाही करुन रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा दर्शवावी.

### 3.844 कार्यकारी अभियंता यांचे प्रमाणपत्रानूसार पुरेशी जागा उपलब्ध नसतांना वसतिगृहांना मान्यता देणेबाबत.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत दोन प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 65,700/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.एच.-109/प्र.क्र.-107/मावक-4, दिनांक 16/03/1998 अन्वये विद्यार्थ्यांच्या निवासाच्या प्रयोजनासाठी योग्य म्हणून मान्यता दिलेली, सोबत स्वयंपाक घर, भोजन कक्ष, कोठी घर, प्रसाधन गृह, स्नानगृह आणि वसतिगृह अधिक्षकांचे निवासस्थान यासारख्या आवश्यक सोयींनी युक्त अशी इमारत किंवा घर अशी वसतिगृहाची व्याख्या केलेली आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णया मधील नियम क्रमांक 8(क) व नियम क्रमांक 4 मधील क्र. ब-2 नूसार प्रत्येक निवासी छात्रास किमान 24 चौ. फुट ते कमाल 40 चौ. फुट या प्रमाणात शयन व भोजनासाठी जागा पुरेशी आहे असे नमुद आहे.

वरील वैशाली मुलींचे वसतिगृह इंद्रायणि नगर, दत्तवाडी, नागपूर यांची मान्य विद्यार्थी संख्या 24 असून शयन व भोजनासाठीच फक्त 960 चौ. फुट जागा पाहिजे. कार्यकारी अभियंताच्या प्रमाणपत्रानूसार संपूर्ण बांधकाम 950 चौ. फुटामध्ये आहे. तसेच प्रकरण B मध्ये लोकमान्य टिळक मागासवर्गिय मुलांचे वसतिगृह इंद्रायणि नगर, दत्तवाडी, नागपूर यांची मान्य विदयार्थी संख्या 36 असून फक्त शयन व भोजनाकरीताच प्रति विदयार्थी 40 चौ. फुटाप्रमाणे एकूण 1440 चौ. फुट जागा (बांधकाम) पाहिजे. कार्यकारी अभियंताच्या प्रमाणपत्रानूसार संपूर्ण इमारतिचे बांधकाम एकूण 1242 चौ. फुट आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांच्या शयन व भोजनाकरीताच जागा उपलब्ध आहे. उपरोक्त शासन निर्णयान्वये शौचालय, स्नानगृह स्वयंपाक घर, कोठीघर व अधिक्षकाचे निवासस्थानाकरीता बांधकाम (जागा) उपलब्ध नाही. सदर सोइ उपलब्ध नसल्यामुळे (जागा नसल्यामुळे) व्याख्येनूसार वसतिगृह परीपूर्ण नाही हे लक्षात येते. याकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**3.845 शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गिय मुला / मुलींकरीता जेन्ट्स व लेडीज सायकल पूरविणे बाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत दोन प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 79,97,016/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये एकाच कुटूंबातील एकाच व्यक्तीला त्यावर्षी पुन्हा पुन्हा या योजनेचा लाभ मिळणार नाही.

तरी एकाच कुटूंबातील दोन व्यक्तींना लाभ देण्यात आलेला आहे. सबब जादा दिलेल्या 5 नग सायकलींची रक्कम रूपये 17,430/- वसुलपात्र ठरते.

2) लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास सादर न केल्याने महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 20/10/1999 नुसार लाभार्थी निवड केल्याबाबत खात्री करता आलेली नाही. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/1013/प्र.क्र.1239/34, दिनांक 02/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार माष्टर नोंदवही सादर केलेली नाही.

3) साहित्याचा पुरवठा थेट पंचायत समिती स्तरावर पुरवठादाराने वर्षअखेर दिनांक 31/03/2017 ला केलेला असून साठा नोंदवहीची झेरॉक्स प्रत नस्तीमध्ये जोडण्यात आलेली आहे. परंतु साहित्याचे वाटपाची नोंद नमुद नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे किंवा लगतचा पुढील वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सदर योजनेत साहित्य खरेदी सन 2014-15 व सन 2015-16 ची असून दिनांक 31/03/2017 अखेरही साहित्याचे वाटप झालेले नाही. परीणामी योजनेचे मूळ उद्दिष्ठ अनुसार मुला / मुलींना शाळेत जाण्याकरीता सन 2014-15 व सन 2015-16 मध्ये सदर सायकलींचा फायदा झालेला नाही.

5) लाभार्थ्यांना सायकल वाटप करण्यापूर्वी विद्यार्थ्याचे गाव व शाळा यामध्ये बस वाहतुक होत नसल्याचे प्रबंधक, महाराष्ट्र राज्य, परिवहण महामंडळ यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु लेखापरीक्षणास सदर प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापण करणे आवश्यक असतांना तसे करण्यात न आल्याने योजनेचा उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही.

7) शाळा ते गाव हे अंतर 2 कि.मी. पेक्षा जादा असल्याचे व मुले / मुली शाळेत शिकत असल्याचे मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

**3.846 गैरहजर विद्यार्थ्याचे अनुदानातुन कपात न करता अनुदानाचे वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत 5 प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 7,53,500/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 चे जोडपत्रातील नियम 7(2) नुसार गैरहजर विद्यार्थ्याकरीता अनुदान अनुज्ञेय राहणार नाही, असे नमुद असतांना वरील प्रमाणकान्वये गैरहजर विद्यार्थीकरीता अनुदानाचे जादा वाटप करण्यात आल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झालेले आहे तरी जादा वाटप केलेले अनुदान संबंधीत संस्थेकडून वसुल करावे.

**3.847 अनूसुचित जाती जमाती नवबौध्द वस्तीचा विकास नियमबाहय काम बदल प्रस्तावांना मंजूरी देणे.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नागपूर चे सन 2016-17 चे लेखा परिक्षणानुसार या आर्थिक वर्षात विभागाने पंचायत समितीद्वारे मुळ मंजूर कामाऐवजी ग्राम पंचायतींनी बदल सुचविलेल्या प्रस्तावांना कामाच्या बदलांना मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय क्रमांक दवसू-2008/प्र.क्र.524/विघयो-1, दिनांक 14/11/2008 नुसार कामावर नियंत्रण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व संबंधित उपअभियंता तसेच जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांचे राहिल. कोणत्याही परिस्थितीत काम मंजूर झाल्यापासून एक वर्षाचे आत काम पुर्ण करावे, काम अपूर्ण राहिल्यास पुढील 2 वर्षाकरिता निधी देण्यात येवू नये. याबाबत खालिलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) स्थानिक नागरीकांची गरज लक्षात घेता कामे निवडली जातात किंवा नाही याबाबत विभागाने तपासणी न करता कामांना मंजूरी दिल्याबाबत शंका करण्यास वाव आहे. प्रस्तावित करण्यात आलेले काम ग्रामसभेमध्ये मंजूर झाल्यानंतर स्थानिक लोकांचे आवश्यकतेनूसार व प्राधान्य क्रमानूसार काम मंजूर प्रस्ताव सादर करावयास पाहिजे परंतु तसे न करता ज्या कामांची आवश्यकता नाही अशा कामांचे प्रस्ताव सादर केल्याने मंजूर कामाकरिता वितरीत केलेला निधी बदलास मान्यता मिळेपर्यंत अखर्चित राहतो, तसेच स्थानिक नागरिकांना त्या कालावधीत त्या सोईपासून वंचीत राहावे लागते. तसेच विभागाला एकच काम वारंवार करावे लागत असल्याने सर्व संबंधीत यंत्रणांचे श्रमदिन वाया जातात.

2) योजने अंतर्गत काम मंजुर प्रस्ताव सादर करतांनी जागेची उपलब्धता, कामाचे प्राक्कलन, ग्राम सभेचा ठराव इ. दस्ताऐवज सादर करणे आवश्यक आहेत. त्याची तपासणी केल्यानंतरच काम मंजूर करावयास पाहिजे परंतू बदल कामांना दिलेल्या मंजूरीनूसार काही कामे जागा खाजगी असल्याने रद्द करण्यात आलेली आहेत तर काही कामाच्या निधीमध्ये बदल प्रस्तावित करण्यात अलेला आहे. त्यामूळे कामे मंजूर करतांना किंवा प्रस्ताव सादर करतांना आवश्यक दस्ताऐवजांची तपासणी न करताच किंवा चुकिच्या दस्ताऐवजाचे आधारे कामे मंजूर केली जातात असे दिसून येते.

3) शासन निर्णयानूसार एका वर्षाचे आत काम पूर्ण न केल्यास पुढील दोन वर्षाकरिता निधी देण्यात येवू नये असे असतांना एक ते दोन वर्षानंतर कामांच्या बदल प्रस्तावाला मंजूरी देण्यात आलेली असल्याने शासनाच्या निर्देशाचे उल्लंघन केले आहे.

**3.848 जिल्हा मागासवर्गीय वस्तीगृहांना शासन निधीतुन अनुदान वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत 2 प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 1,65,400/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सास्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्रक्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 अन्वये चालविलेल्या स्वयंसेवी संस्थेनी वस्तीगृहासाठी अनुदान देणेबाबत निर्देश असतांना सदर वस्तीगृह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचे आदेश क्रमांक 1556/जिपना/सकव/73/नाग., दिनांक 10/05/1973 अन्वये जिल्हा परिषदव्दारे संचालित असल्याने परिपोषन

अनुदान जिल्हा परिषद निधीतून देणे आवश्यक असतांना शासन निधीतून देण्यात आले. तरी जिल्हा परिषद संचालित वस्तीगृहाला शासन निधीतून अनुदान देणेबाबत शासनाचे निर्देश असल्यास तसे अनुपालन सादर करावे.

**3.849 अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणेकरीता पंचायत समितींना अनुदान वितरणाबाबत**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा दवारे खालीलप्रमाणे पंचायत समितींना सन 2016-2017 मध्ये दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत 8 पंचायत समित्यांना वित्तप्रेषण दवारे रक्कम रुपये 16,14,10,661/- अनुदान वितरीत करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी - 1083/सीआर 1074/57, दिनांक 12/07/1983 नुसार अनुदान खर्ची पडल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे परंतु, उपरोक्त 08 पंचायत समितीपैकी वर्धा पंचायत समिती वगळता इतर 07 पंचायत समितींना एकुण रूपये 11,36,30,527/- इतक्या रकमेचे निधी प्राप्ती व खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर केले नाही.

2) पंचायत समितीकडून प्राप्त झालेले मंजूर कामाचे विहीत नमुन्यात मसिक प्रगती अहवालाची प्रत लेखापरीक्षणास सादर केले नाही.

3) समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे निधी वितरण आदेश क्रमांक 193 दिनांक 08/06/2016 मधील सुचनेनुसार जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी, त्यांना सन 2016-2017 मध्ये प्राप्त झालेल्या अनुदान रूपये 15,00,00,000/- खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र महालेखापाल, नागपूर-2 व आयुक्तालय, पुणे यांना सादर केल्याची प्रत लेखापरीक्षणास सादर केले नाही. त्यामुळे याप्रकारे उपयोगीता प्रमाणपत्र जिल्हा समाज कल्याण अधिकारी, वर्धा यांनी संबंधीतांना पाठविले नसल्याचे मत लेखापरीक्षणाचे आहे.

4) सन 2016-2017 मध्ये प्राप्त् तसेच सन 2015-2016 मध्ये अखर्चित असलेली निधी असे एकुण रूपये 16,42,96,110/- रकमेपैकी 8 पंचायत समितींना उपरोक्तप्रमाणे वित्तप्रेषणादवारे रूपये 16,14,10,661/- वितरीत केल्यानंतर शिल्ल्क अखर्चित रक्क्म रूपये 28,85,449/- राहते. परंतु, लेखापरीक्षणास दिलेल्या विवरणपत्रानुसार अखर्चित निधी रूपये 28,86,026/- दाखविलेलेली आहे. या तफावतीबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2013/प्र.क्र. 85/अजाक-1, दिनांक 01/08/2013 नुसार या योजनेअंतर्गत होणाऱ्या विकास कामांची 100 टक्के तपासणी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांनी अन्य् जिल्हयातील जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेसमवेत तसेच याव्यतिरीक्त 5 टक्के दलित वस्त्यांमधील कामाची तपासणी आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांच्यामार्फत करण्यात यावी, असे निर्देश असतांनाही अशी तपासणी केल्याबाबतचे अहवालाची प्रत लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

**3.850 अनुदानीत मुलामुलींचे वस्तीगृहांना परिपोषण अनुदान प्रदानातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षात मुलामुलींच्या वस्तीगृहांना 43 प्रमाणकादवारे रक्कम रुपये 51,91,050/- परिपोषण अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बिसीएच-1097/प्र.क्र.107/ मावक-4, दिनांक 16/03/1998 मधील जोडपत्र अ (8) (अ) नुसार सहायक अनुदानाचे निर्धारण विदयार्थ्यांच्या वार्षीक 70 टक्के हजेरी व एकंदरीत अधिकारी / नियुक्त आदेशीत कर्मचारी यांचे भेटी दरम्यान सरासरी हजेरीचे नुसार तथा आयुक्त, समाजकल्यांण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र कमांक 270 दिनांक 10/02/2015, पत्र क्रमांक 2346 दिनांक 22/06/2016 व पत्र क्रमांक 3086 दिनांक 10/08/2016 नुसार अनुदानीत वस्तीगृहात प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांना बायोमॅट्रीक प्रणालीमार्फत उपस्थीती नोंद तसेच आधारकार्ड, यु.आय.डी व

ई.आय.डी. असल्याशिवाय संस्थेस अनुदान मंजुर करु नये, असे निर्देश असतांना प्रत्यक्षात संस्था भेटी दरम्यान विदयार्थी सरासरी हजेरी बायोमॅट्रीक प्रणालीवरील उपस्थीतीची नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच सदर अनुदान निर्धारण नस्तीसोबत बायोमॅट्रिक अहवाल जोडलेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात सरासरी हजेरीबाबत लेखापरीक्षणास सत्यता झालेली नाही.

**3.851 जिल्हा परिषद उपकर 3 टक्के लघुउद्योगासाठी अपंगाना अर्थसहाय्य करणेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) अपंगाना लघुउद्योग अर्थसहाय्य समाज कल्याण समिती सभा ठराव क्रमांक 06, दिनांक 27/02/2017 नुसार सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तरतूद रुपये 10,50,000/- ला सभेने मंजुरी दिली.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार भाग-2 व 4 विकास योजना संबंधातील प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देण्याचा अधिकार जिल्हा परिषद खाते प्रमुख याना रुपये 10,00,000/- पर्यन्त असतांना समाज कल्याण अधिकारी यांनी योजनेला प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मर्यादे पेक्षा अधिक रक्कमेला कशी दिली.

2) समाज कल्याण समिती सभा ठराव क्रमांक 02, दिनांक 24/04/2016 नुसार प्रती लाभार्थी रुपये 10,000/- प्रमाणे अपंग लघुउद्योगासाठी अर्थसहाय्य रक्कम निश्चित कशी केली.

3) समाज कल्याण अधिकारी पत्र क्रमांक 762/2017, दिनांक 29/03/2017 नुसार 97 लाभार्थिंना रुपये 9,70,000/- पंचायत समिती भंडारा, मोहाडी, तुमसर, लाखनी, साकोली, लाखांदूर, पवनी यांना अनुदान वितरित केलेली आहे.

4) पंचायत समिती पवनी लाभार्थी यादी मध्ये सर्वश्री यादोराव सावरबांधे आसगाव, विधा माटे परसोडी, अमित खोब्रागडे खातखेडा यांची अपंग टक्केवारी नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीआयपी 2016/प्र.क्र.24/वित्त-3, दिनांक 28/04/2016 नुसार स्तंभ ई व उ प्रमाणे पंचायत समिती स्तरवरून केलेली खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र विभागानी उपलब्ध केली नाही.

**3.852 मागासवर्गीय वस्तिगृह अनुदान निर्धारणाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच 2002/प्र.क्र.273/मावक-4, दिनांक 13/07/2004 नुसार मागासवर्गीय वस्तिगृह मध्ये विहित टक्केवारी प्रमाणे विद्यार्थीना प्रवेश देणे आवश्यक आहे. अनुदान निर्धारण नस्ती पाहता वस्तिगृह मध्ये विद्यार्थीना प्रवेश देतांना समतोलपणा असल्याचे दिसुन येत नाही.

2) शासन निर्णय दिनांक 13/07/2004 नुसार वस्तिगृह मध्ये विहित टक्केवारी प्रमाणे विद्यार्थी प्रवेश नसल्याने जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडून वस्तिगृहानी शिथिलता प्रमाणपत्र घेतले नाही

3) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 नुसार वस्तिगृह मध्ये विद्यार्थी करिता किमान 24 ते 40 चौरस फुट जागा असल्या बाबत कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद यांचे स्थळ दर्शनिय नकाशा नाही.

4) शासन निर्णय दिनांक 16/03/1998 चे नियम चार परिच्छेद क्रमांक 03(क) प्रमाणे वस्तिगृह संस्था नावे रुपये 10,000/- कायम स्वरुपी बँक खाती ठेवली नाही.

5) शासन निर्णय दिनांक 16/03/1998 चे नियम आठ अनुदानाचे निर्धारण परिच्छेद क्रमांक फ नुसार उक्त बाबी अभावी प्रत्येक प्रकरणात रुपये 1,000/- प्रमाणे चार वस्तिगृहाकडून रुपये 8,000/- वसुल करावी.

**3.853 जिल्हा परिषद उपकर योजने अंतर्गत जिल्हा परिषद / खाजगी शाळेतील वर्ग 05 ते 11 पर्यन्त शिकत असलेली मागासवर्गीय विद्यार्थीना 100 टक्के अनुदानावर दोन चाकी सायकल वाटप करणे.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागासवर्गीय विद्यार्थीना दोन चाकी सायकलसाठी समाज कल्याण समिती सभा ठराव क्रमांक 06, दिनांक 27/02/2017 ला सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय तरतूद रुपये 24,00,000/- ला सभेने मंजुरी दिली.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार भाग-2 विकास योजना संबंधातील प्रशासकीय रुपये 20,00,001/- वरील असतांना समाजकल्याण समिती यांची मंजुरी न घेता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजनेला प्रशासकीय मंजुरी मर्यादे पेक्षा अधिक रक्कमेला कशी दिली.

2) जिल्हा परिषद स्वनिधि योजने अंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थीना दोन चाकी सायकल वाटप करणे वैयक्तिक लाभाच्या विविध कल्याणकारी योजना महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्र.क्र.133/का.1717, दिनांक 05/12/2016.

3) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीबीटी 2016/प्र.क्र.90/वित्त-9, दिनांक 09/01/2017 नुसार 20 टक्के मागासवर्गीय वैयक्तिक लाभाच्या योजना रोख रक्कम थेट बँक खाती जमा करणे साठी विभागानी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ठ "इ" प्रमाणे विहित वेळपत्रका नुसार योजना राबविली नाही.

4) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे पत्र क्रमांक 929, दिनांक 02/03/2017 चे परिच्छेद क्रमांक 05 निर्देशा नुसार पंचायत समिती स्तरावर लाभार्थीनी खरेदी केलेली साहित्यांचा प्रस्ताव दिनांक 31/03/2017 पर्यंत विभागाला सादर केले किंवा कसे लेखा परीक्षनात दर्शवीले नाही.

**3.854 मागासवर्गीय वस्तिगृह 40 टक्के अंतिम परिपोषण अनुदान निर्धारणाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी मान्यता प्राप्त विद्यार्थी पटसंख्या नुसार वस्तिगृहांना 60 टक्के परिपोषण व्यवस्थापकीय अग्रिम अनुदान वाटप केलेली संस्थाना 40 टक्के अंतिम परिपोषण अनुदान दिले आहे. येणे प्रमाणे वस्तिगृहांची अंतिम परिपोषणची अनुदान निर्धारण अभिलेखेची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच 1097/प्र.क्र.107/ मावक-4, दिनांक 16/03/1998 चे परिच्छेद क्रमांक 9 (दोन) नुसार मागासवर्गीय वस्तिगृहामध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थीना निर्धारित अनुक्रमे 80, 10, 5, 5 टक्केवारी प्रमाणे प्रवेश देणे आवश्यक आहे. अंतिम परिपोषणची अनुदान निर्धारण नस्ती पाहता वस्तिगृहांनी विद्यार्थीना अनुक्रमे 80, 10, 5, 5 विहित टक्केवारी प्रमाणे प्रवेश न देता कमी / जास्त पणा असल्याचे दिसुन येते. जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडून वस्तिगृहांनी विद्यार्थी शिथिलता प्रमाणपत्र घेतली किंवा कसे नस्ती सोबत उपलब्ध झाले नाही.

2) उक्त शासन निर्णय परिच्छेद कमांक चार नियम 3(ब)(2) नुसार वस्तिगृहा मध्ये निवासी विद्यार्थी साठी किमान 24 ते 40 चौरस फुट प्रमाणे जागा निर्धारित विद्यार्थीचे प्रमाणात असल्याबाबत परिच्छेद कमांक आठ (क) नुसार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्थळ दर्शनिय प्रमाणित केलेली निवासी इमारत जागेचा नकाशा नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

3) उक्त शासन निर्णय परिच्छेद क्रमांक नियम चार 03(क) नुसार वस्तिगृहाचे व्यवस्थापनासाठी संस्थेच्या नावे रुपये 10,000/- कायम स्वरुपी बँक खाती ठेवले असल्याबाबत बँक पासबुकाची अवंतरन प्रत नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

4) उक्त शासन निर्णय परिच्छेद क्रमांक 8 प्रमाणे वस्तिगृह स्थानिक हद्दीनुसार विद्यार्थी प्रवेश किलो मीटर अंतर ग्रामपंचायत दाखला नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

5) उक्त शासन निर्णय परिच्छेद कमांक 9(1) प्रमाणे विद्यार्थी प्रवेश करिता दैनिक वार्तालाप जाहिरात प्रसिध्दी पेपर नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

6) वस्तिगृह कार्यरत कर्मचारी यांचे अधीक्षक स्वयंपाकीबाई, चौकिदार (जिल्हा समाज कल्याण अधिकारी) नियुक्ती केलेली आदेश नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

7) उपरोक्त वस्तिगृहांची अनुदान निर्धारण अंतिम परिपोषण नस्तीची तपासणी केली असता सदर बाबी उपलब्ध झाले नाहीत. शासन निर्णय परिच्छेद क्रमांक 07 (आठ) फ प्रमाणे प्रती रुपये 1,000/- प्रमाणे 24 वस्तिगृहाकडून रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे

**3.855 दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत ग्रामपंचायतीना बांधकामासाठी 90 टक्के अनुदान वित्तप्रेषणाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत 90 टक्के निधी ग्रामपंचायत स्तरावर बांधकाम करणेसाठी विभागांनी पंचायत समितीनिहाय एकूण अनुदान रुपये 17,63,38,661/- वितरित केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागांनी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तिचा विकास करणे या योजने अंतर्गत लोकसंख्येनुसार सुधारणा घडवून आणण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता शर्ती व अटीला अधीन राहुन 90 टक्के अनुदान ग्रामपंचायतनिहाय मंजुर झालेली अनुक्रमे 321 + 241 = 562 बांधकामासाठी अनुदान पंचायत समितिला वितरित केले आहे.

2) दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मंजुर झालेली बांधकामाचा उपयोग दलित वस्तीतील घटकांना होत असल्याबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे उपयोगिता प्रमाणपत्र नाही.

3) पंचायत समिती स्तरावरून ग्रामपंचायतीना वाटप केलेली निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध केले नाही.

4) आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचे निर्देशाप्रमाणे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी दलित वस्ती बांधकामाची तपासणी केली नाही.

**3.856 अनुदानित वस्तीगृहांना परिपोषण अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत रक्कम रूपये 1,87,920/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सत्यशोधक मुलींचे वस्तीगृह, वरोरा व मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह, आवाळपूर यांचे सन 2016-2017 मुल्यनिर्धारणाकरीता सनदी लेखापालाचे सन 2015-2016 चे अंकेक्षण अहवाल ऑक्टोंबर अखेरपर्यत प्राप्त न झालेने एकूण देय अनूदानांतून 5 टक्के रक्कम दंडात्मक कार्यवाही म्हणून वसूल करणे जरूरीचे आहे.

2) प्रमाणक क्रमांक 1016 दिनांक 31/03/2017 रूपये 91,260/- कमला नेहरू मुलीचे वस्तीगृह गोंडपिपरी यांचे प्रस्तावातील प्रपत्र ब नुसार कु. स्नेहल विजय कातकर ही माहे फेबुवारी व मार्च मध्ये अनुपस्थित असतांना परिपोषण अनुदानाचे आहरण केल्यामुळे रूपये 1,800/- वसूलपात्र ठरते.

3) कमला नेहरू मुलींचे वस्तीगृह गोंडपिंपरी, मागासवर्गीय वस्तीगृह, ब्रह्मपुरी, सावित्रीबाई मुलींचे वस्तीगृह, चिमूर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज मुलांचे वस्तीगृह कारवा व श्री. गजानन मुलांचे वस्तीगृह बोथली (वा) यांचे सन 2015-2016 मध्ये विदयार्थीचे उपस्थिती माहितीदर्शक तक्तानूसार काही विद्यार्थी हे 10 वी व 12 व्या वर्गात असल्यामूळे त्यांना माहे एप्रिल 2016 चे परिपोषण अनुदान देय नाही. सदर वस्तीगृहांना दिलेले परिपोषण अनुदान रूपये 14,400/- वसूलपात्र ठरते.

**3.857 दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर बाबत रक्कम रूपये 11,41,33,154/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 ला ज्या ग्रामपंचायत / पंचायत समिती ला अनुदान वितरीत केले त्या ग्रामपंचायतचे रक्कम प्राप्तीबाबत पावती प्राप्त केल्या नाहीत. तसेच लेखापरीक्षणाचे वेळी अनुदान विनीयोग पत्रे प्राप्त न केल्याने अनुदानाचा उपयोग त्याच कामासाठी केला, याची तपासणी करता आली नाही

2) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2008/प्र.क्र.524/ विघयो-1, दिनांक 14/11/2008 परिशिष्टं - अ मधील 8 नुसार 100 मी. दलीत वस्तींना जोडणारा पोहोच रस्ता घेणेबाबत निर्देश असतांना बृहत आराखडयात रस्त्यांची लांबी दर्शविण्यात न आल्यामुळे खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसू-2013/प्रं.क्रं.85/ अजाक-1, दिनांक 01/08/2013 नुसार या योजनेअंतर्गत होणा-या विकास कामाची तपासणी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबधित अन्यं अधिकारी / कर्मचा-यासोबत करावी. तसेच प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण यांनी अन्यं जिल्हयातील जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे समवेत विकास कामाची 100 टक्के तपासणी करावी. या व्यतिरिक्त 5 टक्के दलित वस्त्यामधील कामाची तपासणी आयुक्त समाजकल्याण, पुणे यांचेमार्फत करण्यात यावी. तथापि, वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

4) लेखापरीक्षण कालावधीपर्यत सन 2015-2016 चे 07 व सन 2016-2017 चे 72 कामे असे एकूण 79 कामे अपूर्ण असून त्यामध्ये मोठया प्रमाणात रक्कमा गुंतल्या असल्याने प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे.

**3.858 शिष्यवृत्ती परिक्षा शुल्क वाटप करण्यातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर बाबत रक्कम रूपये 26,73,935/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाजकल्याण विभागास विविध शाळांकडुन प्राप्त प्रस्तावात लाभार्थ्याचे अर्ज जोडण्यात येत नसुन ऑनलाईन पध्दतीने तयार करण्यात आलेली लाभार्थी यादी जोडण्यात आलेली आहे. तसेच अर्ज मंजुरीबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचे अभिप्राय नमुद करण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे परीशिष्ट 4 नियम 42 नुसार नमुना एपीपी 6 मध्ये सहायक अनुदान नोंदवही नियम 97 व 98 प्रमाणे एपीपी 17 व 18 मध्ये देयके मंजुरीस्तव वित्त विभागाकडे सादर करणेबाबत निर्देश असताना एमटीआर 39 वर मंजुर केल्याने नियमाचे उल्लंघन झाले.

3) लेखापरीक्षणाचे वेळी शिष्यवृत्ती, परीक्षा शुल्क / फी वाटप केल्याबाबत मुख्याध्यापक यांचे विनियोग प्रमाणपत्रे प्राप्त करण्यात आले नाही.

4) प्रमाणक क्रमांक 1158, दिनांक 31/03/2017 या प्रमाणकाच्या नस्तीची तपासणी केली असता जनता विद्यालय, पिपरी धानोरा, पंचायत समिती, गोंडपिपरी या शाळेचे प्रस्ताव लेखापरीक्षण तपासणीच्या वेळी उपलब्ध झाले नाही.

**3.859 इयत्ता 9 वी ते 10 वी पर्यतच्या अनुसूचित जातीच्या मुलींना शिष्यवृत्तीचे प्रदानातील अनिमितताबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदर बाबत रक्कम रूपये 57,33,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी 2012/प्र.क्र. 151/ शिक्षण - 1, दिनांक 04/10/2013 नूसार इयत्ता 9 वी ते 10 वी पर्यंतच्या अनुसूचित जातीच्या मुलींना शिष्यवृत्तीचे प्रदान करतांना अट क्रमांक 3(7) नूसार कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नसल्याने विदयार्थ्यांना अन्य शिष्यवृत्तीचा लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) लाभार्थ्यांचे विनियोग दाखले प्राप्त करणे आवश्यक असतांना विनियोग दाखले नस्तीत उपलब्ध नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे परिशिष्ट 4 नियम 42 अन्वये नमुना एपीपी 6 मध्ये सहायक अनुदान नोंदवही ठेवली नाही. नियम 97 व 98 प्रमाणे नमुना नं एपीपी 17 व एपीपी 18 मध्ये सहाय्यक अनुदानाची व शिष्यवृत्तीची देयके तयार करुन वित्त विभागामध्ये मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक असतांना MTR नमुना 39 मध्ये देयके सादर केले असतांना वित्त विभागाने नियमबाह्य देयके मंजुर केल्याने लेखा संहिता 1968 चे नियम 37 चे उल्लंघन झालेले आहे.

4) लेखापरीक्षण कालावधीपर्यत सदर इयत्ता 9 वी ते 10 वी पर्यतच्या अनुसूचित जातीच्या मुलींना शिष्यवृत्तीचे विदयार्थ्यांना वाटप न केल्याने रक्कम रूपये 57,33,000/- जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या बॅक खात्यात पडून आहे

**3.860 करमणुक केंद्र गोटूल बांधकामाकरीता कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना अनुदान वर्ग करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** 35 गावातील 35 बांधकामावर एकूण अनुदान रूपये 1,70,00,000/- तरतुद असुन दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रूपये 1,69,98,309/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे परिपत्रक क्रमांक/जिपत्र/अमुकाअ/ बांधकाम/91/ 2015, दिनांक 08/01/2015 नुसार कामाचा प्रशासकीय आदेश निर्गमित होण्यापुर्वी कामासाठी लागणाऱ्या जागेच्या उपलब्धतेची खात्री करावी व अनुषंगीक कागदपत्रे बांधकाम विभागास प्रशासकीय मान्यता सोबत सादर करावीत, असे आदेश असतांना तसे कागदपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) शासन निर्णय क्रमांक एफ आर जी 1093/सी आर -2426/25, दिनांक 12/11/1993 यातील मार्गदर्शक तत्वेमध्ये नमुद वन महसुल अनुदानातुन खर्च करण्यासाठी दरवर्षी एक वार्षिक कृती कार्यक्रम आराखडा तयार करणे आवश्यक आहे व आर्थिक वर्षाच्या सुरूवातीस कोणत्याही परिस्थितीत 15 एप्रिल पुर्वी कृती आराखडा विभागीय आयुक्ताकडे माहितीसाठी पाठविणे समाज कल्याण अधिकारी यांची जबाबदारी आहे. असे असतांना सदर प्रक्रियाबाबत अभिलेखे नस्तीस नाही.

3) उपलब्ध असलेले अभिलेख्यावरून बांधकामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्राची तपासणी केली असता, सिमेंट कॉंक्रीट रोड, बांधकाम घोट तालुका चामोर्शी T.S. No. 1399 प्राकलन मुल्य रूपये 7,00,000/- कंत्राटदार ग्रामपंचायत घोट बी1 करारनामा केल्याचा दिनांक 09/05/2016 व कार्यरंभ आदेश नमुद नाही. कामाचा मुल्यांकन रूपये 7,00,133/- असुन काम पुर्ण केल्याचा दिनांक 16/05/2016 आहे. बी1 करारनामा केल्याचा दिनांक 09/05/2016 व काम पुर्ण केल्याचा दिनांक पुर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसार दिनांक 16/05/2016 आहे. अर्थात सिमेंट कॉंक्रीट रोड सात दिवसात पुर्ण केलेला आहे. सिमेंट रोडला कॉंक्रीट परिपक्व होण्यासाठी कमीत कमी 20 दिवस पाणी द्यावे लागते. तेव्हा 7 दिवसात सिमेंट रोड पुर्ण झाल्याने गुणवत्ताबाबत खुलासा होणे आवश्यक आहे

4) 35 बांधकामापैकी किती बांधकाम पुर्ण झाले वा कसे ? याबाबत अंतीम मुल्यांकन प्रमाणपत्र व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर केले नाही.

**3.861 दलीतवस्ती सुधार योजने अतंर्गत केलेल्या प्रस्ताव मजुंरीत झालेल्या अनियमितते बाबत**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-17 मध्ये मंजुर गांव/वस्तीच्या एकुण 484 प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे प्राप्त होते. त्यापैकी 295 प्रस्ताव मजुंर करण्यात आलेले आहे. उर्वरीत प्रस्ताव 189 नामंजुर करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तालुका औरंगाबाद

अ) चित्तेगाव सि.रस्ता कामासाठी 2.00 लाख निधी वितरीत केला आहे. ग्रामपंचायत चित्तेगाव सन 2013-14 ते 2017-18 या वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या बृहत आराखडयात चित्तेगाव वस्तीचा आराखडा क्रमांक 17.1.047 लोकसंख्या 10 असे नमुद आहे, परंतु जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन 2011 मध्ये

जनगणनेनुसार अनुसूचित जातीच्या गाव वस्तीची लोकसंख्या तालुका निहाय प्रसिध्द केलेल्या यादीत चित्तेगावची लोकसंख्या निरंक आहे. रकमा देय नसतांना रुपये 2.00 लक्ष दिलेले असल्यामुळे वसुल करावी.

ब) गोपाळपुर सिमेंट रस्ता कामासाठी 2.00 लाखापैकी 1.80 निधी वितरीत केला आहे. ग्रामपंचायत गोपाळपुर वस्तीचा बृ.आ.क्रमांक 17.1.047 लोकसंख्या बृहत आराखडयात 10 दर्शविली आहे. परंतू जिल्हाधिकारी यांनी प्रसिध्द केलेल्या यादीत लोकसंख्या निरंक आहे. रकमा देय नसतांना रुपये 1.80 लक्ष दिलेली असल्यामुळे वसुल करावी.

क) साताळा व जटवाडा या गावांना सिमेंट रस्ता कामासाठी निधी वितरीत केला आहे. सन 2015-16 मध्ये वस्तीस मंजुर करण्यात आलेले काम पुर्ण झाले किंवा नाही याची शहानिशा केल्यानंतरच निधी वर्ग करणे आवश्यक होते. तसे न करताच निधी वाटप केलेला आहे. याचा खुलासा करावा.

ड) शासन निर्णय दिनांक 05/12/2011 च्या शासन निर्णयात वस्तीत कोणकोणती कामे घ्यावी नमुद आहे. परंतू सौरदिवे काम शासन निर्णयात नमुद नाही. त्यामुळे असे नमुद नसतानाही कामास मंजुरी दिली आहे त्यामुळे टाकळी माळी मलकापूर व जडगाव या गावांना दिलेली रक्कम रूपये 5.40 लाख वसूल करावी.

2) तालुका खुलताबाद

अ) सोनखेडा सिमेंट रस्ता कामासाठी 5.00 लक्ष मंजुर निधी पैकी 4.50 लक्ष निधी वितरीत केला आहे. सन 2015-16 मध्ये वस्तीस मंजुर करण्यात आलेले काम पुर्ण झाले किंवा नाही याची शहानिशा केल्याशिवाय व मागील काम पुर्ण न होताच नवीन कामाला मंजुरी दिली आहे याबाबत खुलासा करावा

3) तालुका कन्नड

अ) वाकी ड्रेनेज कामासाठी 5.00 लक्ष निधी मंजुर असून 4.50 लक्ष निधी वितरीत केला आहे. वाकी वस्तीचा बृहत आराखडयात 145 अनु.जातीची लोकसंख्या दर्शविली आहे. परंतू सन 2011 च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीची लोकसंख्या 100 असून वस्तीस रुपये 8.00 लक्ष देय असून अनुदानापैकी सन 2015-16 अखेर रुपये 7.00 लक्ष मंजुर करण्यात आले आहे. देय रक्कम फक्त 1.00 लक्ष असून जास्तीचे दिलेले रुपये 3.50 लक्ष रुपये वसुल करावे.

4) तालुका पैठण

अ) शासन निर्णय दिनांक 05/12/2011 च्या शासन निर्णयात वस्तीत कोणकोणती कामे घ्यावी नमुद आहे परंतू सौरदिवे काम शासन निर्णयात नमुद नाही. त्यामुळे असे नमुद नसतानाही कामास मंजुरी दिली आहे रकमा देय नसतांना दिलेले रुपये 1.80 लक्ष वसुल करुन अनुपालन अहवाल सादर करावे. त्यामुळे वडगव्हाण, करंजखेड, धनगाव, सोमपूरी व कोळी बोडखा या गावांना दिलेला निधी रक्कम रूपये 11.70 लाख वसूल करावेत.

5) तालुका गंगापुर

अ) नबाबपूर सिमेंट रस्ता कामासाठी रुपये 5.00 लक्ष निधी मंजुर असून 4.50 लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. बृहत आराखडा सांकेतांक 17.07.151 लोकसंख्या 165 नमुद असून जनगणना 2011 अनुसूचित जाती लोकसंख्या 50 नमुद असून त्यानुसार लोकसंख्या प्रमाणात वस्तीस देय अनुदान 5.00 लक्ष देय अनुदान मर्यादा असून यापूर्वी वस्तीस रुपये 2.00 लक्ष अनुदान देण्यात आले असून शिल्लक देय अनुदान 3.00 लक्ष आहे. रुपये 1.50 लक्ष वसुल करावे.

ब) तळपिंप्री सिमेंट रस्ता कामासाठी 5.00 लक्ष निधी मंजुर असून रुपये 4.50 लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. बृहत आराखडा सांकेतांक 17.07.066 लोकसंख्या 151 नमुद असून जनगणना 2011 अनुसूचित जाती लोकसंख्या 65 नमुद असून लोकसंख्या प्रमाणात देय अनुदान रुपये 8.00 लक्ष असून यापूर्वी वस्तीस रुपये 4.91 लक्ष अनुदान देण्यात आलेले असून वस्तीस रुपये 1.41 लक्ष जास्तीचे दिले असुन ते वसुल करावे.

6) तालुका वैजापुर

अ) लाखखंडाळा गायकवाड वस्ती सौरपथदिवे कामासाठी रुपये 5.00 लक्ष निधी मंजुर असून 4.50 लक्ष वितरीत केला आहे. शासन निर्णय दिनांक 05/12/2011 च्या शासन निर्णयात वस्तीत कोणकोणती कामे घ्यावी

नमुद आहे. परंतू सौरदिवे काम शासन निर्णयात नमुद नाही. त्यामुळे असे नमुद नसतानाही कामास मंजुरी का देण्यात आली. रुपये 4.50 लक्ष वसुल करावे.

ब) भायगाव वै.दलितवस्ती सिमेंट रस्ता कामासाठी रुपये 5.00 लक्ष निधी मंजुर असून रुपये 4.50 लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. जनगणना 2011 नुसार अनु.जाती लोकसंख्या 264 दर्शविली असून बृहत आराखडयात दोन सांकेतांकावर लोकसंख्या एकुण 366 नोंद असून सन 2015-16 अखेर गावाचा एकुण खर्च रुपये 16.00 लक्ष असून वस्तीस सन 2016-17 मध्ये समिती बैठक दिनांक 07/10/2016 मंजुरी नुसार मंजुर निधी या आदेशान्वये रुपये 5.00 लक्ष व रुपये 7.00 लक्ष एकुण रुपये 12.00 लक्ष रुपये च्या कामांना मंजुरी देण्यात आली. सदर निधी वितरीत केल्यास गावाचा एकुण खर्च 28.00 लक्ष होतो. जनगणना 2011 मध्ये नमुद लोकसंख्येच्या प्रमाणात सांकेतांकावर नमुद लोकसंख्या असल्यास वस्तीस पात्र अनुदान देय होते. जास्तीचे दिलेली रक्कम वसुल करावे.

क) शासन निर्णय दिनांक 5.12.2011 च्या शासन निर्णयात वस्तीत कोणकोणती कामे घ्यावी नमुद आहे परंतू सौरदिवे काम शासन निर्णयात नमुद नाही. त्यामुळे असे नमुद नसतानाही कामास मंजुरी देण्यात आली त्यामुळे भायगाव गंगा, वळण व भिवगाव या गावांना दिलेले अनुदान रूपये 10.80 लाख वसूल करावे. रुपये पये 4.50 लक्ष वसुल करुन अनुपालन अहवाल सादर करावे.

ड) बाभुळतेल इंदिरानगर सिमेंटरस्ता कामासाठी निधी रुपये 5.00 लक्ष मंजुर करण्यात आला असून रुपये 4.50 लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. जनगणना 2011 नुसार वस्तीची लोकसंख्या 98 असून देय अनुदान रुपये 8.00 लक्ष व 2015-16 अखेर वस्तीच्या देय अनुदानातून रुपये 6.00 लक्ष खर्च असून शिल्लक देय अनुदान रुपये 2.00 लक्ष असतांना निधी वितरीत 4.50 लक्ष करण्यात आलेला आहे. रुपये 2.50 लक्ष वसुल करावे.

इ) भायगाव वै. चांडगाववस्ती समाजमंदिर कामासाठी रुपये 7.00 लक्ष निधी मंजुर करण्यात आला असून रुपये 6.30 लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सन 2015-16 अखेर गावाचा एकुण खर्च रुपये 16.00 असुन वस्तीस सन 2016-17 मध्ये समीती बैठक दिंनाक 7.10.2016 मजुंरी निधी या आदेशान्वये रुपये 5.00 लक्ष व रुपये 7.00 लक्ष एकूण रुपये 12.00 लक्ष कामांना मजुंरी देण्यात आली आहे.सदर मजुंरी निधी वितरीत केल्यास गावाचा एकुण खर्च रुपये 28.00 लक्ष होईल. जनगणना 2011 मध्ये नमुद लोकसंख्येच्या प्रमाणात साकेंताकावर नमुद लोकसंख्या असल्यास वस्तीस पात्र असलेले अनुदाना पेक्षा जास्त रक्कमा दिलेली आहे. जास्तीच्या रक्कमा दिलेल्या वसुल करुन अनुपालन अहवाल सादर करावे

**3.862 स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या वसतिगृहास परिपोषण अनुदान वाटपातील अनियमीततेबाबत जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** शाळा निहाय संचिकेची तपासणी केली असता सन 2016-17 च्या मुलांचे वस्तीगृह यादीमधील नावे व बायोमॅट्रीकद्वारे नोंदणी केलेल्या नावांत शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/माबक-4 मंत्रालय विस्तार भवन,मुंबई - 400 0032, दिंनाक 16/03/1998 नुसार जोडपत्र 8 मधील सहा अन्वये दिनांक अचानक तीन तपासणी अहवाल मुलाचे यादीसह आवश्यक आहे. मुलाची यादी नसल्यामुळे खात्री करता आली नाही.त्याचे विवरण शाळा निहाय खालील प्रमाणे आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) भगवान महाराज मा.वर्गीय वसतीगृह एन्-3 औरंगाबादमध्ये 5 मुलांची नांवे बायोमॅट्रीक यादीत नसतांना रुपये 36,000/- अनुदान दिलेले असुन ते वसुल पात्र आहे

2) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मा.मुलाचे वस्तीगृह एन 13 औरंगाबादमध्ये 1 मुलाचे नांव बायोमॅट्रीक यादीत नसतांना रुपये 9,000/- दिलेले असुन ते वसुल पात्र आहे.

3) सावित्रीबाई फुले मा.मुलींचे वस्तीगृह हडको औरंगाबादमध्ये 1 मुलाचे नांव बायोमॅट्रीक यादीत नसतांना रुपये 9,000/- दिलेले असुन ते वसुल पात्र आहे.

4) द्वारकाबाई मागासवर्गीय मुलीचे वस्तीगृह औरंगाबादमध्ये सचिंकेची तपासणी केली असता मुलांचे वस्तीग्रह अचानक भेट देवुन दोन वेळेस तपासणी केल्याचे दिसुन येते. परंतु तपासणीमध्ये मुलाची यादी दिसुन आली नाही.

5) संत गजानन महाराज मा.मुलांचे वस्तीगृह एन-11 औरगाबादमध्ये सचिंकेची तपासणी केली असता मुलांचे वस्तीग्रहास अचानक भेट देवुन दोन वेळेस तपासणी केल्याचे दिसुन येते. तीन भेटी देणे आवश्यक आहे. दोनच भेटी दिलेल्या आहे. परंतु तपासणीमध्ये मुलाची यादी दिसुन आली नाही

6) बळवंत विदयार्थी वस्तीगृह नाचनवेल औरंगाबादमध्ये 3 मुलांची नांवे बायोमॅट्रीक यादीत नसतांना रुपये 27,000/- दिलेले असुन ते वसुल पात्र आहे. स्थानीक रहिवासी असलेले एकूण सात मुलाना प्रवेश दिलेला दिसुन येतो. शासन निर्णय दिनांक 16/03/1998 अन्वये रुपये 63,000/-वसुल करावे.

7) सबोंधी मा.मुलीचे वस्तीगृह वाळुज औरंगाबादमध्ये सचिंकेची तपासणी केली असता2 मुलीचे वस्तीगृह यादीमधील नावे मराठा ओपन खुल्या प्रवर्गातील मुली दिसुन आली शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/माबक-4 मंत्रालय विस्तार भवन,मुंबई - 400 003, दिनांक 16/03/1998 नुसार मागासवर्गीय मुलींना प्रवेश देता येतो. परंतु वरील खुल्या प्रवागातील मुलीना प्रवेश दिलेला दिसुन आला तसेच व त्यांचा पत्ता व तालुका दिलेला नसल्याचे आढळुन आले. दोन मुलीचे परिपोषणसाठी रुपये 18,000/- दिलेले असुन ते वसुल पात्र आहे. तसेच इमारत भाडे वस्तीगृहास प्रत्येक मुलीना 40 चौरस फुट देय असतांना 58.84 चौ.फुट जागेचे म्हणजेच 18.84 चौ.फुट रक्कम जास्तीची दिली. सदर रक्कम रूपये 1,45,285/- वसूल करावेत.

8) बंजारा विदयार्थी वस्तीगृह मराठवाडा बंजारा सेवा संघ औरंगाबादमध्ये 1मुलाचे नांव बायोमॅट्रीक यादीत नसतांना रुपये 18,000/- दिलेले असुन ते वसुल पात्र आहे

9) संतचोखमळा मा.मुलांचे वस्तीगृह जटवाडा/सारावैभव औरंगाबादमध्ये 2 मुलांची नांवे बायोमॅट्रीक यादीत नसतांना रुपये 9,000/- दिलेले असुन ते वसुल पात्र आहे

10) जिवन ज्योती मानव विकास संस्था मोहरा तालुका कन्नडमध्ये 1 मुलगा खुल्या प्रवर्गातील असल्याने रुपये 9,000/- वसुल पात्र आहे.

### 3.863 जिल्हा परिषद उपकरातून 100 टक्के अनुदानावर मिनी पिठाची गिरणी पुरविणेबाबत

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद उपकरातून 100 टक्के अनुदानावर मिनी पिठाची गिरणी पुरविणेकरिता रक्कम रूपये 49,95,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद उपकर 14-समाजकल्याण मागासवर्गीयांना मिनी पिठाची गिरणी पुरविणे यासाठी दिनांक 30/11/2015 रोजी मूळ अंदाजपत्रकातील तरतूद रूपये 15 लक्ष प्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्यास सादर करण्यात आली होती. असे असतांना सदर योजना सन 2015-2016 मध्ये न राबवता सन 2016-2017 मध्ये राबविली. त्यामूळे लाभार्थी 1 वर्ष लाभापासून वंचित राहील्याचे दिसून येते

2) 4 पात्र निविदा पैकी जगदंबा ॲग्रो इले. जालना व रेणूकाई ट्रेडर्स जालना यांचे दर सारखे रूपये 15,527/- होते. दिनांक 31/08/2016 रोजी वाटाघाटी प्रमाणे रेणूकाई ट्रेडर्स यांनी न्यूनतम दर रूपये 15,000/- सादर केले व स्थायी समिती सभा दिनांक 06/10/2016 ठराव क्रमांक 311 नूसार दरास मान्यता दिली. लाभार्थ्यांची निवड अर्ज प्रस्ताव व संबंधित कागदपत्रे, निवडीचे निकष कोणते लावले, निवड प्रक्रिया कशी राबवली, पात्र लाभार्थींची यादी इ. बाबी संचिकेत नमूद नाहीत.

3) मागील वर्षीच्या उपरोक्त साहित्य पिठाची गिरणी जिल्हयातील 8 पंचायत समितीना किती वितरीत केले, किती अवितरीत (शिल्लक) आहे, याबाबत आढावा घेतल्याचे संचिकेत दिसून आले नाही. आढावा न घेताच साहित्य खरेदी करण्यात आले आहे.

4) कंपनीचे अधिकृत विक्रेतेबाबत कंपनी प्रमाणपत्र, प्राप्तिकर, विक्रीकर भरणा प्रमाणपत्र, विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र, अनूभव दाखला, तीन वर्षातील आर्थिक उलाढालीचा पुरावा इ. संचिकेत दिसून आले नाही. त्यामूळे खरेदी प्रक्रिया योग्य झालेबाबत अधिकृतता दिसून येत नाही.

5) ई-निविदा अनुक्रमांक 28 सर्व साहित्यावर, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, जालना असा नावचा ट्रेड मार्क व वर्ष असणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही झालेबाबत अधिकृत अभिलेखे संचिकेत संलग्न कलेले नाहीत.

6) योजनेच्या अटी व शर्तीनूसार तसेच तांत्रिक मान्यता आदेशामध्ये खालील बाबी नमूद आहेत. लाभार्थी ग्रामिण भागातील मागासवर्गीय असावा, लाभार्थी दारीद्रयरेषेखालील असावा व निवड ग्रामसभेमार्फत असावी, तहसिलदाराचे जातीचे प्रमाणपत्र असावे, योजनेचा लाभ पूर्वी कृषी, महिला व बालकल्याण , पंचायत समिती इतर कडून घेतला नसला पाहिजे, ग्रामसेवकाचा 8 अ चा उतारा व ग्रामसेवक यांचे लाभार्थीस व्यवसायासाठी जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र, MSEB चे विदयुत पुरवठा थकबाकी नसल्याबाबत प्रमाणपत्र, लाभार्थी वय 18 वर्षे पेक्षा जास्त असावे. याबाबत संचिकेत कोणतेही अभिलेखे दिसून आले नाही.

7) करारनामाचे मुद्रांक दिनांक 23/12/2016 रोजी खरेदी केलेले आहे. म्हणजेच पुरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा केल्याचे दिसून येते.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पं.रा.स./1093/प्र.क्र.78/05, दिनांक 09/10/1987 नूसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, साहित्य खरेदी व वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक होते. परंतू, अशी कार्यवाही केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/सीआर1265/ 34, दिनांक 09/12/2003 नूसार लाभार्थ्यांमध्ये 30 टक्के महिलांचा समावेश असणे आवश्यक होते.

10) खरेदी केलेल्या साहित्याची साठा नोंदवहीबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 3 दिनांक 26/12/2017 अन्वये मागणी करुनही ती लेखापरिक्षणात सादर केली नाही.

**3.864 20 टक्के उपकरातून 100 टक्के अनूदानावर मागासवर्गीयांना मिनी पिठाची गिरणी पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** 20 टक्के उपकरातून 100 टक्के अनूदानावर मागासवर्गीयांना मिनी पिठाची गिरणी पुरविणेकरीता रक्कम रूपये 49,87,600/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदी केलेले साहित्य साठा नोंदवहीमध्ये पंचायत समितीला प्राप्त झालेबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 3 दिनांक 26/12/2017 अन्वये मागणी करुनही ते उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र./446/ वित्त- 9, दिनांक 20/06/2008 नूसार योजनेत वेळापत्रकानूसार अंमलबजावणी करणे आवश्यक होते

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक मागास/1093 प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नूसार लाभार्थी यादी गावनिहाय नोंदी दुबार लाभ दिले न गेल्याची नोंद घेणे आवश्यक होते

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये 31 जानेवारी पर्यंत साहित्याचा पुरवठा करुन देयके अदा करुन 31 मार्च पर्यंत विनियोगाचे दाखले प्राप्त करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाली नाही.

5) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र क्रमांक सीपीएम/पीएसओ/6 जि.117/गुनि/5, दिनांक 23/08/2004 मधील परिच्छेद 6 नुसार जिल्हा परिषदेने महाराष्ट्र राज्य, लघू उद्योग, महामंडळ यांचे सुचिवर आणि खुल्या बाजारातील दर यांची तुलना करणे आवश्यक असल्याचे कळवूनही विभागाने लघुउद्योग महामंडळाची दरसुची शासन दरकरार समजून खरेदी केली आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक निविदा-2014/प्र.क्र.164/पवा-7/2014, दिनांक 15/07/2014 नूसार योजनेच्या खरेदीच्या निविदांना ई-निविदा सूचना राज्यपातळीवरील व विभाग पातळीवरील लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

7) टिपण्णी दिनांक 31/10/2016 मान्यता दिनांक 17/10/2016 उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) याबाबत स्वतंत्र संचिका ठेवलेली आहे व टिपणी सादर करतांना त्यावर योजनेचे नाव नाही. कोणत्या योजनेसाठी जाहिरात द्यावयाची आहे, याबाबत नमूद नाही. याबाबत एकाच मूळ संचिकेत या सर्व बाबी असणे आवश्यक असतांना वेगळी संचिका फक्त जाहिरातीसाठी तयार करण्याचे कोणते कारण आहे, याबाबत अनूपालन दर्शवावे.

**3.865 जिल्हा परिषद उपकरातील 3टक्के राखीव निधीमधून 100 टक्के अनूदानावर अपंग लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर विविध साहित्याची रक्कम वर्ग करणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 3 टक्के राखीव निधी सन 2016-2017 या वित्तीय वर्षामध्ये समाजकल्याण विभाग विषय समिती सभा दिनांक 04/06/2016 ठराव क्रमांक 8 नूसार सहा वैयक्तीक लाभाच्या योजनेस मान्यता देण्यात आली होती.

1) अस्थीव्यंगाना कृत्रीम अवयव पुरविणेबाबत रूपये 10 लक्ष लक्षची तरतूद असतांना या बाबींवर खर्च नोंदविण्यात आलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अपंग 2016/प्र.क्र.110/वित्त-3, दिनांक 21/09/2016 मधील सूचना अनुक्रमांक 1 ते 8 (अ, आ) मध्ये नमूद केल्यानूसार अनुक्रमांक 1 अपंगासाठी स्वनिधीमधून 3 टक्के निधी राखीव ठेवून या निधीमधून प्रायोजनाची तरतूद वित्तीय वर्षात पूर्णपणे खर्च करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. अनुक्रमांक 2 व 3 नूसार जिल्हा परिषदेने अपंगासाठी स्वतंत्र अपंग कल्याण निधीची स्थापना करावी व 3 टक्के अपंगासाठी स्वंतत्र अपंग कल्याण निधीची स्थापना करावी व 3 टक्के निधी तांत्रिक अडचणीमूळे त्या वित्तीय वर्षात खर्च न झाल्यास ती रक्कम अपंग निधीमध्ये जमा करणे आवश्यक असतांना वित्तीय वर्ष 2016-2017 मध्ये अशी अशी कार्यवाही केली नाही. अपंग कल्याण निधीमधील एकूण निधीपैकी 25 टक्के रक्कम ही फक्त अपंगाच्या वैयक्तीक लाभावरच खर्च करावी व उर्वरीत 75 टक्के निधी भांडवली कामासाठी खर्च करण्यात यावा. उदा. अपंगासाठी जिल्हा परिषद अखत्यारीत असलेल्या कार्यालयात रॅम्प बांधणे, शाळामध्ये अपंगासाठी शौचालये बांधणे इत्यादी या प्रकारणी विहीत पध्दतीचा अवलंब करुन विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक असतांना व जिल्हा परिषदेने उपरोक्त शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असतांना ती केली नाही.

3) रक्कमा संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करतांना अपंगाचे प्रमाण 40 टक्के पेक्षा कमी नसावे व जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अपंगाचे प्रमाणपत्र ग्रामसेवकांचा अपंग लाभाचा अहवाल इत्यादी बाबी लाभार्थ्यांच्या विहीत नमून्यातील अर्जासोबत जोडणे आवश्यक असतांना संबंधित लाभार्थ्यांचे अर्ज संचिकेत दिसून आले नाही. त्यामूळे लाभ कोणत्या अधारे दिला, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) समाजकल्याण विभागाने दिनांक 30/03/2017 रोजी वरील प्रमाणकान्वये धनादेश वित्त विभागाकडून प्राप्त करुन समाजकल्याण विभागाचे वेतन व भत्ते SBI शिवाजी पुतळा जालना येथील खाते क्रमांक 62048619865 वर जमा केला आहे व दिनांक 31/03/2017 पर्यंत वरीलप्रमाणे सर्व साहित्याच्या रक्कमा लाभार्थीच्या खात्यामध्ये वर्ग करणे आवश्यक असतांना विभागाने अशी कार्यवाही केली नाही व समाजकल्याण विभागाच्या रोख पुस्तिकेत रक्कमा रूपये 25,06,100/- जमा ठेवलेल्या आहेत. याबाबत खुलासा करावा.

**3.866 वस्तीगृहांना नियमबाहय ईमारत भाडे प्रदान करणे बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** वस्तीगृहांना रक्कम रूपये 13,38,022/- ईमारत भाडे प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) प्र.क्र.434, दिनांक 31/03/2017 रुपये 6,51,024/- माहे 01/11/2016 ते 28/02/2017 ईमारत भाडे छत्रपती शाहु मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह लिंबारुई(देवी) तालुका बीड यांना प्रदान केले आहे.

या वस्तीगृहाच्या नस्तीची तपासणी केली असता यावर लेखा अभिप्राय पुढील प्रमाणे :-

1) जावक क्रमांक 1214, दिनांक 06/09/2012 अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार शाहु मागसवर्गीय विदयार्थी वस्तीगृह वासनवाडी वरुन लिबारुई देवी येथे स्थलांतर केले आहे. त्यामुळे सदर वस्तीगृहाला लिंबारुई देवी येथील भाडे प्रदान करताना माहे 9/2012 पासुन करणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्ष त्यांना माहे 6/2012 पासुन प्रदान केले आहे. तरी 3 महिन्याचे 27,126/- प्रमाणे 81,378/- चे 75% रुपये 61,033/- वसुलपात्र ठरते.

2) प्रत्येक विदयार्थ्यासाठी कमाल 40 फुट जागा अनुज्ञेय आहे त्यानुसार 48 विदयार्थ्यांकरिता 1920 चौरस फुट क्षेत्रफळ कमाल असणे आवश्यक आहे. मुल्यांकनानुसार 1920 चौरस फुटाकरिता दरमहा रुपये 8,709/- वस्तीगृहास अनुज्ञेय आहे म्हणजे रुपये 18,417/- चे दरमहा जादा भाडे वस्तीगृहास अदा होत आहे त्यामुळे वस्तीगृहास 25 महिन्यांचे रुपये 4,60,425/- (दिनांक 01/02/2015 ते 31/03/2017) अतिप्रदान झालेले आहे ते वस्तीगृहाच्या अनुदानातुन त्वरीत वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे

3) सदर वस्तीगृहाचे प्रमाणपत्रावरील हस्ताक्षर व प्रमाणपत्रावर असलेली हे प्रमाणपत्र दिनांक 01/06/2012 पासुन लागु असल्याचे हस्ताक्षरा मध्ये तफावत दिसुन येते.

ब) प्रमाणक क्रमांक 81/07-2016, रुपये 18,837/- आनंद छात्रालय, बीड यांचे माहे 01/03/2016 ते 31/05/2016 या कालावधीचे इमारत भाडे दरमहा 8372 x 03 = 25116 @75%.

1) सदर वस्तीगृहाची नस्ती तपासली असता वस्तीगृहाला विद्यार्थी संख्या 36 मान्य असुन सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांचे प्रमाणपत्र जावक क्रमांक 2195, दिनांक 29/03/2011 नुसार इमारत क्रमांक 2321 ही 2392 चौरस फुट असुन त्याचे भाडे मुल्यांकन दिनांक 01/06/2006 पासुन रुपये 8,372/- दर्शविण्यात आले आहे. परंतु प्रत्येक विदयार्थ्यासाठी कमाल 40 फुट जागा अनुज्ञेय आहे त्यानुसार 36 विदयार्थ्यांकरिता 1440 चौरस फुट क्षेत्रफळ कमाल असणे आवश्यक आहे व शासन निर्णयानुसार 1440 चौरस फुटाकरिता दरमहा रुपये 5,040/- वस्तीगृहास अनुज्ञेय आहे म्हणजे रुपये 3,332/- दरमहा जादा भाडे वस्तीगृहास अदा होत आहे त्यामुळे वस्तीगृहास दिनांक 01/06/2006 पासुन 31/03/2017 पर्यंत 130 महिन्यांचे (130 x 3332) रुपये 4,33,160/- अतिप्रदान झालेले आहे ते वस्तीगृहाच्या अनुदानातुन त्वरीत वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे

क) प्रमाणक क्रमांक 334, दिनांक 31/03/2017 रुपये 98,482/- संचालक, जनता वस्तीगृह, धानोरा तालुका आष्टी इमारत भाडे दिनांक 01/09/2016 ते 28/02/2017. (21885 x 6 = 1,31,310/- @ 75%)

1) या वस्तीगृहाला 84 विद्यार्थी संख्या मान्य असुन वस्तीगृहाच्या नस्तीची तपासणी केली असता सदर वस्तीगृह ग्रामपंचायत हद्दीत घर क्रमांक 587 या ठिकाणी आहे व सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांचे भाडे मुल्यांकन प्रमाणपत्र क्रमांक 3045, दिनांक 09/06/14 अन्वये 2922 चौरस फुट करिता रुपये 21,885/- दरमहा भाडे अनुज्ञेय करण्यात आले आहे.

परंतु उपरोक्त मुद्दा क्रमांक ब मधील बीड या शहरी ठिकाणचे 2392 चौरस फुटाकरिता रुपये 8,372/- भाडे मुल्यांकित होत असताना ग्रामीण ठिकाणी (ग्रामपंचायत हद्द) 2,922/- चौरस फुटाकरिता रुपये 21,885/- भाडे अवाजवी व असंयुक्तीक असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. याबाबत समाजकल्याण विभागाने उचित कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

ड) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील काही भाडे मुल्यांकन प्रमाणपत्रावर इमारतीचे क्षेत्रफळ नमुद केलेली नाही. त्यामुळे अशाच प्रकारची अनियमीतता इतर वस्तीगृहामध्ये झाल्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे उक्त शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक विदयार्थ्यांना अनुज्ञेय क्षेत्रफळापेक्षा जादा क्षेत्रफळाची रक्कम वसुलपात्र ठरते.

उपरोक्त बाबी उदाहरणादाखल असुन मागिल कालावधित तसेच या आर्थिक वर्षात इतर वस्तीगृहांबाबतही अशा प्रकारची अनियमितता झाली असल्यास त्याचा आढावा घेउन नियमानुसार सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

इ) गहीनीनाथ वसतिगृह अमळनेर यांना भाडयापोटी जादा अदा रक्कम रुपये 17,976 /- वसूल करावी.

मागील सन 2014-15 व 2015-16 चे लेखापरीक्षणादरम्यान अशाच पध्दतीचे जादा इमारत भाडे अदाईचे परिच्छेद असताना समाजकल्याण विभागाने याकडे दुर्लक्ष करुन सदर वसुली न करता अथवा संबंधीत वसतिगृहांवर कारवाई न करता नियमबाहयपणे त्यांना अनुदान वितरीत केले आहेत. याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक ठरते.

**3.867 जिल्हा परीषद उपकर अंतर्गत मागासवर्गीयांना पिको फॉल मशिन पुरवठा करणेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2)** - सदरबाबत रक्कम रुपये 33,99,850/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दिनांक 05/12/2016 मधील अनुक्रमांक 2 व 3 मध्ये उल्लेख करण्यांत आलेल्या अटी व शर्तीनुसार जिल्हा समाजकल्याण विभागाने कार्यवाही करण्यांत आली नाही.

2) सदरील योजनेची लाभार्थी निवड यादी तयार करुन त्यास समाज कल्याण विभागाच्या मासिक सभेत मंजूरी घेतलेली नाही व मंजूर केलेले 485 तालुकानिहाय लाभार्थ्यांचे प्रस्ताव अर्ज तपासले असता त्या अर्जावर- "प्रस्तावाची प्रस्तुत पंचायत समिती स्तरावर योग्य प्रकारे तपासणी करण्यात आली असून आवश्यक त्या सर्व अटी अर्जदार पूर्ण करीत असल्यामुळे अर्जदाराचा प्रस्ताव परिपूर्ण असून सदर प्रस्तावाची पंचायत समिती स्तरावरून निवडीसाठी शिफारस करण्यात येत असल्याबाबतच्या" गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या काही अर्जावर दिसून आल्या नाहीत. तसेच समाजकल्याण विभागास प्राप्त झालेले अर्ज हे परिपूर्ण नसून अर्जदार हे त्यातील अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे दिसून आले. तेंव्हा या मंजूर प्रस्ताव अर्जांची छाननी सबंधित कर्मचारी व गटविकास अधिकारी यांनी योग्य प्रकारे केली नसल्याचे दिसून येते.

3) सदर पुरवठादाराच्या आदेशात पुरवठा कालावधी नमुद केला आहे त्यामुळे उशिरा साहित्य प्राप्त झाल्यामुळे पंचायत समिती पालमने 11 दिवस उशिराने माल प्राप्त झाल्याबाबत दंडाची रक्कम देयकातून वसुल करणेबाबत विभागास कळविणे आवश्यक होते. प्रत्यक्षात दिनांक 29/08/2016 ला माल प्राप्त झालेला असतांना दिनांक 18/08/2016 रोजी तो प्राप्त झाल्याचे दर्शविणे नियमबाहय व पुरवठादाराचे हितसंबंध जपणारे आहे. पंचायत समिती पुर्णा यांची साहित्य साठा नोंदवही तपासणीकरीता लेखा परीक्षणांस उपलब्ध करुन दिली नाही.

4) तसेच प्राप्त ई-निविदाचे (दरपत्रक) जिल्हा परीषद स्तरावर योग्य रितीने तपासणी केली नसल्याचे दिसून येते. संचिकेतील पुरवठादाराच्या कागदपत्राची तपासणी केली असता पुरवठादाराचा दुकान परवाना हा सन 2015-2016 पर्यत नुतनीकरण केलेला आहे. सन 2016-2017 चा नुतनीकरण परवाना नसतांना सुध्दा विभागाने सन 2016-2017 या वित्तीय वर्षात मालाचा पुरवठा आदेश देणे अवैध ठरते.

5) या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव अर्जासोबत अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. त्या अटी व शर्तीमधील अनुक्रमांक 6 नुसार या योजने अंतर्गत मागासवर्गीयांना पिको फॉल मशीनचा लाभ घेण्यासाठी सदरील लाभार्थीच्या प्रस्तावासोबत संलग्न करण्यांत आलेले कागदपत्रे यांची तपासणी केली असता अर्जासोबत शासन मान्यताप्राप्त अथवा शासन अंगीकृत मान्यताप्राप्त संस्था यांचे पिको फॉल / शिलाई मशिन चालविण्यांचे प्रशक्षिण पुर्ण केल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडलेले नाही जे नियमबाहय आहे. तसेच कांही लाभार्थींनी खाजगी टेलरचे व ग्रामपंचायत कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र जोडलेले आहे. तर कांही लाभार्थीनी अर्जासोबत प्रमाणपत्र जोडलेले नाही. आणि ज्या कांही ठराविक खाजगी संस्थांची अनुभव प्रमाणपत्रे जोडलेली आहेत त्याबाबत सांशकता निर्माण होते. त्यामुळे योग्य लाभार्थीची निवड झाल्याचे दिसून येत नाही. तसेच कुटूंबात दोन अपत्येपेक्षा जास्त अपत्ये असतांना सदरील योजनेचा लाभ देण्यांत आलेला आहे. त्यामुळे योग्य लाभार्थीची निवड झाल्याचे दिसून येत नाही.

6) या योजनेच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक 4 रूपये100/- च्या मुद्रांक शुल्कावर लाभार्थीनी यापूर्वी लाभ घेतला नसल्याचे व पिको फॉल मशिन प्राप्त झाल्यास त्याचा दुरुपयोग न करण्याबाबतचा करारनामा शपथपत्र

अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 5 मध्ये नमुद केलेला ग्रामसभेच्या लाभार्थी निवडीबाबत ठरावाची मूळ प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तथापि, मंजूर 485 लाभार्थींच्या अर्जासोबत अशा प्रकारची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

7) एकाच लाभार्थ्यास शासन / जिल्हा परिषद / पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतची पडताळणी करण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर समाज कल्याण विभागाने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. मात्र अशी नोंदवही ठेवल्याचे आढळून आले नाही.

8) एकुण 485 मागासवर्गीय लाभार्थी निवड यादीमधील 32 लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त नसतांना लाभ पिको फॉल मशिन वाटप करण्यांत आली आहे. सदर साहित्याची रक्कम रूपये 2,24,320/- वसूल करणे आवश्यक वाटते.

9) सदर योजना राबविल्यामुळे प्रस्तावनेत नमूद केलेले योजनेचे उदिष्ट साध्य झालेबाबत व लाभार्थी यांचे आर्थिक जिवनमानात बदल झाला असल्याने योजना यशस्वी झालेबाबत गटविकास अधिकारी यांनी पाहणी करून उपयोगिता प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. तथापि, अशा प्रकारची पाहणी / तपासणी करून अहवाल प्राप्त केलेला नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37(1) अन्वये वित्त विभागाने देयकांची परिपूर्ण तपासणी करून नियम 39 चे परिशिष्ट-4 मधील नियम 22 अन्वये देयकावर आक्षेपाची टिप्पणी लिहून त्यावर अभिप्राय नोंदवावयास पाहिजे होते. परंतु, अशी उचित कार्यवाही झालेचे दिसून आले नाही. त्यामुळे नियमबाह्यता होऊन जादा प्रदान झालेले आहे.

11) एकंदरीत या सर्व बाबींचा परामर्श घेतला असता सदरील योजनेचा महिलांना किती व कसा लाभ झाला, याची फलश्रुती योजनेच्या उद्दिष्ठानुसार झालेली नसल्याचे स्पष्ट होते

**3.868 जिल्हा परीषद स्वउत्पन्नातून 20 टक्के राखीव निधीमधून मागासवर्गीयांना शेवई मशिन पुरवठा करणेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत रक्कम रुपये 29,80,670/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दिनांक 05/12/2016 मधील अनु.क्रमांक 2 व 3 मध्ये उल्लेख करण्यांत आलेल्या अटी व शर्तीनुसार जिल्हा समाजकल्याण विभागाने कार्यवाही करण्यांत आली नाही.

2) पुरवठा आदेशात विभागाने शेवई मशिन पंचायत समिती स्तरावर पुरवठा केल्याची पोहाच पावती गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची स्वाक्षरी घेवून विभागास सादर करणे आवश्यक असल्याचे नमुद करणे ऐवजी पिको फॉल मशिनचा पुरवठा केल्याची पोहोच पावती सादर करण्यांत यावी, असे नमुद केले आहे.

3) सदरील योजनेची लाभार्थी निवड यादी तयार करुन त्यास समाजकल्याण विभागाच्या मासिक सभेत मंजूरी घेतलेली नाही व मंजूर केलेले 154 तालुकानिहाय लाभार्थ्यांचे प्रस्ताव अर्ज तपासले असता त्या अर्जावर- “प्रस्तावाची प्रस्तुत पंचायत समिती स्तरावर योग्य प्रकारे तपासणी करण्यात आली असून आवश्यक त्या सर्व अटी अर्जदार पूर्ण करीत असल्यामुळे अर्जदाराचा प्रस्ताव परिपूर्ण असून सदर प्रस्तावाची पंचायत समिती स्तरावरून निवडीसाठी शिफारस करण्यात येत असल्याबाबतच्या” गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या काही अर्जावर दिसून आल्या नाहीत. तसेच समाज कल्याण विभागास प्राप्त झालेले अर्ज हे परिपूर्ण नसून अर्जदार हे त्यातील अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे दिसून आले. तेंव्हा या मंजूर प्रस्ताव अर्जांची छाननी सबंधित कर्मचारी व गटविकास अधिकारी यांनी योग्य प्रकारे केली नसल्याचे दिसून येते.

4) सदर पुरवठा दाराच्या आदेशात पुरवठा कालावधी नमुद केला आहे त्यामुळे उशिरा साहित्य प्राप्त झाल्यामुळे पंचायत समिती गंगाखेडने साठा नोंदवही दिनांक 07/10/2016 रोजी माल प्राप्त झाल्याबाबतची नोंद साठा नोंदवहीत करण्यांत आली आहे. परंतु, डिलेव्हरी चालनवर माल दिनांक 12/09/2016 रोजी प्राप्त झाल्याबाबत

पंचायत समितीने स्वाक्षरी करुन देणे नियबाहय आहे. तसेच पंचायत समिती, पुर्णा यांची साहित्य साठा नोंदवही तपासणीकरीता लेखापरीक्षणांस उपलब्ध करुन दिली नाही.

5) संचिकेतील टिपणी क्रमांक 80 दिनांक 22/07/2016 नुसार मुख्य लेखा व वित अधिकारी यांनी एकुण 155 नग खरेदीस मंजूरीसाठी अभिप्राय नोंदविला आहे. सदर अभिप्राय व खर्चास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुध्दा दिनांक 25/07/2016 रोजी मान्यता दिली असतांना विभागाने फक्त 154 नगाचा पुरवठा आदेश दिला आहे. तसेच पुरवठादाराने निविदा मंजूर झाल्यामुळे विभागास एक वर्षाच्या कालावधीचा F.D.R. स्वरुपात धनादेश क्रमांक 822794 रक्कम रूपये 90,000/- प्रदान केली होती. सदरील धनादेश जिल्हा परीषदेच्या उपकर खाती जमा न करता संचिकेत असल्याचे लेखापरीक्षणांदरम्यान दिसून आले आहे.

6) या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव अर्जासोबत अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. त्या अटी व शर्तीमधील अनुक्रमांक 6 नुसार या योजने अंतर्गत मागासवर्गीयांना शेवई मशीनचा लाभ घेण्यासाठी सदरील लाभार्थींच्या प्रस्तावासोबत संलग्न करण्यांत आलेले कागदपत्रे यांची तपासणी केली असता कुटूंबात दोन अपत्येपेक्षा जास्त अपत्ये असतांना सदरील योजनेचा लाभ देण्यांत आलेला आहे. तसेच काही लाभार्थी यांचे वार्षीक उत्पन्न हे रूपये 50,000/- पेक्षा जास्त असतांना सुध्दा लाभ प्रदान करण्यांत आला आहे. एकाच कुटूंबातील दोन व्यक्तींना लाभ प्रदान केला आहे व निवड करण्यांत आलेल्या निवड यादीतील काही लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त नसतांना लाभ प्रदान केल्याचे साठा नोदवहीवरून दिसून आले आहे. त्यामुळे योग्य लाभार्थीची निवड झाल्याचे दिसून येत नाही.

7) या योजनेच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक 4 रूपये 100/- च्या मुद्रांक शुल्कावर लाभार्थींनी यापूर्वी लाभ घेतला नसल्याचे व पिको फॉल मशिन प्राप्त झाल्यास त्याचा दुरुपयोग न करण्याबाबतचा करारनामा शपथपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 5 मध्ये नमुद केलेली ग्रामसभेच्या लाभार्थी निवडीबाबत ठरावाची मूळ प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तथापि, मंजूर 154 लाभार्थींच्या अर्जासोबत अशा प्रकारची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

8) एकाच लाभार्थ्यास शासन / जिल्हा परिषद / पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतची पडताळणी करण्यासाठी जिल्हा परीषद स्तरावर समाजकल्याण विभागाने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. मात्र अशी नोंदवही ठेवण्यांत आल्याचे दिसून आले नाही. मात्र काही लाभार्थ्यांना दुबार लाभ दिलेचे दिसते.

9) एकुण 154 मागासवर्गीय लाभार्थी निवड यादीमधील 28 लाभार्थ्यांच्या प्रस्ताव योग्यरितीने परिपुर्ण नसतांना लाभ शेवई मशिन वाटप करण्यांत आली आहे. सदर साहित्याची रककम रूपये 5,41,940/- वसूल करावी.

10) सदर योजना राबविल्यामुळे प्रस्तावनेत नमूद केलेले योजनेचे उदिष्ट साध्य झालेबाबत व लाभार्थी यांचे आर्थिक जिवनमानात बदल झाला असल्याने योजना यशस्वी झालेबाबत गटविकास अधिकारी यांनी पाहणी करून उपयोगिता प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. तथापि, अशा प्रकारची पाहणी / तपासणी करून अहवाल प्राप्त केलेला नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37(1) अन्वये वित्त विभागाने देयकांची परिपूर्ण तपासणी करून नियम 39 चे परिशिष्ट-4 मधील नियम 22 अन्वये देयकावर आक्षेपाची टिप्पणी लिहून त्यावर अभिप्राय नोंदवावयास पाहिजे होते परंतु, अशी उचित कार्यवाही झालेचे दिसून आले नाही. त्यामुळे नियमबाहयता होऊन जादा प्रदान झालेले आहे.

12) एकंदरीत या सर्व बाबींचा परामर्श घेतला असता सदरील योजनेचा महिलांना किती व कसा लाभ झाला, याची फलश्रुती योजनेच्या उद्दिष्ठानुसार झालेली नसल्याचे स्पष्ट होते

**3.869 जिल्हा परीषद स्वउत्पन्नातून 20 टक्के राखीव निधीमधून महिलांना मागासवर्गीयांना मिरची कांडप यंत्र मशिन पुरवठा करणेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत रक्कम रुपये 19,99,999/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दिनांक 05/12/2016 मधील अनुक्रमांक 2 व 3 मध्ये उल्लेख करण्यांत आलेल्या अटी व शर्तीनुसार जिल्हा समाजकल्याण विभागाने कार्यवाही करण्यांत आली नाही.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी पक्रिया करीता ई-निविदा मागवून केली असतांना सुध्दा समाज कल्याण विभागाने परत पुरवठादार यांना दरामध्ये वाटाघाटी करणेसाठी पत्र देवून वाटाघाटीअंती पुरवठा दाराने सदरील वस्तुचा दर रक्कम रूपये 14,598/- वरुन 14,492.75 केला म्हणजेच प्रती नग रक्कम रूपये 105.75 दर कमी केला आहे. परंतु, ई-निविदा झाल्यानंतर विभागास वाटाघाटी करण्यांची कोणत्याही अधिनियमात / लेखासंहितेत तरतुद नसल्याचे लेखापरीक्षणाचे मत आहे.

3) पुरवठा आदेशात विभागाने मिरची कांडप यंत्र पंचायत समिती स्तरावर पुरवठा केल्याची पोहोच पावती गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची स्वाक्षरी घेवून विभागास सादर करणे आवश्यक असल्याचे नमुद करणे ऐवजी पिको फॉल मशिनचा पुरवठा केल्याची पोहोच पावती सादर करण्यांत यावी, असे नमुद केले आहे.

4) सदरील योजनेची लाभार्थी निवड यादी तयार करुन त्यास समाजकल्याण विभागाच्या मासिक सभेत मंजूरी घेतलेली नाही व मंजूर केलेले 138 तालुकानिहाय मागावर्गीय महिला लाभार्थ्यांचे प्रस्ताव अर्ज तपासले असता त्या अर्जावर- "प्रस्तावाची प्रस्तुत पंचायत समिती स्तरावर योग्य प्रकारे तपासणी करण्यात आली असून आवश्यक त्या सर्व अटी अर्जदार पूर्ण करीत असल्यामुळे अर्जदाराचा प्रस्ताव परिपूर्ण असून सदर प्रस्तावाची पंचायत समिती स्तरावरून निवडीसाठी शिफारस करण्यात येत असल्याबाबतच्या" गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या काही अर्जावर दिसून आल्या नाहीत. तसेच समाजकल्याण विभागास प्राप्त झालेले अर्ज हे परिपूर्ण नसून अर्जदार हे त्यातील अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे दिसून आले. तेंव्हा या मंजूर प्रस्ताव अर्जाची छाननी सबंधित कर्मचारी व गटविकास अधिकारी यांनी योग्य प्रकारे केली नसल्याचे दिसून येते.

5) पंचायत समिती, पुर्णा यांची साहित्य साठा नोंदवही तपासणीकरीता लेखापरीक्षणांस उपलब्ध करुन दिली नाही.

6) या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव अर्जासोबत अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. त्या अटी व शर्तीमधील अनुक्रमांक 6 नुसार या योजने अंतर्गत मागासवर्गीय महिलांना मिरची कांडप यंत्राचा लाभ घेण्यासाठी सदरील लाभार्थीच्या प्रस्तावासोबत संलग्न करण्यांत आलेले कागदपत्रे यांची तपासणी केली असता कुटूंबात दोन अपत्येपेक्षा जास्त अपत्ये असतांना सदरील योजनेचा लाभ देण्यांत आलेला आहे. तसेच काही लाभार्थी यांचे वार्षीक उत्पन्न हे रूपये 50,000/- पेक्षा जास्त असतांना सुध्दा लाभ प्रदान करण्यांत आला आहे. एकाच कुटूंबातील दोन व्यक्तींना लाभ प्रदान केला आहे व निवड करण्यांत आलेल्या निवड यादीतील काही लाभार्थ्याचे प्रस्ताव प्राप्त नसतांना लाभ प्रदान केल्याचे साठा नोदवहीवरून दिसून आले आहे. त्यामुळे योग्य लाभार्थीची निवड झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे केलेली निवड प्रक्रिया ही वित्तीय औचित्यास अनुसरून नसून सदर बाब महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी आहे.

7) या योजनेच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक 4 रूपये 100/- च्या मुद्रांक शुल्कावर लाभार्थींनी यापूर्वी लाभ घेतला नसल्याचे व पिको फॉल मशिन प्राप्त झाल्यास त्याचा दुरुपयोग न करण्याबाबतचा करारनामा शपथपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अट क्रमांक 5 मध्ये नमुद केल्यानुसार ग्रामसभेच्या लाभार्थी निवडीबाबत ठरावाची मूळ प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तथापि, मंजूर 154 लाभार्थीच्या अर्जासोबत अशा प्रकारची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

8) एकाच लाभार्थ्यास शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतची पडताळणी करण्यासाठी जिल्हा परीषद स्तरावर समाज कल्याण विभागाने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

9) एकुण 138 मागासवर्गीय महिला लाभार्थी निवड यादीमधील 18 लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त नसतांना लाभ मिरची कांडप यंत्र मशिन वाटप करण्यांत आली आहे. सदर साहित्याची रक्कम रूपये 2,60,874/- वसूल करावी.

10) सदर योजना राबविल्यामुळे प्रस्तावनेत नमूद केलेले योजनेचे उदिष्ठ साध्य झालेबाबत व लाभार्थी यांचे आर्थीक जिवनमानात बदल झाला असल्याने योजना यशस्वी झालेबाबत गटविकास अधिकारी यांनी पाहणी करून उपयोगिता प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. तथापि, अशा प्रकारची पाहणी/तपासणी करून अहवाल प्राप्त केलेला नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37(1) अन्वये वित्त विभागाने देयकांची परिपूर्ण तपासणी करून नियम 39 चे परिशिष्ट-4 मधील नियम 22 अन्वये देयकावर आक्षेपाची टिप्पणी लिहून त्यावर अभिप्राय नोंदवावयास पाहिजे होते. परंतु, अशी उचित कार्यवाही झालेचे दिसून आले नाही. त्यामुळे नियमबाह्यता होऊन जादा प्रदान झालेले आहे.

12) एकंदरीत या सर्व बाबींचा परामर्श घेतला असता सदरील योजनेचा महिलांना किती व कसा लाभ झाला, याची फलश्रुती योजनेच्या उद्दिष्ठानुसार झालेली नसल्याचे स्पष्ट होते

**3.870 स्वयंसेवी संस्थाद्यारा चालविण्यांत येणा-या वस्तीगृहातील परिपोषण अनुदान प्रदानांतील अनियमितता व झालेल्या जादा प्रदानांबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परीषद, परभणीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणांत स्वयंसेवी संस्थाद्यारा चालविण्यांत येणाऱ्या वस्तीगृहातील 40 टक्के परिपोषण अनुदान प्रदानांवर 48 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 79,33,400/- खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक BCH-1097/ प्र.क्र.-107/मावक-4 दिनांक 16/03/1998 मधील नियम 8(अ) नुसार मान्यता दिलेल्या वस्तीगृहास मागील वर्षी संस्थेने केलेल्या मान्य बाबीवरील एकुण खर्चाच्या 60 टक्के किंवा मंजूर संख्येनुसार प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्याच्या सरासरी संख्येप्रमाणे दहा महिन्यांकरीता विहीत दराने आकारण्यांत येणा-या 60 टक्के इतकी रक्कम अग्रीम अनुदान म्हणून मंजूर करुन उर्वरित 40 टक्के अंतिम अनुदानाची रक्कम अग्रीमाचे समायोजनेसह प्रदान करण्यांत येईल. तथापि, मागील वर्षी संस्थेने मान्य बाबीवरील एकुण खर्च विचारात न घेता सरसकट मंजूर विद्यार्थी संख्येनुसार प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्याच्या सरासरी संख्येप्रमाणे दहा महिन्यांकरीता विहीत दराने अनुदान निर्धारण करण्यांत आले आहे. त्यामुळे मान्य बाबीवरील खर्च कमी होवूनही जादा प्रदान झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) वस्तीगृहाच्या मासिक तपासणीसाठी जाणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना उक्त शासन निर्णयातील नियम 6 नुसार उपस्थित विद्यार्थ्याची हजेरीची संख्या व मुलांची नावे नमुद करणे आवश्यक आहे तथापि, अशी कार्यवाही न होता तपासणी अहवालात केवळ विद्यार्थी संख्या नमुद करण्यांत येते.

3) श्री. शिवाजी विद्यार्थी वस्तीगृह परभणी यांचे मान्य विद्यार्थीसंख्या 54 असून त्यापैकी 07 विद्यार्थ्याच्या गावाचे नावे नमुद असून उर्वरीत विद्यार्थ्यी कोणत्या गावाचे / शहरातील रहिवाशी आहेत याबाबत समाजकल्याण विभागाकडून 40 टक्के अंतिम परीपोषण अनुदान प्रदान करतेवेळी अथवा वस्तीगृहास भेटीच्या वेळी अहवालात नमुद केले नाही. तसेच सदरील समाज कल्याण निरीक्षक / समाज कल्याण अधिकारी यांनी वस्तीगृहास भेटी दिल्याबाबतच्या दैनंदिन्या लेखा परीक्षणांच्या वेळी तपासणीकरीता उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यामुळे वस्तीगृहास देण्यांत आलेल्या भेटी हया कागदोपत्री असल्याचे दिसून येते त्यामुळे वस्तीगृहास प्रदान करण्यांत आलेले परीपोषण अनुदान योग्य निकष लावून प्रदान केले नसल्याचे दिसून येते

4) बाळ गंगाधर लोकमान्य टिळक वस्तीगृह परभणी यांच्या सनदी लेखापरीक्षण अहवालात सन 2015-2016 चे कर्मचारी मानधन रक्कम रूपये 2,28,000/- प्रदान केले असतांना अहवालात मात्र रूपये 1,71,000/- प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे. रक्कम रूपये 57,000/- तफावतीबाबत खुलासा करण्यांत यावा. तसेच समाजकल्याण विभागाकडे मागील वर्षाचे कर्मचारी मानधन प्रदान करणे बाकी राहिलेले नाही.

5) संबोधी मागासवर्गीय मुलींचे वस्तीगृह परभणी यांच्या विद्यार्थीमान्य संख्येबाबत अभिलेखे दर्शविले नाहीत. विद्यार्थी कोणत्या गावचे रहिवाशी आहेत. हे प्रवेश यादीत नमुद करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यांत आलेली नाही. सदरील विद्यार्थ्यांचा कोणत्या शाळेत चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला, याबाबत प्रवेश यादीत नमुद नाही. संबोधी विद्यालय हे उच्च माध्यमीक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय असल्याबाबतचे कोणतेही अभिलेखे संचिकेत तपासणीच्या वेळी दिसून आले नाहीत. त्यामुळे एकुण विद्यार्थ्यांपैकी 14 विद्यार्थ्यी इयता 11वी, 12वी मध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रवेश यादीत नमुद केले आहे. तसेच सदरील विद्यार्थ्यांचा जातीचा प्रवर्ग प्रवेश यादीत नमुद करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही वस्तीगृह यांचेकडून केली नाही तसेच मागील वर्षाचे विद्यार्थी पास / नापास अहवाल संचिकेत संलग्न करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नसतांना सुध्दा समाजकल्याण विभागाकडून सदरील वस्तीगृहाचे परीपोषण देयके पारीत करुन प्रदान केली आहेत तेंव्हा महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37(2) प्रमाणे विभागाकडून देयकाची सुव्यवस्थितरित्या तपासणी होत नसल्याचे स्पष्ट दिसून येते.

6) जयहिंद मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह परभणी यांचे वस्तीगृहात 48 मान्य विद्यार्थी संख्या असून 08 विद्यार्थी हे आर्थिकदृष्टया कुमकवत घटकातील असल्याचे निकष संचिकेत जोडलेले नाहीत आणि विद्यार्थ्यांचे गाव ते वसतीगृहामधील अंतर हे 08 कि.मी. पेक्षा कमी असतांना सुध्दा वस्तीगृहात प्रवेश दिल्याचे प्रवेश यादीवरुन दिसून येते. तसेच मान्य विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी याचे नाव शाळेच्या प्रवेश यादीत नाही किंवा सदर वस्तीगृहात राहत असलेबाबत वस्तीगृहाच्या यादीत नाव नसतांना परीपोषण अनुदान प्रदान केले आहे. सदर अनुदान रक्कम रूपये 9,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

7) आदर्श मागासवर्गीय मुलींचे वस्तीगृह परभणी यांच्या मान्य विद्यार्थी संख्येपैकी 06 मुली खानापूर गावच्या रहिवासी असल्याचे प्रवेश यादीत दर्शविण्यांत आले आहे. एक विद्यार्थीनी स्थानिक असून एका विद्यार्थीनीचे नांव प्रवेश यादीत दोन वेळा नमुद केल्यामुळे एका विद्यार्थ्याचे परीपोषण मानधन अनुज्ञेय नाही (साखरे पल्लवी गोविंद वर्ग 9 वा) सदर अनुदान रक्कम रूपये 9,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

8) जवाहर विद्यार्थी वस्तीगृह मानवत यांची मान्य विद्यार्थी संख्या 120 असून विद्यार्थी गाव ते वस्तीगृह अंतर प्रवेश यादीत नमुद नाही. प्रस्ताव कधी सादर केला, याबाबत वस्तीगृहाचे पत्र घेण्यांत आले नाही वस्तीगृहाचे 60 टक्के परीपोषण देयक हे मार्च महिण्यांत पारीत केले आहे. तेंवहा सदरील देयके समाजकल्याण विभागास उशिरा सादर केले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तेंव्हा माहे ऑक्टोबरपर्यंत देयक सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील देयकातून कोणताही दंड वसुल केलेला नाही

9) माता हौसाबाई आठवले, मा. विद्यार्थी वस्तीगृह उखळी बु ता. सोनपेठ मान्य विद्यार्थी संख्या 24 असून त्यापैकी 05 विद्यार्थी हे स्थानिक रहिवासी आहेत. तसेच संचिकेत सन 2015-2016 चा सनदी लेखापाल यांचा लेखापरीक्षण अहवाल नसतांना सुध्दा समाजकल्याण विभागाकडून देयकाची सुव्यवस्थितरित्या तपासणी होत नसल्याचे दिसून येते. तेव्हा 5 विद्यार्थ्यांची परीपोषण मानधन रक्कम रूपये 45,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते. सदर रक्कम संबंधित तथा जबाबदार यांचेकडून वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन करण्यांत यावे.

10) गहेनिनाथ विद्यार्थी वस्तीगृह चाटोरी मान्य विद्यार्थी संख्या 24 असून त्यापैकी बचाटे आकाश भास्कर इयत्ता 9 वी व व जाधव बालू उत्तमराव इयता 10 हे विद्यार्थी कोणत्या शाळेत सन 2016-2017 या शैक्षणीक वर्षात शिक्षण घेतात, हे नमुद नाही. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांच्या नांवे प्रदान करण्यांत आलेले परीपोषण अनुदान रक्कम रूपये 18,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते. तसेच वस्तीगृह प्रवेश यादीतील विद्यार्थी कोणत्या गाव / तालुक्यातील रहिवाशी आहेत, स्थानिक विद्यार्थी नसल्याबाबत अभिलेखे दर्शवून अनुपालन करण्यांत यावे. तसेच वस्तीगृह ते विद्यार्थी गावाचे अंतर प्रवेश यादीत नमुद करणे आवश्यक आहे परंतु, अशी कार्यवाही वस्तीगृहाकडून करण्यांत आलेली नाही

11) जिजामाता मुलींचे वस्तीगृह पालम मान्य विद्यार्थी संख्या 24 असून सदर विद्यार्थी कोणत्या गावच / तालुक्यातील रहिवाशी आहेत, हे प्रवेश यादीत नमुद नाही. स्थानिक विद्यार्थी नसल्याची अभिलेखे दर्शवून

अनुपालन करण्यांत यावे. तसेच पौळ प्रतिक्षा बापूसाहेब (इयता 11वी) ही विद्यार्थीनी सन 2016-2017 मध्ये वस्तीगृहात प्रवेश आहे परंतु, राजमाता जिजाबाई भोसले विद्यालय, पालममध्ये शिकत असल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे सदर परीपोषण अनुदान रक्कम अमान्य करण्यांत येते. तेंव्हा रक्कम रूपये 9,000/- वसुल करुन शासन खाती भरणा करण्यांत यावी.

12) माता रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वस्तीगृह राणीसावरगाव मान्य विद्यार्थी संख्या 48 असून त्यापैकी 13 विद्यार्थी हे सावित्रीबाई फुले आश्रमशाळेत शिक्षण घेत असल्याचे नमुद आहे. परंतु, सदरचे विद्यार्थी हे त्याच आश्रमशाळेचे निवासी विद्यार्थी नसल्याचे आश्रमशाळेचे प्रमाणपत्र परीपोषण देयकासोबत जोडणे आवश्यक आहे, परंतु, अशी कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे सदरील आश्रमशाळेचे अभिलेखे दर्शवून अनुपालन करण्यांत यावे.

13) संघमित्रा मुलींचे वस्तीगृह पुर्णा मान्य विद्यार्थी संख्या 48 असून एका विद्यार्थ्याची परीपोषण अनुदान रक्कम रूपये 9,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

14) सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह कोद्री, मान्य विद्यार्थी संख्या 72 असून त्यापैकी 01 मुस्लीम, 10 बौध्द (महार), 01-मातंग, 01- चांभार असून सदरचे विद्यार्थी हे स्थानिक रहिवासी असल्यामुळे त्यांना प्रदान करण्यांत आलेले परीपोषण अनुदान रक्कम (मुस्लीम व महार एकुण 11 विद्यार्थी) रूपये 99,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

15) सर्वोदय विद्यार्थी वस्तीगृह, जिंतूर मान्य विद्यार्थी संख्या 40 आहे. 6 विद्यार्थी यांचे वस्तीगृह प्रवेश यादीत व शाळेच्या प्रवेश यादीत नावात व शिक्षण घेत असलेल्या वर्गात फरक असल्यामुळे सदरचे विद्यार्थी प्रत्यक्षात कोणत्या वर्गात शिक्षण घेतात व त्यांचे खरे नांव काय आहे, याबाबत अभिलेखे दर्शवून अनुपालन करण्यांत यावे.

तेंव्हा परीपोषण अनुदानाची प्रदान करण्यांत आलेली रक्कम रूपये 54,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

16) सावित्रीबाई फुले मुलींचे वस्तीगृह, जिंतूर यांची मान्य विद्यार्थी संख्या 24 आहे. सदरील संस्थेचा सनदी लेखापाल अहवाल संचिकेत तपासणीच्या वेळी दिसून आला नाही. तेंव्हा परीपोषण अनुदान रक्कम रूपये 9,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

17) भगवान बाबा मुलांचे वस्तीगृह केहाळ, तालुका जिंतूर यांची मान्य विद्यार्थी संख्या 24 आहे. तसेच कांबळे राजू लिंबाजी वर्ग 10 वा (आंध) हा विद्यार्थी स्थानिक रहिवाशी असतांना सुध्दा वस्तीगृह प्रवेश यादीत नाव समाविष्ट करुन त्याचे परीपोषण अनुदान प्रदान करण्यांत आले आहे. तसेच मुलाच्या गाव ते वस्तीगृह अंतर प्रवेश यादीत नमुद करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही. तरी जादा प्रदान परीपोषण अनुदान रक्कम रूपये 9,000/- अमान्य करण्यांत येते.

18) बी.सी. होस्टेल, सेलू यांची मान्य विद्यार्थी संख्या 48 आहे. सदरील वस्तीगृहातील प्रवेश यादीत व शाळेच्या प्रवेश यादीत तफावत असल्याचे तपासणीअंती दिसून आले आहे.

एकुण 07 विद्यार्थ्यापोटी प्रदान करण्यांत आलेले परिपोषण अनुदान रक्कम रूपये 63,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

19) डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वस्तीगृह, परभणी यांची मान्य विद्यार्थी संख्या 24 आहे. सदरील वस्तीगृहातील 2 विद्यार्थ्यांच्या प्रवेश यादीत व शाळेच्या प्रवेश यादीत तफावत असल्याचे तपासणीअंती दिसून आले आहे.

तसेच 8 विद्यार्थी हे जिल्हा परिषद कन्या प्रशाला परभणी शाळेत सन 2016-2017 साठी प्रवेश घेतल्याचे शाळेच्या प्रवेश यादीवरुन दिसून येते. परंतु, सदरील शाळा ही कन्या प्रशाला असून माध्यमिक वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा प्रवेश कोणत्या नियमाच्या आधारे दिला गेला, याबाबत समाजकल्याण विभागाचा अभिप्राय घेण्यांत यावा.

तेंव्हा सदरील वस्तीगृहास प्रदान करण्यांत आलेले परीपोषण अनुदान रक्कम रूपये 90,000/- लेखापरीक्षणांत अमान्य करण्यांत येते.

**3.871 यशवंत विद्यार्थी वस्तीगृह परभणी यांना समाज कल्याण निरीक्षक यांनी चुकीच्या पध्दतीने विद्यार्थी मान्यसंख्या गृहीत धरुन 40 टक्के अंतिम परिपोषण अनुदानाची रक्कम कर्मचारी मानधन व इमारत भाडे जादा रक्कम प्रदानांबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 27, दिनांक 14/12/2016 अन्वये रक्कम रूपये 57,600/- 40 टक्के अंतिम परिपोषण अनुदान प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

यशवंत विद्यार्थी वस्तीगृह परभणी यांची परीपोषण, कर्मचारी मानधन व इमारत भाडे संचिका तपासली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी असतांना सुध्दा समाज कल्याण निरीक्षक यांनी त्यामध्ये उणीवांची पुर्तता करुन देयके पारीत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता चुकीच्या पध्दतीने कार्यवाही केल्यामुळे सदरील वस्तीगृहास जादा प्रदान झाले आहे.

1) यशवंत विद्यार्थी वस्तीगृह परभणी यांची शासन मान्यतेनुसार मान्य विद्यार्थी संख्या 66 आहे.

तसेच समाजकल्याण विभागाकडून प्रथम 60 टक्के अग्रीम देयक हे सुध्दा उक्त विद्यार्थी मान्यसंख्येनुसार पारीत करुन प्रदान केले आहे.

समाजकल्याण निरीक्षक यांनी संचिकेतील टिपणी क्रमांक 27 दिनांक 07/11/2016 नुसार सदरील वस्तीगृहातील सन 2014-2015 मधील सरासरी विद्यार्थी उपस्थिती ही 45.66 म्हणजेज 46 मान्य करुन त्याप्रमाणे अंतिम 40 टक्के परीपोषण अदा करण्यांत यावे, असे टिपणीत नमुद करुन देयक पारीत करुन परीपोषण अनुदान रक्कम प्रदान केली आहे. जे शासन समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 नुसार चुकीच्या पध्दतीने प्रदान केले आहे.

सदरील वस्तीगृहास परीपोषण अनुदानाची रक्कम रूपये 12,011/- जादा अनुदान प्रदान केले आहे.

2) तसेच शासन समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन, निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 नुसार व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांचे इमारत भाडे मुल्यांकन प्रमाणपत्र क्रमांक 3354 दिनांक 26/04/2016 नुसार सदरील वस्तीगृहाचे एकुण क्षेत्रफळ 112.45 चौ.मीटर असल्याचे प्रमाणपत्रात नमुद केले आहे. त्यामुळे इतक्या क्षेत्रफळात शासन निर्णयानुसार जास्तीत जास्त 31 विद्याथी राहणे आवश्यक आहे. तेंव्हा जादा 35 विद्यार्थ्यावर झालेला परीपोषणाचा खर्च रक्कम रूपये 3,15,000/- संबंधित तथा जबाबदार यांचेकडून वसुल होणे आवश्यक आहे.

3) तसेच वस्तीगृह संस्थापक यांनी इमारत भाडे मिळणेबाबतचा अर्ज दिनांक 22/04/2016 रोजी समाजकल्याण विभागास सादर केला आहे. (आवक क्रमांक 1821 दिनांक 27/04/2016) रोजी प्राप्त झाला असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 44(1) अन्वये परिषदेला किंवा समितीला एखाद्या मागणीची रक्कम देय झाल्यापासून एक वर्षाच्या आत पाठविण्यांत न आल्यास ती मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूरीशिवाय देता येत नाही, अशी तरतुद असतांना सदरील वस्तीगृहाचे माहे 11/2015 ते 03/2016 पर्यतचे इमारत भाडे प्रतिमाह रक्कम रूपये 2,974/- च्या 75 टक्के म्हणजेच रूपये 2,230/- प्रमाणे एकुण रक्कम रूपये 11,150/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन करण्यांत यावे.

4) तसेच समाजकल्याण विभागाने मान्य विद्यार्थी संख्या शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-2009/प्र.क्र.339/शिक्षण-2, दिनांक 15/06/2013 नुसार जास्तीत जास्त 48 विद्यार्थी संख्येकरीता 03 कर्मचारी अनुज्ञेय असतांना सदरील वस्तीगृह कर्मचारी मानधन हे 05 कर्मचा-यांचे प्रदान केल्यामुळे दोन कर्मचारी (एक स्वयंपाकी व एक मदतनिय) यांचे जादा प्रदान वेतन अनुक्रमे प्रती माह रूपये 6,000/-

व रूपये 5,000/- प्रमाणे 12 महिन्यांचे एकुण रक्कम रूपये 1,32,000/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शविण्यांत यावे.

5) तसेच मुदतबाहय इमारत भाडे प्रदानांकरीता वित्त विभाग, लेखाधिकारी यांची टिपणी क्रमांक 16 दिनांक 04/08/2016 नुसार मुदतबाहय मंजूरी आदेशासह अदाईचा प्रस्ताव अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करणेसाठी नमुद केले असतांना विभागाने फक्त एक नोटीस वजा पत्र वस्तीगृह चालकास देवून खुलासा मागविला व त्याप्रमाणे सदरील वस्तीगृहाचे मागील वर्षाचे म्हणजेच माहे 04/2013 ते 10/2013 या कालावधीचे इमारत भाडे प्रती माह रूपये 2,974/- च्या 75 टक्के म्हणजेच रूपये 2,230/- प्रमाणे एकुण 07 महिन्यांचे रक्कम रूपये 15,610/- प्रदान केले आहे. तेंव्हा प्रदानास अमान्य असलेली रक्कम रूपये 15,610/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन करण्यांत यावे.

6) तसेच सदरील वस्तीगृहाच्या संचिकेत सन 2016-2017 मधील वस्तीगृह प्रवेश यादी व शाळेतील प्रवेश यादी दिसून आली नाही. तेंव्हा महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37(2) प्रमाणे समाज कल्याण विभागात कोणत्याही देयकाची सुव्यवस्थितरित्या तपासणी होत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. तसेच वित विभागाकडून दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यांत येत नसल्याचे सुध्दा दिसून येते

**3.872 ग्रामीण भागातील लाभधारकांना टिन पत्रे वाटपातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** ग्रामीण भागातील लाभधारकांना टिन पत्रे वाटपाकरिता रक्कम रूपये 5,15,850/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड करताना लाभार्थी निवड ही शासन निर्णय दिनांक 01/09/1993 मध्ये नमूद केल्यानुसार तालुकानिहाय मागासवर्गियांची लोकसंख्या विचारात घेवून त्यानुसार लाभार्थी निवड केल्याचे दिसून आले नाही

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2001/प्र.क्र.132/ पं.स.7(26), दिनांक 05/09/2002 नुसार दरकरार अस्तित्वात नसताना निविदा प्रक्रीया पूर्ण करण्यापूर्वी उद्योग संचालनालयाच्या मध्यवर्ति भांडार संघटनेकडून दरकरार अस्तित्वात नसल्याबाबत लेखी स्वरुपात खात्री करुन घ्यावी. परंतु समाज कल्याण विभागाने अशी खात्री केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1083/ प्र.क्र.1239/ 34, दिनांक 01/19/1993 आणि मागास 1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 4 प्रमाणे विवरणपत्र अ मध्ये मागासवर्गिय जाती व गावनिहाय याद्या तयार केल्या पाहिजेत व लाभ धारकास वैयक्तिक लाभ / साहित्य दिल्यानंतर त्याची नोंद त्या नोंदवहीत केली पाहिजे, परंतु याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे एकाच लाभधारकास दोन वेळा लाभ झाला नसल्याबाबत खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. पीआरसी 1093/ सी.आर. /1074/57 दिनांक 29/07/1983 नुसार जिल्हा परिषद ने घेतलेल्या योजना राबविताना योजनेचा हेतू सफल होत आहे किंवा नाही याबाबत योग्यतेचा सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत दिसून आला नाही. त्यामुळे योजना सफल झाल्याची पडताळणी करता आली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/सीआर-1265/34, दिनांक 09/12/2003 नुसार 30% महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही. तेव्हा याबाबत खुलासा करावा.

6) योजनेच्या अटी व शर्ती नुसार :-

अ) लाभधारक हा मागासवर्गिय प्रवर्गातील असावा परंतु जातीचे प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही.

ब) रहिवासी प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही.

क) लाभधारकाचे उत्पन्न प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही.

ड) ग्रामसेवक / सरपंच यांचे लाभधारकाचे घरावर टिनपत्रे नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संचिकेत आढळून आले नाही.

ई) नमुना नंबर 8 गावउतारा प्रत संचिकेत नाही.

7) टिनपत्रे खरेदी करण्यासाठी प्रथम वेळेस दिनांक 05/11/2016 ते 11/11/2016 या कालावधीत ऑनलाईन निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु सदरच्या निविदा प्रक्रीयेमध्ये प्रथम वेळेस दोन निविदा प्राप्त झाल्या. परंतु नियमानुसार तीन निव्दिा प्राप्त होणे आवश्यक आहे. तेव्हा याबाबत अनुपालन सादर करावे.

8) प्रति लाभार्थी टिनपत्रे रक्कम रूपये 6,000/- कशाचे आधारे ठरविण्यात आली याबाबत कोणते निकष लावण्यात आले, तसेच किती टिनपत्रे लाभधारकास देण्यात आले याबाबत अनुपालन सादर करावे.

**3.873 रोख नोंदवही नमूना नंबर 4 व बँकस्क्रोलमधील अपहाराबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परीषद, नांदेडचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात लेखाविभागाची रोख नोंदवही व बँकस्क्रोलची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पचांयत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 49 व 50 (2) नुसार प्राप्त झालेली रक्कम कोणताही विलंब न लावता अशी रक्कम रोखवहीत नोंद घेवुन वाटप करावी व उर्वरीत रक्कमेचा गोषवारा (कमी/जादा) काढावा. परंतु, अशी कार्यवाही नमूना नंबर 4 ला केल्याचे दिसुन येत नाही.

तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक भानिम 2010 प्र.क्रं.553/10 वित्त 9, दिनांक 19/04/2011 मधील सुचना क्रमांक 22 व लेखा संहिता उक्त नियमांचे तंतोतंत पालन केले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 26(01) नुसार धनादेश पुस्तकातील धनादेश मोजणीचे प्रमाणपत्र विभाग प्रमुखाने त्यांच्या दिनांकीत सहीने मलपृष्ठावर नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केलेली नाही. तसेच धनादेश पुस्तकांचा हिशोबही नमुना -1 ठेवण्यात आले नाही.

उक्त अधिनियमाचे नियम 26(2) अन्वये धनादेश पुस्तक विभाग प्रमुख यांच्या अभिरक्षेत कुलुपबंद करुन ठेवणे आवश्यक आहे. रोखपालास एक वेळी फक्त एकच धनादेश पुस्तक दिले जाईल. तथापि, नियमाप्रमाणे कार्यवाही न केल्याने संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचे निष्काळजीपणामुळे सदरील अपहार झाल्याचे स्पष्ट होते. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये 13,50,000/- ची वसुल करुन शासन खाती भरणा करावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक असक-2012/प्र.क्रं.16 / जल11, दिनांक 19/05/2012 मधील सूचना क्रमांक 12 अन्वये शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती, विदयावेतन व वैयक्तीक लाभार्थी यांची प्रदाने इलेक्ट्रॉनीक क्लीअरन्स सिस्टीम ECS ने च अदा करावीत, अशा स्पष्ट सूचना असताना विभागाने विदयार्थ्यांच्या खाते रक्कम जमा करणे आवश्यक असतांना सदर शिष्यवृत्तीची रक्कम व आंतरजातीय विवाह प्रोत्साहन रक्कम समाजकल्याण अधिकारी यांच्या खातेवर जमा करुन पुन्हा वाटप केल्याचे दिसुन येते. सदर प्रक्रीया नियमबाहय असुन अपहार होण्यास कारणीभुत ठरते.

4) अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही सादर केली नसल्याने पत्र क्रमांक 03 दिनांक 01/01/2018 अन्वये परत मागणी केली असता जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परीषद, नांदेड यांचे पत्र दिनांक 12/01/2018 अन्वये माहिती प्राप्त झाली. सदर माहिती नुसार खाते क्रमांक 0052148837921 अन्वये रक्कम उचल केली. सदर खाते हे श्री. शशीकांत शंकरराव धीरडीकर, वाचा उपचार तज्ञ यांचे आहे. सदर व्यक्ती मुकबधीर विदयालय, बिलोली येथे कार्यरत असुन सन 2015 पासुन प्रतिनियुक्तीने तात्पुरत्या स्वरुपात या जिल्हा परीषद समाजकल्याण विभागात संगणक चालक म्हणुन कामकाज करीत होते. त्या कालावधीत संबंधीतांने नियमबाहय उपरोक्त रक्कम स्वतःच्या खाती जमा करुन अपहार केल्याचे दिसुन आले. संबधीतांवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी व रक्कम वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

**3.874 मागासवर्गीयांना स्वयंरोजगारासाठी लॅपटॉप पूरवठा करणेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी सन 2016-17 या वित्तीय वर्षात मागासवर्गीयांना स्वयंरोजगारासाठी लॅपटॉप खरेदी करीता रक्कम रुपये 17,65,894/- जिल्हा परिषद उपकर निधी मधून खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: डिसीटी 2316/प्र.क्र. 133/का.1417, दिनांक 5 डिसेंबर, 2016 मधील परिच्छेद क्रमांक 2 अ ते ओ पर्यंतची कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजने अंतर्गत लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2 अ प्रमाणे संबधित वस्तूबाबत वितरण योजना तयार करणे आवश्यक असतांना विभागाने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2) वस्तु विकत घेंण्यासाठी अनुदान ठरवत असतांना विभागाने महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-2014/प्र.क्र.82/ भाग-III/उद्योग-4, दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील तरतुदींचा भंग करुन खुल्या स्पर्धेस प्रोत्साहन देऊन अनुदान निश्चित करण्याऐवजी स्पर्धा मर्यादित केली आहे. सदर योजना एकूण रुपये 18.00 लक्ष किंमतीची होती. उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3.21 नुसार विभागाने खुली निविदा / खुली स्पर्धात्मक निविदा, ई-निविदा पध्दतीने मागविणे आवश्यक होते. तथापि विभागाने केवळ उस्मानाबाद शहरातील तीन पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून रास्त बाजारभाव प्राप्त केले नाहीत.

3) राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र कार्यालय उस्मानाबाद यांचेकडील पत्र क्रमांक NIC/OSM/admin/2K17/18-02/01 दिनांक 18/02/2017 रोजी Specification ठरवून घेतले आहेत व दरपत्रके विभागाचे पत्र जा.क्र. जिपउ/ सकवि /20%सेस/ कावी/ 2017/212 नूसार दिनांक 17/02/2017 रोजी मागविले आहेत. यामध्ये विभागाने Specification न ठरवताच दरपत्रके मागविली आहेत. तसेच दरपत्रक आमंत्रण पत्रात Laptop चे कोणतेही Specification नमूद केले नाहीत. त्यामुळे विभागास प्राप्त झालेले दर हे कोणत्या Specificaion चे आहेत याची खात्री होत नाही.

4) प्राप्त दरपत्रकापैकी रितेश स्टील इंडस्ट्रीज उस्मानाबाद व साईनाथ सेल्स उस्मानाबाद यांचे दरपत्रक लेटरपॅडवर भ्रमणध्वनी क्रमांक 9421874813 व 9420694005 सारखेच आहेत. विभागाने हितसंबध संघर्ष आहे काय याची खातरजमा केलेली नाही. दोन्हीपैकी रितेश स्टील इंडस्ट्रिज उस्मानाबाद यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रुपये 29850 असून त्याआधारे प्रति लाभार्थी अनुदान रुपये 29500 ठरविण्यात आले असून 60 लाभार्थ्यांपैकी 47 लाभार्थ्यांच्या खरेदी पावत्या रितेश इंडस्ट्रीजच्या आहेत. सदर योजनेत उस्मानाबाद-17, तुळजापूर-07, उमरगा-12, लोहारा-09, कळंब-08, भूम-01, परंडा-01, वाशी-05 लाभार्थी असून त्यापैकी 47 लाभार्थी खरेदी ही L1 च्या दुकानातून आहे. त्यामुळे विभागाने शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3.2.3 व 4.2 च्या अनुषंगाने प्रकरण पाच मध्ये निर्देशित केल्या प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही झाली नाही.

5) विभागाने दर आमंत्रित करताना लागू असलेल्या सर्व कर, इतर कर व शुल्क / वाहतूक खर्च वस्तूच्या किमंतीपासून वेगवेगळे दाखवण्याची सूचना दरपत्रकात करणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही झाली नाही.

6) योजनाअंतर्गत पात्रतेच्या निकषामध्ये योजनेच्या प्रारुप मध्ये MSCIT प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असतांना श्री. राजेद्रं सिताराम गिरी, एकूरगा, ता. कळंब यांनी MSCIT प्रमाणपत्र दिलेले नाही. त्यांचे प्रस्तावा सोबत बालाजी टेक्नीकल इंन्स्टीट्युट कळंब येथुन टेलीफोन ऑपरेटरचा कोर्स केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. संबधीताला लॅपटॉप खरेदी करीता दिलेले रुपये 29500/- वसूल होणे आवश्यक आहे. तसेच उत्तम प्रभाकर भालेराव, सुपतगाव ता, उमरगा यांचे प्रस्तावा सोबत MSCIT प्रमाणपत्र सिध्दार्थ कांबळे यांचे आहे. उत्तम प्रभारक भालेराव याचे MSCIT प्रमाणपत्र नसतांना त्यांना दिलेले रुपये 29500/- वसूल होणे आवश्यक आहे.

7) लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

8) सर्व 60 लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या पावत्यावर Laptop चे Specification नमुद केलेले नाहीत. त्यामुळे ज्या Specification च्या Laptop साठी रुपये 29500 अनुदान ठरवले आहे त्यापेक्षा कमी Specification चे Laptop खरेदी होऊन चुकीचे अनुदान प्रदान झाले काय याची खात्री करता आली नाही.

9) विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाव्दारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे त्या ठिकाणी वस्तु स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रकमेच्या स्वरुपात अनुदान दिल्यास, स्थानिक पातळीवरच लाभार्थी वस्तु खरेदी करणार असल्याचे स्थानिक उद्योग व्यवसायिकांना लाभ होईल. परंतु सदर प्रकरणात विभागाने उस्मानाबाद जिल्हयातील सर्व तालुकास्तरावर दरपत्रके मागणी न करता फक्त उस्मानाबाद येथील दरपत्रके प्राप्त करुन घेतल्यामुळे श्री. किसन रावसाहेब गायकवाड, तुरोरी, ता. उमरगा यांनी श्री. छत्रपती शिवाजी इंन्फोटेक उमरगा यांची लॅपटॉप खेरेदीची पावती रुपये 25594/- ची सादर केलेली आहे. याच किमंतीवर जर योजना राबविली असती तर जिल्हा परिषदेचे रक्कम रुपये 2,30,254/- चे नुकसान झालेले आहे. मुक्त स्पर्धा न करता दरपत्रके मागविल्यामुळे जिल्हा परिषदेचे झालेले रुपये 2,30,254/- चे नुकसान संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन वसूल होणे आवश्यक आहे.

10) लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे शासनाकडून विविध विभागाकडून योजना राबविण्यात आलेल्या आहेत याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षी ही लाभ दिला गेला किंवा नाही हे तपासता आले नाही.

11) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास 1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच समाज कल्याण अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी लाभ दिल्यानंतर चाचणी तपासणी केलेली नाही त्यामुळे सदर योजना राबविल्यामुळे लाभार्थ्यांना काय फायदा झाला याबाबत पडताळणी करता आली नाही.

12) मागासवर्गीयांना स्वयंराजगारासाठी लॅपटॉप खरेदीसाठी त्यांना रक्कम प्रदान केल्यांतर संबधीत लाभधारक यांचे कडील लॅपटॉप चालू आहे किंवा नाही याची तपासणी करुन त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली किंवा कसे याबाबतचे तपासणी अहवाल योजना राबविणारे समाज कल्याण अधिकारी यांनी अशा प्रकारची तपासणी केलेली नाही. त्यामुळे मागासवर्गीय लाभधारकांना लॅपटॉप पूरवठा केल्यानंतर व आगोदरचे उत्पन्नात काय बदल झाला याबाबत फलश्रुती अहवाल संचिकेत उपलब्ध नाहीत. प्रस्तुत योजना राबविण्याचा मागचा मुळ उद्देश सफल झाला असल्याचे दिसून येत नाही.

**3.875 मागासवर्गीय महिलांना 100 % अनुदानावर मिरची कांडपयंत्र पूरवठा करणेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी सन 2016-17 या वित्तीय वर्षात मागासवर्गीय महिलांना मिरची कांडपयंत्र खरेदी करीता रक्कम रुपये 22,80,862/- जिल्हा परिषद उपकर निधी मधून खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: डिसीटी 2316/प्र.क्र. 133/का.1417, दिनांक 5 डिसेंबर, 2016 मधील परिच्छेद क्रमांक 2 अ ते ओ पर्यंतची कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजने अंतर्गत लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2 अ प्रमाणे संबधित वस्तूबाबत वितरण योजना तयार करणे आवश्यक असतांना विभागाने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2) वस्तु विकत घेंण्यासाठी अनुदान ठरवत असतांना विभागाने महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्यण क्रमांक भाखंस-2014/प्र.क्र.82/ भाग-III/उद्योग-4, दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील तरतुदींचा भंग करुन खुल्या स्पर्धेस प्रोत्साहन देऊन अनुदान निश्चित करण्याऐवजी स्पर्धा मर्यादित केली आहे. सदर योजना एकूण रुपये 18.00 लक्ष किंमतीची होती. उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3.21 नुसार विभागाने खुली

निविदा / खुली स्पर्धात्मक निविदा, ई-निविदा पध्दतीने मागविणे आवश्यक होते. तथापि विभागाने केवळ उस्मानाबाद शहरातील तीन पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून रास्त बाजारभाव प्राप्त केले नाहीत.

3) दरपत्रक आमंत्रण पत्रात मिरची कांडपचे कोणतेही स्पेसीफीकेशन व आयएसआय मार्क असल्याचे नमूद केले नाहीत. त्यामुळे विभागास प्राप्त झालेले दर हे कोणत्या स्पेसीफीकेशनचे आहेत याची खात्री होत नाही.

4) प्राप्त दरपत्रकापैकी रितेश स्टील इंडस्ट्रीज उस्मानाबाद व साईनाथ सेल्स उस्मानाबाद यांचे दरपत्रक लेटरपॅडवर भ्रमणध्वनी क्रमांक 9421874813 व 9420694005 सारखेच आहेत. विभागाने हितसंबध संघर्ष आहे काय याची खातरजमा केलेली नाही. दोन्हीपैकी रितेश स्टील इंडस्ट्रिज उस्मानाबाद यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रुपये 24790 असून त्याआधारे प्रति लाभार्थी अनुदान रुपये 24790 ठरविण्यात आले असून 92 लाभार्थ्यांपैकी 91 लाभार्थ्यांच्या खरेदी पावत्या रितेश इंडस्ट्रीजच्या आहेत. लॅपटॉप खरेदीमध्येही वरील पुरवठादाराकडून दरपत्रके मागविणेत आलेली आहेत.

5) विभागाने दर आमंत्रित करताना लागू असलेल्या सर्व कर, इतर कर व शुल्क / वाहतूक खर्च वस्तूच्या किमंतीपासून वेगवेगळे दाखवण्याची सूचना दरपत्रकात करणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही झाली नाही.

6) लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

7) सदर प्रकरणात विभागाने उस्मानाबाद जिल्हयातील सर्व तालुकास्तरावर दरपत्रके मागणी न करता फक्त उस्मानाबाद येथील दरपत्रके प्राप्त करुन घेतल्यामुळे श्रीमती संगिता विठ्ठल माळगे, अचलेर, ता. लोहारा यांनी मिरची कांडपयंत्र खेरेदीची पावती रुपये 24062/- ची सादर केलेली आहे. याच किमंतीवर जर योजना राबविली असती तर जिल्हा परिषदेस रुपये 67,158/- चे नुकसान झालेले आहे. मुक्त स्पर्धा न करता दरपत्रके मागविल्यामुळे जिल्हा परिषदेचे झालेले रुपये 67,158/- चे नुकसान संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन वसूल होणे आवश्यक आहे.

8) लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे शासनाकडून विविध विभागाकडून योजना राबविण्यात आलेल्या आहेत याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षी ही लाभ दिला गेला किंवा नाही हे तपासता आले नाही.

9) जिल्हास्तरीय खरेदी समितीने मिरची कांडप यंत्र खरेदीसाठीचे दर रुपये 24790/- मंजुर केलेले असतांना समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी 91 लाभधारकांना रुपये 24800/- मंजुर करुन प्रदान केल्यामुळे ( 91 x 10) = रुपये 910/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदानाची रक्कम रुपये 910/- संबधीत अधिकारी यांच्याकडून वसूल होणे आवश्यक आहे.

10) श्रीमती शालन शंकर चव्हाण, जवळा (नि), ता. परंडा यांना मे. शहा एजन्सी मशीन स्टोअर्स बार्शी यांचे पावती क्रमांक 1455 दिनांक 31-03-2017 मिरची कांडपयंत्र खरेदीची पावती रुपये 23500/- ची जोडलेली असतांना त्यांना रुपये 24800/- प्रदान केल्यामुळे ( 24800 - 23500 ) = रुपये 1300/- चे जादा प्रदान झालेले आहे. संबधीताकडून जादा प्रदानाची रक्कम रुपये 1300/- वसूल होणे आवश्यक आहे.

11) श्रीमती पूनम माधव गायकवाड, होळी, ता. लोहारा यांनी मे. अश्विनी इंटरप्राईजेस ॲन्ड फर्निचर उमरगा यांची पावती क्रमांक 76 दिनांक 28-03-2017 मिरची कांडपयंत्राची किंमत रुपये 24700/- असतांना समाज कल्याण अधिकारी यांनी रुपये 24800/- मंजुर करुन प्रदान केल्यामुळे रुपये 100/- चे जादा प्रदान झालेले आहे. संबधीताकडून जादा प्रदानाची रक्कम रुपये 100/- वसूल होणे आवश्यक आहे.

12) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रीया सर्वार्थाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवावयाची आहे. पंरतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

13) मागासवर्गीय महिलांना स्वयंराजगारासाठी मिरची कांडपयंत्र खरेदीसाठी त्यांना रक्कम प्रदान केल्यानंतर संबधीत लाभधारक यांचे कडील मिरची कांडपयंत्र चालू आहे किंवा नाही याची तपासणी करुन त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली किंवा कसे याबाबतचे तपासणी, योजना राबविणारे समाज कल्याण अधिकारी यांनी अशा प्रकारची तपासणी केलेली नाही. त्यामुळे मागासवर्गीय महिला लाभाधरकांना मिरची कांडपयंत्र पूरवठा

केल्यानंतर व आगोदरचे उत्पन्नात काय बदल झाला याबाबत फलश्रुती अहवाल संचिकेत उपलब्ध नाहीत. प्रस्तुत योजना राबविण्या मागचा मुळ उद्देश सफल झाला असल्याचे दिसून येत नाही.

**3.876 मागासवर्गीयांना पीठाची गिरणी (चक्की) पूरवठा करणेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी सन 2016-17 या वित्तीय वर्षात मागासवर्गीयांना पीठाची गिरणी (चक्की) खरेदी करीता रक्कम रुपये 23,64,130/- जिल्हा परिषद उपकर निधी मधून खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: डिसीटी 2316/प्र.क्र. 133/का.1417, दिनांक 5 डिसेंबर, 2016 मधील परिच्छेद क्रमांक 2 अ ते ओ पर्यंतची कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजने अंतर्गत लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 2अ प्रमाणे संबधित वस्तूबाबत वितरण योजना तयार करणे आवश्यक असतांना विभागाने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2) सदर योजना एकूण रुपये 29.99 लक्ष किंमतीची होती. उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3.21 नुसार विभागाने खुली निविदा / खुली स्पर्धात्मक निविदा, ई-निविदा पध्दतीने मागविणे आवश्यक होते. तथापि विभागाने केवळ उस्मानाबाद शहरातील तीन पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून रास्त बाजारभाव प्राप्त केले नाहीत.

3) दरपत्रक आमंत्रण पत्रात पीठाची गिरणी (चक्की) चे कोणतेही स्पेसीफीकेशन व आयएसआय मार्क असल्याचे नमूद केले नाहीत. त्यामुळे विभागास प्राप्त झालेले दर हे कोणत्या स्पेसीफीकेशनचे आहेत याची खात्री होत नाही.

4) प्राप्त दरपत्रकापैकी रितेश स्टील इंडस्ट्रीज उस्मानाबाद व साईनाथ सेल्स उस्मानाबाद यांचे दरपत्रक लेटरपॅडवर भ्रमणध्वनी क्रमांक 9421874813 व 9420694005 सारखेच आहेत. विभागाने हितसंबध संघर्ष आहे काय याची खातरजमा केलेली नाही.

मे. दलाल स्टील सोलापूर यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रुपये 21,800/- असून त्याआधारे प्रति लाभार्थी अनुदान रुपये 21,800/- ठरविण्यात आले आहे. सदर योजनेत 107 लाभार्थी खरेदी ही मे. रितेश स्टील इंन्डस्ट्रीज उस्मानाबाद यांच्या पावत्या जोडलेल्या आहे.

5) विभागाने दर आमंत्रित करताना लागू असलेल्या सर्व कर, इतर कर व शुल्क / वाहतूक खर्च वस्तूच्या किमंतीपासून वेगवेगळे दाखवण्याची सूचना दरपत्रकात करणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यवाही झाली नाही.

6) लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

सदर प्रकरणात विभागाने उस्मानाबाद जिल्हयातील सर्व तालुकास्तरावर दरपत्रके मागणी न करता फक्त उस्मानाबाद येथील दरपत्रके प्राप्त करुन घेतल्यामुळे श्रीमती हरुबाई मरगु सुरवसे राहणार नंदगांव, ता. तुळजापूर यांनी पीठाची गिरणी (चक्की) खेरेदीची पावती रुपये 20,430/- ची सादर केलेली आहे. याच किमंतीवर जर योजना राबविली असती तर जिल्हा परिषदेस रुपये 1,37,260/- चे नुकसान झाले नसते. मुक्त स्पर्धा न करता दरपत्रके मागविल्यामुळे जिल्हा परिषदेचे झालेले रुपये 1,37,260/- चे नुकसान संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन वसूल होणे आवश्यक आहे.

7) श्रीमती हरुबाई मरगु सुरवसे, राहणार नंदगांव, ता. तुळजापूर यांनी मे. लोणी मेकॅनीकल वर्क, मशीनरी डीलर्स, सोलापूर यांचे बील नंबर 149 दिनांक 28/03/2017 किंमत रुपये 20,430/- मंजूर करुन प्रदान केले आहे. सौ. उज्वला चंक्रकात वाघमारे राहणार वागदरी, ता. तुळजापूर यांनी देखील मे. लोणी मेकॅनीकल वर्ग, मशनरी डीलर्स, सोलापूर यांचे बील नंबर 150 दिनांक 28/03/2017 रुपये 21,849/- दरचे असुन त्यांना रुपये 21,800/- दर मंजूर करुन प्रदान केले आहे. एकच पूरवठादार, एकच साहीत्य, एकाच दिवशी साहीत्य खरेदी केलेले दर वेगवेगळे

कसे याबाबत शहानीशा न करता रक्कम रुपये 1,370/- जादाचे मंजुर करुन प्रदान केलेले आहे. जादा प्रदानाची रक्कम संबधीत जबाबदार अधिकारी यांचे कडून वसूल होणे आवश्यक आहे.

8) लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे शासनाकडून विविध विभागाकडून योजना राबविण्यात आलेल्या आहेत याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षी ही लाभ दिला गेला किंवा नाही हे तपासता आले नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुदी खरेदी करण्यापुर्वी लाभर्थी निवडीची प्रक्रीया सर्वाथाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवावयाची आहे. पंरतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

10) मागासवर्गीयांना स्वयंरोजगारासाठी पिठाची गिरणी (चक्की) खरेदीसाठी त्यांना रक्कम प्रदान केल्यानंतर संबधीत लाभधारक यांचे कडील पीठाची गिरणी (चक्की) चालू आहे किंवा नाही याची तपासणी करुन त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली किंवा कसे याबाबतचे तपासणी अहवाल योजना राबविणारे समाज कल्याण अधिकारी यांनी अशा प्रकारची तपासणी केलेली नाही. त्यामुळे मागासवर्गीय लाभाधारकांना पीठाची गिरणी (चक्की) पूरवठा केल्यानंतर व आगोदरचे उत्पन्नात काय बदल झाला याबाबत फलश्रुती अहवाल संचिकेत उपलब्ध नाहीत. प्रस्तुत योजना राबविण्या मागचा मुळ उद्देश सफल झाला असल्याचे दिसून येत नाही.

**3.877 3 % अपंगकल्याण निधीबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद उस्मानाबाद, समाजकल्याण सन 2016-17 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 77 दिनांक 29/12/2016 रुपये 31,34,790/- मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे आदेश क्रमांक जिपउ/सकवि/लेखा/671 दिनांक 29/11/2016 अन्वये “जिल्हा अपंग निधी” स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा उस्मानाबाद खाते क्रमांक 62490155952 मध्ये रक्कम ठेवलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण 2007/प्र.क्र.4871/ वित्त-3 दिनांक 25 जुन 2014 नुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी त्यांच्या स्वनिधीच्या एकुण उत्पन्ना पैकी 3% निधी अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता राखून ठेवावा व तो त्याच कारणासाठी वापरावा. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

2) सदरची तरतुद सन 2011-12 पासून करावयाची आहे. तशी तरतूद केली नसल्यास सन 2011-12 पासुन च्या अनुशेषासह इथून पूढे ही तरतूद स्वनिधीच्या अर्थसंकल्पात जिल्हा परिषदेने करावी, परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

3) समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी सन 2011-12 पासुन जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नानूसार 3% प्रमाणे एकूण शिल्लक अनुशेष रुपये 92,79,739/- असल्याचे लेखापरीक्षणात कळविले आहे. परंतु अपंग कल्याण निधी मध्ये रुपये 31,34,790/- जमा केली आहे. रुपये 61,45,000/- एवढी रक्कम अपंग कल्याण निधी मध्ये जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून भरणा करणे आवश्यक आहे. पंचायत समिती व ग्रामपंचायत कडील 3% रक्कम अद्याप जमा झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अपंग-2016/प्र.क्र.110/वित्त-3, दिनांक 21 सप्टेंबर 2016 नुसार जिल्हा परिषदेप्रमाणेच पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नातून अपंगासाठी 3% रक्कम राखीव ठेवावी व अपंग कल्याणासाठी केलेली तरतुद पूर्णपणे खर्च करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन एखाद्या आर्थिक वर्षात अपंगासाठी 3% राखीव निधी त्या वित्तीय वर्षात खर्च केला नाही तर सदर खर्च न झालेली रक्कम जिल्हा परिषदेच्या अपंग कल्याण निधीमध्ये जमा करावी. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

**3.878 ग्रामीण भागांतील अपंग लाभार्थ्याने खरेदी केलेल्या मिरची कांडपयंत्र, वस्तूस्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोखस्वरूपात थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 789, दिनांक 30/03/2017 अन्वये रक्कम रुपये 3,84,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सर्वसाधारण ठराव क्रमांक 04, दिनांक 20/06/2016 नुसार, ग्रामीण भागांतील अपंगाना मिरची कांडपयंत्र जिल्ह्यांतर्गत ग्रामीण भागातील अपंग कल्याणार्थ सन 2016-2017 मध्ये तालुकानिहाय लाभार्थ्यांची अंदाजीत निवड करून लाभार्थी संख्येस मंजूरी दिलेली आहे. यांवरुन लाभार्थ्यांची मागणी, गरज किंवा आवश्यकता लक्षात न घेता केवळ आर्थिक तरतूद आहे म्हणून अंदाजित लाभार्थ्यास लाभाचे हस्तांतर रोख स्वरूपात दिले. गरजू व होतकरू लाभार्थ्यास या योजनेचा लाभ झाल्याचा लेख्याआधारे खातरजमा होत नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांब 2-व्हीआयपी-2016/प्र.क्र.24/वित्त-3, दिनांक 28 एप्रिल 2016 नियम “अ” प्रमाणे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सक्षम प्राधिकरणाने निवड केलेल्याच लाभार्थ्याला उपरोक्त लाभ दिला गेल्याची याची खात्री मूळ संचिकेवरून होत नाही.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक 2-व्हीआयपी-2016/प्र.क्र.24/वित्त-3, दिनांक 28 एप्रिल 2016 नियम “आ”प्रमाणे अर्जामध्ये नमूद करण्यात आलेल्या वस्तू/साहित्याची किंमत "विहीत" पध्दतीने ग्रामीण स्थानीक स्वराज्य संस्थेने निश्चित करावे असे असताना सबब नियमाप्रमाणे विभागाने कार्यवाही केल्याचे लेखे संचिकेत दिसून आले नाहीत

4) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक 2-डीसीटी 2316/प्र.क्र.133/का 1417, दिनांक 5 डीसेंबर 2016 या शासन निर्णयाव्दारे थेट लाभ हस्तांतर (डीबीटी) कार्यपद्धती 1. क्रमांक (इ):- वितरीत करावयाच्या वस्तूंचे परिमाण (SPECIFICATION) ठरविणे विभागाची असताना अशी कार्यवाही विभागाने केल्याचे लेखे संचिकेवरून दिसून आले नाहीत

5) उपरोक्त तपशिलाप्रमाणे विभागाने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तू स्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरूपात थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात केलेला आहे. परंतु

अ) मिरची कांडपयंत्र खरेदी पावती अनुक्रमांक 1,2,3,4, वर दिनांक नमूद नाही

ब) अनुक्रमांक 4,5, मिरची कांडपयंत्र खरेदी पावत्या कोटेशनच्या पावत्या आहेत. खरेदीच्या कॅशमेमो पावत्या नाहीत. यावरून विभागाने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या खरेदी पावत्याची पूर्णपणे शहानीशा न करता लाभार्थाच्या बँक खात्यावर थेट अनुदानाची रक्कम वर्ग केल्याचे दिसून येते

क) अनुक्रमांक 11 ते 15 च्या वस्तू खरेदी पावत्या 31/03/2017 नंतरच्या आहेत यावरून संबंधितानी लाभार्थ्यांना अगोदर पतपुरवठा बँकखाती हस्तांतर केल्या नंतर वस्तू खरेदीच्या पावत्या गोळा करण्यात आल्या यावरून सदर योजना शासन नियमानुसार राबविण्यात आली नाही.

**3.879 दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणांत दलित वस्ती सुधार योजनांतर्गत वित्तिय वर्षात प्राप्त तरतूद व खर्चाची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) चालू वित्तिय वर्षात प्राप्त अनुदान रुपये 55,57,59,000/- व सन 2015-2016 ची अखर्चित रक्कम रुपये 27,10,97,404/- असे एकूण अनुदान रुपये 82,68,56,404/- मधून रुपये 70,59,59,599/- इतका खर्च केलेचे लेख्यांवरुन दिसून येते व रुपये 12,08,96,805/- अखर्चित ठेवल्याचे दिसून येते. यांवरुन एवढया मोठया प्रमाणात शिल्लक निधी अकारण गुंतून पडलेला आहे. याबाबत खुलासा होणे आवशक्य आहे.

2) महाराष्ट्र शासन समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य, क्रिडा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक दवसु 1098/प्र.क्र.353/मावक-2, दिनांक 04 मार्च 1999 मधिल अटी व शर्तीनुसार कामाची अंमलबजावणी त्या-त्या पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व सबंधित उपअभियंता यांच्या सल्ल्याने करावयाचे आहे. तसेच अट

क्रमांक 12 नुसार ज्या कामासाठी अनुदान दिले आहे ती कामे सहा महिन्याचे आंत किंवा जास्तीत जास्त त्या-त्या वित्तीय वर्षात पूर्ण करावित अशा सूचना असतांना कामे प्रलंबित असल्याचे दिसून येते योजनेतील अटी व शर्तीनुसार कामे विहित वेळेत पूर्ण न झालेस सदरची रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. परंतु विभागांकडून अशी कोणतीच कार्यवही होत नसलेने शासन निधी रुपये 12,08,96,805/- अखर्चित राहिलेला आहे. तरी याबाबत खुलासा करावा.

3) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक दवसु 2011/प्र.क्र.442/अजाक, दिनाक 05 डिसेंबर 2011 नुसार सदर निधिचे वाटप हे त्या-त्या गांवातील मागासवर्गिय जातीच्या लोकसंख्येवर आधारीत करावे असे निर्देश आहेत. परंतु वित्तिय वर्षात विभागांकडून पंचायत समिती स्तरांवर निधी वितरित केलेला आहे जो शासन निर्देशांनुसार बरोबर वाटप केले किंवा कसे याचे लेखे पहावयास मिळाले नाहीत. तरी असे लेखे दर्शवून निधीचे वाटप लोकसंख्येच्या आधारावर झालेची खात्री पटवावी.

4) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक दवसु 2013/प्र.क्र.85/अजाक, 1 दिनाक 01 ऑगस्ट 2013 नुसार, जिल्हांतर्गत सर्व दलित वस्त्यांचे GIS Mapping करावे व त्याचा इलेक्ट्रॉनिक डाटा तयार करुन जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करावा ज्यामुळे, अनुदान वितरण संबधी सर्व गोष्टी सोपस्कर होतील. परंतु, सदर बाब पूर्ण केलेचे दर्शविले नाही. तरी याची पूर्तता करावी.

5) उक्त शासन निर्णय दिनांक 01 ऑगस्ट 2013 नुसार जिल्हांतर्गत मागासवर्गीयांच्या वस्तीत करावयाच्या कामाचा मास्टर प्लॅन पाच वर्षासाठी तयार करावा तसेच केलेल्या कामाची तपासणी प्रादेशिक उपयुक्त यांनी अन्य जिल्हयांतील समाजकल्याण अधिकारी यांच्या समवेत करावे. तसेच 5% कामाची तपासणी आयुक्त यांनी करावी, असे शासन आदेश असतांना अशा प्रकारे कामाची तपासणी केलेचे लेख्यांवरुन दिसून येत नाही. तरी पुर्तता दर्शवावी.

6) शासन निर्णय दिनांक 14 नोव्हेंबर 2008 नुसार मंजूर कामे पूर्ण झालेनंतर सदर कामाच्या नोंदी ग्राम पंचायतीच्या मालमत्ता नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदरील कामांवर नामफलक, कामाचा तपशील व खर्च इत्यादी नोंदीचे माहिती दर्शविणारे फलक लावणे आवश्यक आहे. परंतुअशी कार्यवाही केली किंवा कसे याची पडताळणी झालेची दिसून येत नाही.

7) तालुक्याकडील अखर्चित रकमा शासनास भरणा करणे आवश्यक आहे. कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.

**3.880 शालांतपुर्व शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना यांमधीलअनियमित शिष्यवृत्ती वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,29,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इडीडी-2003/प्र.क्र.71/सुधार-2, दिनांक 15 नोव्हेंबर 2003 मधील अट क्रमांक 04 नुसार अर्जदार हा शासन अनुदानित वसतिगृहात अथवा अनुदानित निवासी शाळेतील निवासी विद्यार्थी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा संबंधित संस्था प्रमुखाकडून प्रमाणित करुन घेतलेले नाही. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना प्रदान केलेली शिष्यवृत्ती योग्य त्याच अपंग विद्यार्थ्यांना अदायी केल्याची सत्यता पडताळणी करता आली नाही तरी याबाबत लेख्याआधारे पूर्तता व अनुपालन दर्शवावे.

2) उक्त शासन निर्णयांतील अट क्रमांक 06 नुसार, अर्जदार एकाच वर्गात एका वेळेपेक्षा जास्त वेळा अनुत्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्ती बंद करण्याचे आदेश आहेत तथापि समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर यांनी या अटीची पडताळणी केल्याचे अभिलेख संचिकेत नाहीत. तरी याबाबत लेख्यांआधारे पडताळणी केल्याचे अनुपालन दर्शवावे.

3) उक्त शासन निर्णयांतील अट क्रमांक 09 नुसार, अर्जदार गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेतलेला नसावा असे आदेश असतांना या अटीची पूर्तता पडताळणी अभिलेख संचिकेत नसल्याने योग्य त्याच विध्यार्थ्याची निवड झाल्याची सत्यता पडताळता आली नाही. याबाबत आवश्यक ते लेखे दर्शवून खात्री पटवावी.

4) विध्यार्थ्यांच्या देय रकमा शाळेमार्फत /संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना वाटप केलेचे दिसून येते. तथापि, विद्यार्थ्यांच्या त्यांच्या हक्काच्या देय रकमा बॅंकेमार्फत वाटप होवून तशा पोच दप्तरी दाखल नाहीत. त्यामुळे वाटप केलेल्या रकमा प्रत्यक्षात विध्यार्थ्यांना मिळाल्या याची शहानिशा लेखापरीक्षणात करता आली नाही. उक्त संबंधात वाटप रकमा विध्यार्थ्यांना मिळाल्या किंवा कसे ? यांची इतर यंत्रणेमार्फत तपासणी सुध्दा करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 अन्वये, संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांना रक्कम प्राप्त झाल्याबाबतच्या पोचपावत्या दर्शवून खात्री पटवावी.

5) मंजूर परीक्षा फी, शिक्षण फी व शिष्यवृत्त्या यांचे दुबार प्रदान होऊ नये यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागासमो/2000/प्र.क्र.1239, दिनांक 01 सप्टेंबर,1993 नुसार समाज कल्याण विभागाने मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत नोंदवही ठेवून अनुपालन दर्शवावे.

6) विद्यार्थ्यांचे प्रस्ताव संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व संबंधित तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने मागवलेले आहेत. तथापि, अनेक प्रस्ताव हे गट शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरीने न येता “करिता” म्हणून स्वाक्षरीने जिल्हा कार्यालयास प्राप्त आहेत आणि अशा प्रस्तांवांवर जिल्हयाने प्रदाने केलेली आहेत, जे कि नियम बाहय आहे. प्रस्तांवावर “करिता” म्हणून केलेली स्वाक्षरी कोणत्या प्राधिकाराने करण्यात येऊन प्रदाने करण्यात आली याचा खुलासा होऊन सक्षम प्राधिकाऱ्याचे सहिचे प्रस्ताव मागवून अनुपालन दर्शवावे